# परभणी
# वाती

१ चार खून : मानवत

२ कृषी विद्यापीठातील गुंडगिरी


माणूस

एकोणीस मे ब्याहत्तर

पन्नास पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१९ मे १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा – अंक : पन्नास

## सप्रेम नमस्कार...

१ मे, ७३

◻ काही दिवसापूर्वी आपल्या साप्ताहिकातून 'नेताजीं'वर चालू असलेली लेखमाला ४ जबान्यांतून संपली. प्रत्येक जबानी दुसरीपेक्षा आपापल्यापरीने वरचढ होती. एकूण सर्व लेखमालाच अतिशय वास्तव, आकर्षक, thrilling, चित्त खिळवून टाकणारी होती. कारण 'ती व्यक्तीच मुळी तशी होती – धैर्यवान, देशभक्तीने काठोकाठ भरलेली अलौकिक व्यक्तीमत्वाची होती – खरं पहाता शब्द अपुरे पडतात....

परंतु राहून राहून एकाच गोष्टीचे आश्चर्य वाटले आणि मन व्यथित होत होते. कारण गेल्या ५।६ महिन्यात कोणाही वाचकाचे त्यातील लेखांचे (पर्यायाने जबान्यांचे) appreciation करणारे एकही पत्र वाचकांच्या पत्रव्यवहारात आढळले नाही. असे म्हणतात, की संपादकाला येणारी पत्रे ही वाचकांच्या पसंती नापसंतीची द्योतक असतात. इथे कोणाच्या नापसंतीचा प्रश्न उद्‌भवणार नाही असे वाटते. One is rather shocked and disheartened towards the attitude shown by the readers.

कदाचित एखाद-दुसरा सन्माननीय अपवाद असेलही. बाकी फालतू बाबींवर कितीतरी पत्रे आढळतात. सध्याच्या पिढीतून सोडून द्या, परंतु जुन्या पिढीतील 'कोणीतरी' पत्र पाठवेल असे वाटले होते. पण छे! म्हणजे शेवटी एकूण काय तर ३१ मार्च ७३ च्या अंकातील शेवटच्या जबानीतील शेवटच्या हप्त्यात लेफ्टनंट अन्वर हुसेनने कॅप्टन हरगोविंदसिंगला जे ६ प्रश्न विचारलेत त्यांची उत्तरे मिळणे कुठल्या कुठे बाजूलाच राहिले! पाकिस्तानात गेलेला अन्वर हुसेनसारखा मनुष्य हिंदुस्थान स्टॅण्डर्डमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखावर लक्ष ठेवून असतो (अर्थात कळकळीने) हे विशेष. समाज, काळ, देश, जग सर्वच ढवळून कसे निघत नाही? सर्वच बदललय. असो इतकी मौल्यवान उत्कृष्ट लेखमाला दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार.

सुहास भोमे, दादर

# परभणी वार्तापत्रे

निळू दामले

## १ : मानवत

परभणी जिल्ह्यातले मानवत हे गाव. महाराष्ट्रातल्या प्रत्येक गावात दुष्काळ, धान्य, पाणी ह्या चिंता लागलेल्या असताना मानवत येथे मात्र लोकांना दुष्काळ महत्त्वाचा वाटत नाही.

गावात फिरावे. सर्व गाव एका भीतीने पछाडलेले दिसते. पुढला बळी कोणाचा? आपल्या मुलांचा तर नाही ना? हीच भीती.

मानवतहून आंबेगावला जाणाऱ्या रस्त्यावर ४ खून झाले आहेत. हा रस्ता आता ओस पडला आहे. कोणीही दिवसा ढवळ्याही ह्या रस्त्याकडे फिरकायला तयार नाही.

गेले ६ महिने घबराट माजून राहिली आहे. एका पाठोपाठ एक असे ४ खून झाल्यावर हादरून जाणे साहजिकच आहे. कारण इतके खून होऊनही अजून एकाही माणसाला अटक नाही, खुनी कोण त्याचा तलाश पोलीस लावू शकलेले नाहीत.

प्रकाशात आलेले हे ४ खून. पण त्या आधी व दरम्यानच्या काळात मानवतच्या आसपास झालेले मृत्यू (?) रहस्यमय आहेत. ह्या सर्व प्रकाराला पाताळयंत्री कारस्थानाचा वास येत आहे. पोलीस काहीच करू शकलेले नाहीत हे सत्य आहे. त्यामुळे खुनांच्या मालिकेतले गूढ आणखी वाढले आहे.

गावात अनेकांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. कोणी काही बोलायलाच धजत नाही. पोलिसही. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर खुनात कोणाचा हात असावा ह्याची माहिती जाणवते; पण बोलत मात्र नाहीत. अनामिक भीतीने त्यांचे ओठ शिवले गेल्यासारखे वाटत होते. त्यांच्या घरच्या मुलींचा बळी पडला, त्यांचे नातेवाईकही काही बोलत नाहीत. का? कोण हे खून घडवून आणत आहे? कोणी मोठी व्यक्ती? प्रतिष्ठित व्यक्ती?

सर्व हकीकत आधी समजून घेतली पाहिजे.

१४ नोव्हेंबर ७२ रोजी गयाबाई नावाच्या १० वर्षांच्या मुलीचा खून झाला. आंबेगाव रस्त्यावर नालीमध्ये शिंदीच्या झाडाच्या आडोशाला प्रेत मिळाले. जागा फार भयानक, दिवसाही घाम फोडणारी होती. २५ दिवसांच्या आत ९ डिसेंबरला दुसरा खून शकीला नावाच्या ९ वर्षांच्या मुलीचा. प्रेत

त्याच रस्त्यावर दूर उभी असलेल्या शेतात मिळाले. २॥ महिने लोटतात न लोटतात तोच गयाबाई नावाच्या बाईचा खून. प्रेत पुन्हा त्याच रस्त्यावर एका शिंदीच्या झाडाच्या आडोशाला. १३ एप्रिल ७३ ला चौथा खून नसीमा बेगम नावाच्या १०-११ वर्षांच्या मुलीचा. त्याच रस्त्यावर, गावालगतच्या एका शेतात लिंबाच्या झाडाखाली. मुंडके नसलेले धड पडलेले. मुंडके अजूनही मिळालेले नाही.

एका रांगेत झाले म्हणून हे खून चटकन लक्षात आले. पण मामला इतका सीधा वाटत नाही.

१५ जानेवारी ७२ ला एका माणसाच्या बैलगाडीखाली सापडून बुद्ध वाड्यातली एक २-२॥ वर्षाची मुलगी मेली. त्याच महिन्यात ३ तारखेला ज्याच्या बैलगाडीखाली मुलगी मेली त्याच माणसाच्या शेतात झाडाला लटकलेले एक प्रेत मिळाले. राम धनगराचे. पोलिसाकडे नोंद आहे आत्महत्या झाल्याची! कारणांची चौकशी नाही. झटपट केस निकाली!

ह्याच दरम्यानच्या काळात थोड्या अंतराने ३ माणसांचा मृत्यू विहिरीवर विजेचा झटका लागून झाला. एक जण विहिरीत पडून मेला!

मे ७२ मध्ये आंबेगावच्या शेतात एक प्रेत एका माणसाला आढळल्याचे कळले; पण पोलिसांकडे त्याची नोंद मिळत नाही. आढळल्यानंतर कोणत्याही नोंदीविना, पुराव्यानिशी प्रेताची विल्हेवाट लावली गेली असली पाहिजे. गावातल्या लोकांना हे माहीत आहे पण पोलिसांना मात्र काहीच माहीत नाही.

ह्या ८-९ मृत्यूंच्या घटना अतिशय रहस्यमय वाटतात. लोकांच्या मुस्कटदाबीचे तर हे प्रकार नाहीत? कटातून फुटणाऱ्या माणसांना दिल्या गेलेल्या सजा तर नाहीत? डोळ्याने घटना पाहिलेल्यांना तर खतम करण्यात आलेले नाही ना?

गावात सर्वांना माहीत असलेली व शक्य वाटते अशी एक गोष्ट ह्यापाठी आहे. कोण्या एका माणसाच्या आईला गुप्तधन स्वप्नात आले. तुझ्या मुलाचा व सुनेचा बळी दे किंवा ७ मुलींचा बळी दे तर मी तुला प्राप्त होईन असे त्या गुप्तधनाने म्हातारीला सांगितले. म्हातारी आणि तिच्या मुलाने मग ह्या खुनाचा सपाटा सुरू केला, असे म्हणतात. माझ्या सारख्याचा अशा प्रकारांवर विश्वास बसणार नाही. पण मानवत सारख्या गावातला जुनाट ग्रामीण समाज! जेथे अजून भूताखेतावर लोकांचा विश्वास आहे, भानामतीवर विश्वास आहे अशा ठिकाणी गुप्तधनासाठी हे क्रूर प्रकार होणे अगदी अशक्य नाही.

हृया गुप्तधनासाठी असोत किंवा कोणत्याही अन्य कारणांसाठी असोत, खुनांचा प्रकार पाहिल्यावर अनेक भयानक गोष्टी जाणवतात.

सर्व खून गळा दाबून करण्यात आले आहेत. एकाच रस्त्यावर सर्व खून झाले आहेत. मुली नाहिशा होणे व १२ दिवसानंतर त्यांची प्रेते सापडणे ह्याच

प्रकार प्रत्येक बाबतीत घडला आहे. जुन्या ओढयापासून निघणारा एक नाला आहे, जो हृया आंबेगाव रस्त्याच्या आसपास शेतांच्या धुऱ्यांशी फिरत दूर गेला आहे. हा नाला इतका खोल आहे की त्यातून माणूस जात असला तर दिसू शकत नाही. सर्व खून हृया नाल्याच्या कडेकडेने झाले आहेत. हा नाला आणि खुनाच्या जागा अशा प्रकारच्या आहेत की ज्या केवळ गावातल्याच लोकांना माहीत असणार, तिऱ्हाईताला जाणवणारही नाही. असा एकांत प्रेते ज्या ठिकाणी सापडली त्या त्या ठिकाणी आढळून आला.

मुलगी पळवली जाते, गळा दाबून मारली जाते. अनेक तासानंतर मोक्याच्या ठिकाणी प्रेत आणून टाकले जाते हृया घटना काय दर्शवतात ? सर्व प्रेतांच्या जवळ बैलगाडी गेल्याच्या चाकाच्या खुणा आढळून आल्या आहेत !

काही स्पष्ट निर्णय हृया गोष्टी देतात. खून करणारी माणसे गावातलीच असली पाहिजेत. कारण त्यांना सर्व माग नीट माहीत आहे. नाहीशी होण्याची जागा व प्रेत सापडल्याची जागा हृयातले अंतर, बैलगाडीच्या खुणा हृयावरून हे काम एका माणसाचे नाही, अनेकजण त्यात गुंतले आहेत. खून शांतपणे पूर्वयोजनेनुसार झालेले आहेत. (मयत मुलींच्या घरावर पाळत ठेवली होती असे आढळले. ज्यांना इतर नातेवाईकांची घरे आहेत अशांनाच मारण्यात आले. जेणेकरून बेपत्ता झाल्यानंतर काका-मामाच्या घरी मुलगी असेल हृया भ्रमाखाली त्या त्या घरचे लोक गाफील रहावेत).

महत्त्वाचे म्हणजे ४ खून करण्याएव्हढा निवांतपणा मिळणे आणि आत्मविश्वास असणे. पोलिसांना काही करता येऊ नये हृयाचा अर्थ कोणा बडयाचा हात हृया सर्वांपाठी असला पाहिजे.

गावाच्या जवळून जायकवाडीचा कालवा जावा हृया मागणीसाठी स्वतःचे पैसे खर्च करून, धडपड करून सरकारची दारे ठोठावली जातात. पण ४ खून होऊनही गावातली सर्व वडी मंडळी, प्रतिष्ठित मंडळी गप्प का आहेत ?

दोन खून होऊनही गावातल्या फौजदारांनी काही कारवाई केली नाही. त्यानंतरही जे प्रयत्न चालले आहेत तेही तोकडेच आहेत. ज्या गावात अशा घटना घडतात, लोक बोलत नाहीत, त्या गावातल्या खुनाचा तलास पोशाखातले पोलीस कसा लावू शकतील ? खाकी कपडे घालणाऱ्या अधिकाऱ्याला लोक उघडपणे मदत करतील असे गृहीत धरणारे संबंधित अधिकारी एकतर मूर्खतरी आहेत किंवा ह्या प्रकरणात त्यांचे हात तरी गुंतले असावेत. पोलिसांच्या कुमकीपेक्षा गुप्त पोलिसांचे प्रमाण वाढवले पाहिजे. पूर्वनियोजित कटाच्या बातम्या ह्या नेहमीच पानपट्टीच्या दुकानावर, वेश्येच्या माडीवर, दारूच्या अड्डयावर किंवा बाजारात फुटत असतात. धागेदोरे तेथेच सापडत असतात. त्यासाठी मुफ्तीतले पोलीसच, हेर पाहिजेत. पोलीस स्टेशनवर चौकशी

केली तेव्हा केवळ ५ गुप्त पोलीस आहेत असे सांगण्यात आले !

आपल्या भाचीच्या खुनाची खबर द्यायला एक माणूस १२ वाजता पोलीसस्टेशनवर गेला. ६ तास जाब-जबाबाच्या नाटकात त्याला अडकवले गेले. ६ वाजता पोलीस घटनास्थळी जाऊन पोचले ! हा हलगर्जीपणा हेतुपुरस्सर तर नाही ना ?

अनेक पोलिसांना छेडल्यावर त्यांचे उत्तर होतं, "क्या साब, हम कुछ बोल नहीं सकते, हम छोटे लोग है." कां ?

खुन झालेल्या एका मुलीच्या नातेवाईकाने पोलिसांना दिलेली जबानी मला घाबरत घाबरत सांगितली एकांतात.

तो म्हणतो 'दोन दिवस माझ्या हरवलेल्या भाचीचा शोध घेत होतो. आधीच्या खुनाची हकीगत माहीत होती व पोलिसांनी सांगितले म्हणून आंबेगाव रस्त्यावरच शोध घेत होतो. भाची नाहिशी झाली त्यावेळी तिच्याजवळ टोपली होती ती अचानक मला एका शेताच्या टोकाला नाल्यामध्ये मिळाली. संशय पक्का झाला. मी जवळच्याच शेतात गेलो. तेथे आल्यावर तेथली माणसे घाबरून गेली. त्यांचे चेहरे पांढरेफटक पडले. त्याच शेतात प्रेत असले पाहिजे असे म्हटल्यावर ते माझ्या अंगावर कुऱ्हाडी घेऊन धावून आले. मला घालवून देऊ लागले. मी एकटाच होतो. घाबरलो, पण खात्री पटली. म्हणून गावात जाऊन आणखी दोघांना घेऊन आलो. तेवढयात ती माणसे व टोपली गायब. अजून ती टोपली पोलिसांना मिळवता आलेली नाही. त्याच शेतात आम्हाला प्रेत मिळाले.'

त्या शेतातल्या माणसांना हा ज्यावेळी २।३ दिवसांनी भेटला व विचारणा केली त्यावेळी ते म्हणाले 'असली आदमी छूप रहा है. औरोंकोही खामखा घसीटा जा रहा है.'

कोण असली आहे हे पोलिसांना का शोधता येत नाही ? त्यांच्याकडेच असलेल्या पुराव्यांवरून. खुनाच्या जवळ आढळलेल्या बैल गाडीच्या चाकोरीचा आणि आसपासच्या जागेचा वास खास कुत्र्यांना घेऊ देण्यात आला. त्या कुत्र्यांनी त्या वासाच्या अनुरोधाने एक बैलगाडी व बैल बरोबर शोधून काढले. ही बैलगाडी व बैल कोणाचे आहेत ते पोलिसांना माहीत आहे ना ? मग अजून खुनी का सापडत नाहीत ?

हाच यक्षप्रश्न होऊन बसला आहे. गावातले वातावरण, गावातल्या गुन्हेगार लोकांची यादी, प्रकरणातली गुंतागुंत, गावातल्या प्रतिष्ठितांची काहीही न करण्याची, बोलण्याची तऱ्हा, ह्या सर्व गोष्टीतून काय अर्थ काढावा ?

खेडेगावची जडणघडणच अशी असते की 'सत्तेच्या' कलानेच प्रत्येकाला वागावे लागते. पोलिसांचे नाना प्रकारचे हप्ते खाणे,त्यांनी अरेरावीपणामुळे केलेले गुन्हे त्यांना माफ होऊन जाणे, सत्तेवरच अवलंबून असते. पुढाऱ्याला जर त्यातून

पृष्ठ ५९ वर

# धाडी

प्रभाकर म्हात्रे

: पाटील, तुम्ही सरकारला न कळविलेले बेकायदा भात तुमचे घरात साठा करून ठेवले आहे.

: असेल.

: असेल नाही, ते लेव्हीला आता भरा.

: भरणार नाही.

: तलाठी त्यांना नं. ३, ५, ६ च्या नोटिसा बजावा.

: तुमच्या नोटीसा घेणार नाही.

: किती वर्षे पोलीस पाटील आहात ?

: ३०।३२ वर्षांपासून.

पुरवठा खात्याचा एक उच्च अधिकारी आणि भाताच्या चोरट्या वाहतुकीबद्दल प्रसिद्ध असलेल्या नागले गावचा साठेबाज पोलीस पाटील श्री. परशराम गणपत पाटील यांचेमधील वरील संवाद साठेबाज काळाबाजारवाल्यांच्या उर्मट आणि उद्धट वर्तनाची साक्ष देत आहेत.

गेल्या ३।४ मेला ठाणे जिल्हा पुरवठा अधिकारी आपल्या सहकारी पथकासह पोलीसपार्टी घेऊन वसई तालुक्यातील नागलेगावच्या साठेबाज पोलीस पाटलाचे घरावर चाल करून गेले, तेव्हा त्यांना त्याचे घरात बरेच बेकायदा भाताचे साठे सापडले. नोटिसी घेणेचे नाकारताच फौजदार डोंगरे यांनी पाटलाची करड्या शब्दात कानउघडणी केली आणि नोटिसी पाटलाने स्वीकारल्या तरी लेव्ही देणार नाही ही वटवट त्याची सुरू होतीच. सापाचे डोके ठेचून काढले तरी शेपूट वळवळतेच ना ? पुरवठा अधिकाऱ्यांनी पाटलाचे मिलिंग परमिट मागविले. पाटलाने ते पुढे केले त्यावरील आकड्यात खाडाखोड केलेली पहाताच पुरवठा अधिकाऱ्यांना जास्त संशय आला.

: तलाठी, या परमिटावर खोडाखोड काय दिसते पहा.

: साहेब नुसती खोडाखोड नाही परमिटवरचा शेरा– 'Touch and Go.' या रसायनाच्या साहाय्याने काढलेला आहे.

: अरे बापरे ! ! !

१०।१२ अधिकाऱ्यांच्या तोंडून एकदम आश्चर्यकारक उद्गार बाहेर पडले.

या वेळपर्यंत या Touch and Go

चा सुतराम संबंध खेड्यापाड्यांशी आला नव्हता. शहरातील आंतरराष्ट्रीय बदमाश टोळ्या, खोटे पासपोर्टस्, खोटे चेक्स्, ड्राफ्टस् वटविण्यासाठी त्याचा उपयोग करीत. पण नागल्याचा पाटील एवढा भयानक माणूस असेल अशी कल्पना पुरवठा विभागातील कुणालाही नव्हती.

गेल्याच आठवड्यात मुंबईच्या मराठी दैनिकाने एक भयानक राष्ट्रद्रोही गोष्ट उजेडात आणली होती—

'या भयानक दुष्काळातही ठाणे जिल्ह्यातून हजारो क्विंटल तांदूळ परदेशात-मध्य आशियात चोरट्या मार्गाने पाठविला जातो '

'मराठा 'च्या ह्या भयानक स्फोटाला नागल्याच्या पाटलाच्या Touch and Go ने जास्त पुष्टी दिली. भरीला भर म्हणून नागल्याच्या पाटलाच्या घरापासून अवघ्या दोन-अडीच मिनिटावर वसईची खाडी असल्याचेही तिथे या लोकांना समजले. वसईची खाडी आंतरराष्ट्रीय स्मगलर्स लोकांची पोशिंदी म्हणून आंतरराष्ट्रीय स्मगलर्स जगतात ओळखली जाते.

पुरवठा अधिकाऱ्यांनी पाटलाचे परमिट जप्त करून ताब्यात घेतले.

नागल्याच्या भाताबद्दल सर्वत्र ओरडा होऊनही, शिवाय काही लोकांनी स्पष्ट जाऊन वसई तहशिलदार घरत यांना सांगूनही घरतनी ते भात का काढले नाही याबद्दलचे साशंक कुतूहल प्रत्येक अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर मात्र स्पष्ट उमटलेले दिसत होते.

पाटलाने आदल्याच दिवशी सत्यनारायणाची जंगी पूजा घातली होती. दुसऱ्या दिवशी अगदी उत्तरपूजेच्या वेळीच खरा सत्यदेव पाटलाच्या दारात उभा राहिला आणि पाटलाची पापे धुवू लागला.

मिळालेल्या साठ्याने पुरवठा अधिकाऱ्यांचा संशय दुणावला. त्यात आणखी Touch and go ने भर घातली. पाटलाच्या घराचा फार मोठा भाग बंद होता. पुरवठा अधिकाऱ्यांना वाटले यातही भाताचे कोठार असावे.

: पाटील हे कोठार उघडा.

: ते माझं नाही, माझ्या दूरच्या भावाचे घर आहे ते.

: असू द्या पण उघडा क'.

: ते बाहेर गेलेत. घरात कुणी नाही. हे बघा बाहेरून कुलूप आहे.

: असे होय, अरे तलाठी या भितीला कान लाव बघू. फौजदार तुम्हीही लावा. आत देवचारासारखा कोण घोरत पडला आहे पाटलाने शेजारी देवचारही बाळगले असतील.

: होय साहेब, पोरांच्या पण कुजबुजण्याचा आवाज येत आहे.

: व्हूऽऽ, पाटील पुरे झाली तुमची चालबाजी. आता घर उघडता की नाही ?

क्षणाचाही मग विलंब न लावता पाटलाने घर उघडले.

तिथेही भातच भात, पुरवठा अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य थुईथुई नाचत होते.

: पाटील, या भाताचे डिक्लरेशन

झाले आहे का ?

: नाही ते माझ्या मालकीचे नाही. ते माझ्या भावाच्या मालकीचे आहे.

तलाठी सुदाम पाटील वेरकी माणूस. त्याने मधेच तोंड घातले. 'साहेब हा खोटे बोलतो. याचेच हे भात आहे. मागे केव्हाही याच्या भावाने भात आपले असल्याचे आमचेकडे सांगितलेले नाही. तशी नोंद द्यावयास पाहिजे व त्याच्या भावाने दिलेली नाही.

त्याही भाताची जप्ती करून पुरवठा अधिकाऱ्यांचा मोर्चा वळला नागल्यापासून १।। मैलावरील पायगावला (ता. भिवंडी) ¤

स्थळ : पायगाव. नारायणराव गवळी, कूप कॉन्ट्रॅक्टर, सरपंच, काँग्रेसपक्षीय तालुका पंचायत सदस्य यांचा बंगला.

: नारायणराव आहेत का ?

: नाहीत.

: कुठे गेलेत ?

: 'दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी वज्रेश्वरीला मिटिंग ठेवली आहे, त्या मिटिंगला.' जगन गवळी–नारायणरावांचे कनिष्ठ बंधू–उत्तर देत होते.

: जगन शेट, आम्हाला नारायणशेटजींच्या बंगल्यातील भात पहावयाचे आहे.

: ते आल्यावर पहा.

: नको आम्ही काम सुरू करतो.

सारा पुरवठा अधिकाऱ्यांचा परिवार बंगल्यात शिरला आणि पाहतो तो काय ? जणू पंढरीच्या विठोबाचे कोठारच.

पुरवठा अधिकारी म्हणतात, सरकारी नोकरीत माझे काळयाचे पांढरे झालेत; पण मी असे पद्धतशीर कोठार कुठेच पाहिले नाही. मी मी म्हणणारे डिटेक्टिव्ह पोलीस अधिकारी आले असते तरी त्यांना भाताचे साठे कुठे आहेत हे समजले नसते. खाली लादीवर आपण उभे, लादीखाली भाताचे कोठार, बाजूला स्वयपाकाची चूल तिच्याखाली कोठार, वर आकर्षक छत, छतापलीकडे कोठार, अधिकारी भिंतीला टेकून उभे, भिंतीच्या आत कोठार, बाहेर गुरांच्या पेंढचाचा ढिगारा, ढिगाऱ्याच्या पोटात शेकडो क्विंटल भाताचे साठे, पलीकडे गुरांच्या शेणाची शेणकई, शेणकईत वर शेण आत भाताचे कोठार.

पायगावला एकएकाचे घरी हे चमत्कार पाहिल्यावर पुरवठा खात्याचे लोक म्हणाले असतील 'अजी म्या ब्रह्म पाहिले.'

नारायणरावांचे भाऊ राजा शेटजी, माधवराव भालेकर आणखी अनेक शेटजींची घरे चुटकीसरशी तपासली गेली. भाताचे साठेच साठे; पण नारायणरावांसारखा पद्धतशीर माल कुठेच दिसेना आणि नायपण शेटजी काही घरी येईना.

नेहमी सरकारी अधिकारी गावात आले रे आले म्हणजे हे शेटजी लोक त्या अधिकाऱ्यांभोवती 'भाऊसाहेब हाँजी, रावसाहेब हाँजी' करीत, दारू कोंबडयांच्या जेवणांच्या पार्टया

उडविणारे ! आज मात्र पायगावला या सरकारी लोकांना कुणी बस म्हणेना की ऊठ म्हणेना. जेवणाखाण्याची तर गोष्टच सोडा पण चहाही नाही. गावात हॉटेल नाही. जास्त कशाला, प्रातःविधीसाठी कुणी टमरेल पाणीही देण्यास तयार होईना.

पुरवठा अधिकाऱ्यांनी हे सुरुवातीलाच हेरले होते. तलाठी सुदाम पाटील महावस्ताद. बाबूराव अर्नाळकराची या तलाठ्याने पारायणे केली आहेत.

तो गपचूप अधिकाऱ्यांच्या कानात कुजबजला.

: साहेब हे शेटजी फार भयानक लोक आहेत.

: कसे ?

: रात्री आपण झोपलेवर ४००–५०० मजूर लावून भात फरारी करतील. दुसरे दिवशी आपण चक्क मामा बनू.

: बरोबर आहे सुदाम.

रात्रीच्या रात्री निबिड काळोखात रस्ता नसताना शेतातील वाटांनी जीप घालून १० मैलावरील भिवंडी मामलेदार कचेरी पुरवठा अधिकाऱ्यांनी गाठली. ¤

मामलेदार उमाकांत झांबरे यांचेसमोर धुरळ्याने माखलेला, दोन दिवसांच्या अहोरात्र जागरणाने त्रासलेला, पोट पाठीला भिडलेला असा हाडकुळा देहयेष्टीचा म्हातारा उभा राहिला. गावात शिवजयंतीचा उत्सव. त्यामुळे कडक बंदोबस्त होता. झांबरेंना वाटले काहीं गडबड घोटाळा झाला असेल.

त्यांनी तोंडावर बिजेरीचा झोत मारला आणि बापरे !

: साहेब, आपण एवढ्या रात्री येथे ? अश्या स्थितीत ? काय प्रकार आहे ?

: थांब झांबरे, आपले यशवंतराव साळवी कुठे आहेत ?

यशवंतराव साळवी या भागाचे प्रांत ऑफिसर, महसूल खात्यात साधा कारकून म्हणून चिकटला आणि आज उपजिल्हाधिकारी पदावर यशस्वीपणे आरुढ झाले आहेत.

महसूल खात्यासारख्या काव्यशून्य किचकट खात्यात उभी हयात घालवूनही साळवी कमालीचे वाङ्मयप्रेमी आहेत. जुन्या काळचा B. Sc. पदवीधर हा माणूस. अजूनही रात्री २–२ वाजेपर्यंत माणूस, किर्लोस्कर, सह्याद्री घेवून बसेल तर पोतदार, प्रियोळकर, काणे, क्षीरसागर यांचे अमूल्य ग्रंथ प्राणापलीकडे यांनी ठेवलेले दिसतील.

पायगाव, नागल्याची खरी शिकार, खरी बित्तंबातमी होती यशवंतराव साळवींनाच पण शिवजयंतीच्या उत्सवामुळे त्यांनी आपली शिकार घाटगेंजवळ सोपविली होती, तरी पण हा माणूस भलताच मिस्किल. या काळाबाजारवाल्या मस्तानांना पुरा ओळखून आहे. हे राक्षस खोटी कामे करून घेताना, विकत मिळणाऱ्या अधिकाऱ्यालाच हाँजी हाँजी करतात. तडफदार अधिकाऱ्याला साधी माणुसकीही दाखवीत नसतात, याचा पूरा अनुभव साळवींना असल्या-

मुळे त्यांना हे पुरे माहीत होते, की मध्यरात्री आपणाकडे कुणीतरी पायगाव वरून पुरवठाखात्याचा माणूस येणार.

मध्यरात्री घाटग्यांचा तो अवतार पाहताच साळवी उद्गारले, 'कशीकाय शिकार?'

'या हद्दीत अशी मिळाली नव्हती. पण हे बघ साळवी, मी दोन दिवस अन्नपाणी घेतले नाही. घेतले नाही म्हणजे काय, कोणी दिलेच नाही. माझा स्टाफ पण दोन दिवसाचा उपाशी आहे. मी उपाशी राहिलो तरी चालेल पण माझ्या स्टाफला काहीतरी खायला पाठविलेच पाहिजे.'

सुदाम पाटील म्हणाला 'गावातील लोकांना बरे वाटले आहे. त्यांनी आपली सर्व सोय केली असती पण साहेब निघून गेल्यावर पुढे या राक्षसांबरोबर दिवस काढावयाचे ना, म्हणून गावातील गरीब लोक दूरदूर रहातात.'

'घाटगे मला या लोकांचा पुरा अनुभव आहे. डहाणूला माझी २० वर्षे नोकरी झाली. यांच्या मतलबाआड येणाऱ्या अधिकाऱ्याला प्यायला पाणी देखील हे देणार नाहीत. असो. घाटगे, सर्वांचे खाणे मी तयार ठेवले आहे. शिवाय झांबऱ्यांनी शेकडो बारदाने, दाभणे, सुतळबंडले, लॉऱ्या जप्यत ठेवली आहेत. तुम्हा त्यांनी ओळखले नाही एवढेच.'

संक्रांतीपासून साळवी प्रांत या सावजावर टपून होते. ते शेवटी त्यांच्या सहकाऱ्याने सापडवले. ¤

इकडे नजीकच्या गावातून खादी-वेषधारी माळकरी बुवांचे शिष्ट मंडळ अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी पायगावला पोचले.

: साहेब, हे नारायणराव म्हणजे साक्षात पंढरीचे विठोबा हो, साऱ्या गोरगरिबांना पोसतात. त्यांचे भात नका नेवू हो. गरिबांचे कसे होईल, गरीब काय खातील?–शिष्टमंडळ.

: ठीक, ठीक. आपण नारायण शेटजींचे त्रास जरा कमी करूया. त्यांच्या मागे सामाजिक कार्याचा फार व्याप आहे ना?......

...त्यांना मदत म्हणजे पंढरीच्या विठोबाला मदत आहे. तेव्हा हे भात आपण गरिबांनाच देण्यासाठी भिवंडीच्या सरकारी गोदामात नेत आहोत. नारायणरावांची ही आम्ही सेवाच करीत आहोत–साहेब.

शिष्टमंडळ हात हलवीत खारबावला पळाले.

भाताचा दाणान् दाणा भिवंडी गोडाऊनला न्या म्हणून सांगून साहेब निघून गेलेत. ¤

शिकारीची चट लागलेला पारधी एकदा शिकार मिळताच तहानभूक विसरतो, पुढच्या शिकारीच्या आशेने दबा धरून बसतो.

कुणीतरी सांगितले तानसाच्या पायथ्याशी खंबाळ्याला भिवंडी तालुका पंचायत सभापती श्री. वसंतराव पाटलांच्या गावी लक्ष्मणशेट पाटलाजवळ शेकडो क्विंटल भाताचे बेकायदा

साठे आहेत.

-बस. घाटग्यांचा म्हातारा जीव थांबेना. जीप थेट भिवंडीपासून १६ मैलावरील डोंगरपायथ्याशी लक्ष्मण पाटलाचे दारासमोर.

: लक्ष्मण शेटजी आहेत ?

: येतील बसा.

: झडती घ्यावयाची आहे.

बोलता बोलता भाताचे कोठार सापडलेच. भातच भात. ¤

आता ठाणे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या धाडसी कृतीला मंत्र्यांचा पाठिंबा आहे का ? न पेक्षा साठेबाजांना धोक्यात आणल्याबद्दल पुरवठा अधिकारी वर्गावर सूड घेतला जाण्याची शक्यता जास्त असावयाची. मला तरी पहिल्यापेक्षा दुसऱ्याची शक्यता जास्त वाटते. मी हे स्पष्ट आणि सरळ पुराव्यावरून बोलत आहे.

सुमारे तीन महिन्यापूर्वी वसई तालुका पंचायतीतील एका जबाबदारीच्या पदावरील कॉंग्रेस पक्षीय सदस्याच्या राईस मिलमधे बेकायदा तांदूळ साठा व रेशन कार्डांचा ढिगारा मुंबई गुप्त पोलिसांना सापडला. त्यांनी योग्य ते कागद तयार करून प्रॉस्युक्युशनसाठी स्थानिक पोलिसांच्या स्वाधीन केलेत. पण स्थानिक पोलिसांनी प्रॉस्युक्युशन केले नाहीच पण पुरावे लंगडे करण्याचे प्रयत्न चालू ठेवले.

पायगावला असंख्य विक्रटल भात ज्या नारायणराव गवळ्यांच्या कोठारात सापडले ते कॉंग्रेसपक्षीय सरपंच व तालुका पंचायत सदस्य आहेत. या नारायणरावांची जमीन उणीपुणी ५–६ एकर आहे. त्यांनी हे एवढे भात आणले कुठून ? कशासाठी आणले होते ? डिक्लेअर का केले नव्हते ? प्रॉस्युक्युशन मार्गाने या प्रश्नांची उत्तरे मिळणे न मिळणे सर्वस्वी मंत्र्यांवर अवलंबून आहे. पण या प्रश्नांची दुसरीही एक बाजू आहे. वर्तक आजही ठाणे जिल्हा कॉंग्रेसचे कर्तुमकर्तुम आहेत. त्यांच्या भावजयी वसई तालुका पंचायत सदस्या व जिल्हा परिषद अध्यक्षा आहेत. आता ज्या कॉंग्रेस पक्षीय सदस्याकडे भाताचे व तांदळाचे बेकायदा साठे सापडले त्यांचेवर पक्षीय दृष्टिकोणातून वर्तकांनी कारवाई करून त्यांचे पक्ष सदस्यत्व रद्द करावयाला पाहिजे की नको ? त्याच प्रमाणे कॉंग्रेस पक्षाचे तिकिटावर हे साठेबाज निवडून आले आहेत. वर्तकांनी जिल्हा कॉंग्रेसला त्यांचे राजीनामे घेण्यास भाग पाडावे की नको ? पण अशी पक्षीय कारवाई वर्तकांकडून अद्याप झाली नाही.

● ● ●

# दुःख दुसऱ्याचे जाणावे

## दंडवते–शहाणे लेखावरील प्रतिक्रिया

### जयंत गडकरी

माणूस (१४ एप्रिल १९७३)च्या अंकातील 'दुःख दुसऱ्याचे जाणावे...' ह्या लेख वाचला. महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाच्या निमित्ताने लेखकांनी आपले काही विचार मांडले आहेत...व काही मूलभूत प्रश्न निर्माण केले आहेत.

'जाऊ द्या, आपल्याला काही कळेनासं झालंय' असं म्हणत म्हणत त्यांना स्वतःला 'कळलेल्या' काही गोष्टी आपल्या परीने त्यांनी मांडल्या आहेत. 'इकडल्या तिकडल्या' गोष्टी सांगता सांगता...एक 'सूत्र'ही मांडलं आहे. काही समर्पक उदाहरणे दिली आहे. लेख मोठ्या निर्व्याजपणे लिहिला आहे.

ह्या लेखाचा खटाटोप कशाला ?

तर शहाणे...दंडवते ह्यांनी जे मांडलंय...ते मनाला भिडणारं आहे, पण त्यांनी अनेक गोष्टी अर्ध्यावर सोडल्या आहेत. काही अर्धसत्यें मांडली आहेत.–आणि काही विचार...माझ्यामते...चुकीच्या दिशेला नेणारे आहेत.

'दुःख दुसऱ्याचे जाणावे' या लेखांचे सूत्र असे की : कारखानदारी जी वाढली, ती खेडोपाडीचे लहान सहान धंदे मोडून वाढली, शहरे खेडोपाड्यातल्या शेतकऱ्याला लुटून मोठी झाली. बेकार कारागीर-शेतकरी शहरात आला...व झोपडपट्ट्या माजल्या. शेतकऱ्याचे धान्य आपण भाव पाडून वगैरे विकत घेतले. पैशा-अडक्याचे व्यवहार आपल्या हातात ठेवून आपण खेड्यापाड्यातल्या सामान्य शेतकऱ्याला लुबाडले. शहरांचे आपण लाड केले...खेड्यांतल्या पिण्याकडेही आपण लक्ष दिले नाही...इतके आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पाप...पाप म्हणतात ते हेच !!

वास्तविक वस्तुस्थिती म्हणून त्यांनी जे मांडले आहे त्यात सर्वच चूक आहे असे नाही आणि नवीन असेही काही नाही. मार्क्सचे 'कॅपिटल' हिंदुस्थान वगैरे वसाहतिक देशावरील त्यांचे ग्रंथ आणि इतर कम्युनिस्ट साहित्य यांच्या वाचनाबद्दल ते उदास राहिले नसते तर कदाचित हे विश्लेषण अधिक चांगले झाले असते.

आता या पापावर काही उपाय

आहे काय ? हे पाप 'आपण' केलं... हे 'आपण' कोण. कुणाच्या इच्छेने वगैरे हे पाप' झालं काय ? ठीक आहे. आता काय करायचं ?

कुठं जायचं ? कारखानदारी मोडून मागं जायचं का ? बाटाची कारखानदारी मोडून सुई, आरी घेऊन बसणाऱ्या चांभाराला बूट बनवायचा धंदा द्यायचा का ? गिरण्या मोडून कोष्टाच्या हातमागावरचेच कापड चालवायचे काय ?

अर्थात शहाणे...दंडवते ह्यांनी स्पष्टपणे तसे म्हटलेलं नाही. पण लेखाचा एकंदर रोख मात्र तसाच आहे.

कारखानदारीकरता जंगलं मोडली. हे दंडवते...शहाण्याच्या मते दुष्काळाचे मोठ्ठं कारण ! त्यांनी काही तज्ज्ञांच्या मताचा हवाला दिला आहे. जंगलं वाचवली पाहिजेत...वाढवली पाहिजेत...ह्या बद्दलही मतभेद नाहीत.

पण प्रश्न निर्माण ह्या होतो...की ही कारखानदारी वाढायच्या अगोदर अगदी 'यंत्रयुग' यायच्या अगोदरही 'दुष्काळ' पडत होतेच. केवळ आभाळातून पडणाऱ्या पावसावर...आणि जुनाट अवजारांवर अवलंबून असतानाही 'दुष्काळ' पडत होतेच. अशा दुष्काळाची मराठी संतकवींनी केलेली वर्णने दंडवते शहाण्यांनी वाचली असतीलच. दंडवते शहाणे हे विसरले की हे यंत्रयुग व भांडवलदारी अर्थव्यवस्था यायच्या अगोदर हा शेतकरी नुसताच अर्धपोटी नव्हता, तर सरंजामदार जमिनदारांचा गुलाम होता. त्याच्या शब्दावर शेतकऱ्यांचा संसार मोडत होता. अगदी रयतवारी पद्धतीमध्येही त्याचे क्लेष कमी नव्हते. त्यावेळीही शेतमजूर होतेच पण ते भाकर तुकड्यावर राबत होते. त्यांना पगाराचे मानही नव्हते व शाश्वतीही नव्हती. ह्या अवस्थेचे हजारो अवशेष अजूनही ह्या देशात आहेतच.

अशोक शहाण्यांना त्यांच्या आवडत्या गुरुदत्तचा 'साहिब बिबी आणि गुलाम' समजला नाही असं कसं म्हणता येईल !

या पार्श्वभूमीवर आता घसाला लावायचे ते काय ?

शहाणे...दंडवते हे विसरले की, यंत्रयुगात दर एकरी उत्पादन वाढले आहे व एकंदर उत्पादनही वाढले आहे. व्यापारातल्या वायदेबाजीचे, फायदेबाजीचे आणि सट्टाबाजीचे अडसर जर ह्या उत्पादनवाढीला नसते, तर शेतकऱ्याला त्याचा फायदाही मिळाला असता व उत्पादनवाढही अधिक प्रमाणात झाली असती.

कारखान्याला मिळतो तसा सर्व खर्च वजा करून फायदेशीर भाव शेतकऱ्याला द्यायला कोण तयार आहे का ? असा सवाल दंडवते...शहाणे विचारतात. तर मी म्हणतो हा सवाल काही नवीन नाही. अन्नधान्याची शेतकऱ्याला मिळणारी किंमत व औद्योगिक मालाच्या किंमती ह्यातली तफावत हे सामान्य जनतेच्या पिळवणुकीचे सर्वात मोठे साधन आहे, लक्षण आहे हे कम्युनिस्टांनी वारंवार स्पष्ट केले आहे. शेतीमालाचे भाव बांधून द्या. शेत-

पृष्ठ ५३ वर

# आ ले पा क

■ तुमसर प्रकरणाबाबत मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणाले : या प्रकरणात जे जे कोणी जबाबदार असतील—मग ते कितीही मोठे असोत-त्यांची गय केली जाणार नाही.

अगदी सरकारचीसुद्धा ?

■ एक विदुषी म्हणतात : आज देशाला, चारित्र्यसंपन्न, स्वावलंबी, उत्तम नागरिक बनवणाऱ्या विद्यार्थिनींची गरज आहे.

विद्यार्थिनी अशा झाल्या तर 'साप्ताहिक मनोहर'चे कसे होईल ?

■ बलराज मधोक एका व्याख्यानात म्हणाले : नानाजी देशमुख, सुंदरसिंग भंडारी व यज्ञदत्त शर्मा हे जनसंघाचे नेते पक्षात दादागिरी करतात.

ही दादागिरी अटळ(ल) आहे.

■ नरहर कुरुंदकर एका व्याख्यानमालेत म्हणाले : रामायण-महाभारतात रथांचे उल्लेख आहेत म्हणून रेल्वेने न जाता रथाने जा, असा आग्रह कोणा जनसंघीयाने धरल्याचे माझ्या तरी पाहण्यात नाही.

उलट जनसंघाने आपल्या दीपक या मानचिन्हाऐवजी बॅटरी हे मानचिन्ह स्वीकारावे असा प्रागतिक आग्रह धरणारे कितीतरी जनसंघीय माझ्या पाहण्यात आहेत !

■ एक बातमी : मुंबई महापालिकेच्या एका शाळेतील एका वर्गातील ८५ टक्के मुले नापास होण्याचा विक्रम घडला आहे. त्यामुळे पालकवर्गात खळबळ उडाली आहे या शाळेचे नाव रामभाऊ भोगले मार्ग अप्पर प्रायमरी म्युनिसिपल शाळा; वर्ग इयत्ता पाचवी, तुकडी क्रमांक १. श्री. चणे गुरुजी या वर्गाचे वर्गशिक्षक असल्याची माहिती मिळते.

चणे खावे लोखंडाचे !

येथे चणे आहेत आणि दातही आहेत.

■ म्हैसाळ येथील परिसंवादात सुप्रसिद्ध उर्दू साहित्यिक द. मा. मिरासदार म्हणाले : 'समाजवाद' हा शब्दप्रयोग करणे म्हणजे आजकाल एक फॅशनच होऊन बसली आहे.

आणि तसे म्हणणे हे कमी फॅशनीचे थोडेच आहे ?

●

## विक्रमी चक्रम

'जग हे वेडयांचा बाजार' असे कोणीतरी म्हटले आहे. आणि कोणी म्हटले नसल्यास आपण म्हणू. तुमच्यामाझ्या या जगातील कित्येक माणसे

काय नमुनेदार वेडेचार करत असतात एकेक एक फ्रेंच मनुष्य, वाऱ्याविरुद्ध दिशेने, एका होडीतून अखंड पृथ्वी-प्रदक्षिणा करायला निघाला आहे. नुकताच एका अमेरिकनाने म्हणे सतत तब्बल चव्वेचाळीस दिवस पियानो वाजवण्याचा नवा विक्रम केला आहे. पाच अमेरिकन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कोंबडीच्या मटनाचे एकशेपन्नास मोठे तुकडे बसल्या बैठकीत फन्ना केले; आणि त्यांनी आता जाहीर आव्हानही दिले आहे. एका ऑस्ट्रेलियनाने एका तासात ४८० कालवे खाल्ली; एका इंग्रजाने न थांबता, एका पाठोपाठ ८१ कप चहा ढोसला; एक फ्रेंच मनुष्य ताठ दोरीवर १७४ तास तोल सावरून उभा राहीला; अर्जेंटिनामध्ये एकाने सतत १०६ तास नृत्य केले; जर्मनीमध्ये एका न्हाव्याने लागोपाठ ४४० जणांचे केस कापले; चिलीमध्ये पॉपसंगीत गाणाऱ्या एका वृद्धाने सतत ७३ तास गाणी म्हटली; कोणी एक अमेरिकन सद्गृहस्थ रस्त्याच्या कोपऱ्यावर उभा राहिला आणि १५ तासात त्याने १३००० लोकांशी हस्तांदोलन केले.

– हे विक्रम पाहिले की आपण थक्क होतो. माणसाच्या चक्रमपणावरचा आपला विश्वास दृढ होतो. ●

## कायद्याचे गाढव विद्यार्थी

आपल्या या पवित्र भारतदेशात कितीतरी विद्यापीठे कशी चालतात याच्या सुरस आणि चमत्कारिक हकीगती इतक्या नेमाने वृत्तपत्रांतून वाचायला मिळतात की त्यांच्यातील बातमित्व जवळजवळ संपलेलेच आहे, असे म्हणायला हरकत नाही. कोणत्याही विद्यापीठात एखादी बऱ्यापैकी गोष्ट घडली की आश्चर्याने मन कसे अगदी थक्क थक्क होऊन जाते.

आपल्या महाराष्ट्रात सहसा कोणतीही गोष्ट बंद पडत नाही. (अगदी 'सखाराम'–'घाशीराम'सारखी नाटकेसुद्धा.) आमची चारपाच विद्यापीठे पहा कशी आपल्याच तंद्रीत मस्त चालली आहेत. या विद्यापीठातील विद्यार्थी स्वस्थ; पालक–शिक्षणतज्ज्ञ स्वस्थ; प्राध्यापक स्वस्थ; कुलपती–कुलगुरु स्वस्थ. 'महाराष्ट्र टाईम्स'-सारखे एखादे वर्तमानपत्र विद्यापीठातील गैरकारभाराबद्दल काहीबाही लिहिते; पण स्पष्टच बोलायचे तर पुराव्याशिवायच्या त्या भरकटण्याची विद्यापीठांनी कशाला दखल घ्यावी बरे?

हीच तर मोठी गंमत आहे. महाराष्ट्रातल्या सगळ्या विद्यापीठातून अनेकरंगी भ्रष्टाचार चालतो, ही गोष्ट सर्वांनाच मान्य आहे. पण त्याबद्दलचा पुरावा काही कोणाला सापडत नाही. पुराव्याशिवाय आरोप आणि शिक्षा करायला येथे नादिरशाही थोडीच आहे? येथे तर राज्य न्यायाचे आहे. ते पुराव्याशिवाय काही म्हटल्या काही करू शकत नाही. आता कुलपती-कुलगुरूंनी डोळे उघडे ठेवले तर वाटेल

तेवढा पुरावा मिळू शकेल हे खरे आहे; पण त्या पदावर विराजमान राहण्यासाठी डोळे बंद ठेवण्याची अट आहे, असे जाणते लोक सांगतात.

या पार्श्वभूमीवर २२ एप्रिल ७३ च्या 'सोबत'च्या अंकातील 'महाजनी! तुमचाही रस्ता दिसू लागला?' हा देविदास गाडगीळांचा वृत्तान्त आम्ही वाचला या वृत्तान्ताचा सारांश थोडक्यात असा : पुणे विद्यापीठाच्या गेल्या वर्षीच्या कायद्याच्या परीक्षेच्या निकालात एक गंमत घडली होती : नाशिक-नगरच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना उत्तम गुण मिळाले; पण पुणेकर विद्यार्थ्यांची दैना झाली होती. नाशिक-नगरच्या आकस्मिक हुशारीचे रहस्य काय असावे याचा शोध काही चौकस विद्यार्थ्यांनी घेतला. तेव्हा काही प्राध्यापकांनी त्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका आगाऊ दिल्याची रम्य कथा पुणेकर विद्यार्थ्यांना कळली. गेल्या वर्षी जे घडले ते याही वर्षी घडू शकेल, असा रास्त तर्क पुणेकर विद्यार्थ्यांनी करून नाशिक-नगरच्या विद्यार्थ्यांना आगाऊ मिळालेली प्रश्नपत्रिका, कशी कोणास ठाऊक, हस्तगत केली. त्यानंतर हे भाबडे विद्यार्थी कुलगुरूंना भेटले, त्यांनी कुलगुरूंना 'पुरावा' सादर केला; एक सत्कृत्य केल्याच्या न्याय्य आनंदात ते गढून गेले. पण प्रत्यक्ष परीक्षेत तीच प्रश्नपत्रिका अधिकृत स्वरूपात अवतरली!

म्हणजे विद्यार्थ्यांनी डोळे उघडले पण कुलगुरूंनी ते बंदच ठेवले. पण, आमच्या मते, विद्यार्थ्यांनीही डोळे तसे उघडले नव्हते : एरवी हा पुरावा सर्वस्वी कुलगुरूंच्या हवाली करून ते स्वस्थ बसले नसते. या पुराव्यातील स्फोटकपणाचे दडपण कुलगुरूंवर आणणे अगदी अशक्यच होते, असे आम्हाला वाटत नाही.

पुराव्याचे महत्त्व आणि उपयोग कायद्याच्या विद्यार्थ्यांनी जाणायला हवा होता. तो त्यांनी जाणला नाही हा त्यांचा गाढवपणा झाला असे का म्हणू नये?

विद्यापीठातील भ्रष्टाचाराचा पुरावा सहज हाती लागत नाही. सहज हाती लागायला तो काही सरकारी मिलोतील धत्तुरा नव्हे! ● ● ●


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

# प्रा. दि. के. बेडेकर

डॉ. सुधीर फडके

मरण सर्वांनाच यायचे असते. अशापैकी बहुतेकांच्या मरणाने त्यांचे कुटुंबीय आणि आप्तेष्ट यांची हानी होत असते, थोड्यांच्या निधनाने सामाजिक जीवनात पोकळी निर्माण होते व तिचे दृष्य परिणाम होतात, पण अगदी मोजके लोक असे असतात की ज्यांच्या जाण्याने होणारी हानी ही अदृश्य अमूर्त असते. कारण ती वैचारिक असते, सांस्कृतिक असते. गेल्या तीन तारखेला निधन पावलेले आम्हा सर्वांचे सुहृद प्रा. दि. के. बेडेकर हे अशा मोजक्या लोकांपैकी एक होते.

१९१० साली जन्मलेल्या बेडेकरांनी वयाच्या विसाव्या वर्षी नगर जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहात भाग घेऊन आपल्या देशसेवेला सुरुवात केली. तो काळच असा होता, की त्यावेळी साऱ्या देशाच्या वातावरणात स्वातंत्र्याचे वारे घुमत होते व तरल मनाचे तरुण देशभक्तीच्या कल्पनेने झपाटून जात असत. लोकमान्यांच्या मृत्युनंतर देशातील स्वातंत्र्याच्या लढ्याची सूत्रे महात्मा गांधींच्या हाती आली होती व त्यांनी १९२० ते ३० च्या दशकात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी करावयाच्या देशव्यापी अहिंसात्मक लढ्याचे निरनिराळे मार्ग निवडून त्यासाठी सामान्य जनतेची मने तयार करावयाचे कार्य चालविले होते. या मधल्या काळात १९२५ साली मॅट्रीक झालेले बेडेकर फर्ग्युसन कॉलेजमधली दोन वर्षे संपवून इंजिनियरींगचे शिक्षण घेण्यासाठी कराचीत दाखल झालेले होते. त्या ठिकाणी दहशतवादी चळवळीशी संबंध असलेल्या एका अनाकिस्त मताच्या पंजाबी तरुणाशी बेडेकरांचा परिचय झाला व त्यांचे इंजिनियरींगच्या शिक्षणावरचे लक्ष उडाले व त्यांनी चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी 'शांती निकेतन' गाठले कविवर्य टागोरांच्या शांती निकेतनला त्या काळात एक आगळेच स्थान होते. राष्ट्रवादी पण

कलाप्रेमी भारतीय तरुणांचे ते एक स्फूर्तीस्थान होते. थोड्याच दिवसात मलेरियाने पछाडल्यामुळे बेडेकरांनी शांती निकेतन सोडले व तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास करण्यासाठी ते बनारस हिंदुविश्व विद्यालयात दाखल झाले. मध्यंतरी १९३० साली कायदेभंगाची देशव्यापी चळवळ सुरू झाली व बेडेकरांनी नगर जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहात उडी घेतली. त्या ठिकाणी सत्याग्रहात भाग घेणाऱ्या साम्यवादी तरुणांशी त्यांची ओळख होऊन ते मार्क्सवादी तत्त्वज्ञानाकडे वळले. १९३१ साली कायदेभंगाची चळवळ स्थगित झाल्यावर ते पुन्हा बनारसला गेले व १९३२ साली ते त्यांच्या विषयात बी. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. बनारसच्या दोन वर्षांच्या काळात त्यांचा साम्यवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास चालू होता. जहाल तरुणांच्या मार्फत चाललेल्या अभ्यास मंडळात ते भाग घेत असत. पदवी पदरात पडल्यावर मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष कामगार चळवळीत भाग घेण्याचे त्यांनी ठरविले. बनारस विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक फणिभूषण अधिकारी यांचे बेडेकर फार आवडते विद्यार्थी होते, त्यांनी आपल्या या शिष्याच्या योजनेचे कौतुक करून त्यांना आशिर्वाद दिला. कामगार चळवळीत भाग घेण्यासाठी बेडेकर मुंबईत आले व त्यांनी समाजशास्त्रात एम. ए. होण्यासाठी 'स्कूल ऑफ सोशिऑलॉजी' या संस्थेत नाव नोंदवले.

कामगार शेतकऱ्यांच्या क्रांतीकारक चळवळींचे स्वरूपच असे असते, की त्यात पूर्णवेळ काम केल्याखेरीज गत्यंतर नसते, इतर कोणत्याही गोष्टी करावयाला तेथे वाव मिळत नाही. बेडेकरांचे तेच झाले व त्यांचा एम. ए. चा अभ्यास मागे पडला. त्यांनी १९३३ साली कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व स्वीकारले व मुंबईतील व पश्चिम भागातील रेल्वे कामगारांची जागृती व संघटना करावयाला सुरुवात केली. १९३८ साली पक्षाचे कार्यकर्ते म्हणून पुन्हा ते बनारसला गेले. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर १९४० साली सरकारने राष्ट्रीय चळवळीतील जहाल कार्यकर्त्यांनी धरपकड करून त्यांना देवळी येथे डांबून ठेवले. बनारसहून भूमिगत होऊन महाराष्ट्रात आलेल्या बेडेकरांची पण थोड्याच काळात देवळीला उचलबांगडी करण्यात आली

खूप मोठ्या प्रमाणात एकत्र आलेल्या तरुण जहाल कार्यकर्त्या राजबंद्यांना देवळी हे समाजवादाचे शिक्षण देणारे विद्यापीठच बनले होते. सध्याच्या डाव्या विचारसरणीचे बव्हंश जेष्ठ पुढारी हे या 'देवळी विद्यापीठा'चेच विद्यार्थी आहेत. तेथे राजकारण, इतिहास, अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर कडाक्याच्या चर्चा होत असत. त्यामुळे बेडेकरांना भिन्न भिन्न विचारसरणींचा अभ्यास करता आला. हेगेल व मार्क्स यांचे तत्त्वज्ञान व इतर भारतीय दर्शने यांचा तुलनात्मक व

सखोल अभ्यास बेडेकरांनी याच ठिकाणी केला. या ठिकाणी राजबंद्यांबरोबर केलेल्या सामुदायिक उपोषणात त्यांची प्रकृती साफ बिघडली व ती पूर्ववत कधीच झाली नाही. १९४२ साली देवळी तुरुंगातून सुटका झाल्यावर साम्यवादी पक्षावरील बंदी उठल्यामुळे त्यांनी पुणे येथे पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे पदाधिकारी म्हणून उघडपणे संघटनेचे काम करावयला सुरुवात केली. १९४८ साली पक्षाच्या एकांतिक धोरणावर मतभेद होऊन ते व त्यांचे काही सहकारी १९५० मध्ये पक्षातून बाहेर पडले. मात्र पुढे पक्षाचे धोरण बदलल्यावरही पक्षाचे सभासदत्व न स्वीकारता, सांस्कृतिक चळवळ, साहित्य समीक्षा, इतिहास तत्त्वज्ञान इत्यादी विषयांचा अभ्यास व लेखन करणे एवढेच आपले कार्यक्षेत्र त्यांनी ठरविले.

अध्ययनाबरोबर अध्यापनाचे काम करता यावे म्हणून १९३३ मध्ये मागे पडलेला एम्. ए. चा अभ्यास त्यांनी सुरू केला. यावेळेस मात्र त्यांनी तत्वज्ञान हा विषय घेवून १९५४ साली ती पदवी प्राप्त करून घेतली. दोन वर्षे नाशिकच्या महाविद्यालयात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम करून ते १९५६ साली पुण्यास परत आले. त्यानंतर गोखले अर्थशास्त्र संस्था, वाईचा मराठी विश्वकोष, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ इत्यादि भिन्न भिन्न कार्ये करीत राहिले. हे करीत असतानाच त्यांचे चिंतनाचे व लेखनाचे कार्य सतत चालूच होते. १९४६ च्या सुमारास संयुक्त महाराष्ट्र चळवळीत काम करीत असताना या चळवळीचे अधिष्ठान शोधण्याची त्यांची धडपड चालू होती. या धडपडीचा परिपाक म्हणून 'संयुक्त महाराष्ट्र' हे पुस्तक व 'सोव्हिएट राष्ट्र व लोक' ही पुस्तिका निर्माण झाली.

१९५० नंतर तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला पुन्हा सुरुवात केल्यावर, यज्ञविधी व नरमेध आणि त्याचा यातुकल्पनेशी संबंध शोधताना त्यांचे लक्ष प्राच्यविद्येकडे वळले. त्याचप्रमाणे साहित्य समीक्षेविषयीच्या काही नव्या कल्पना त्यांच्या मनात घोळत होत्या. त्यावर त्यांनी विपुल लेखन केले. 'साहित्य निर्मिती व समीक्षा' या नावाने त्यांचा हा लेख संग्रह १९५४ साली प्रसिद्ध झाला. याच विषयावर अधिक परिपक्व विवेचन त्यांनी 'साहित्य विचार' या लेखसंग्रहातून १९६४ साली मांडले आहे. १९६१ साली पुणे विद्यापीठाने त्यांना हेगेलवर ग्रंथ लिहिण्यासाठी पुरस्कार दिला. पानशेतच्या पुरात त्यांच्या कित्येक संदर्भ टीपा भिजल्या, तरीसुद्धा नव्या चिकाटीने त्यांनी तो ग्रंथ लिहिला व हेगेल / जीवन व तत्वज्ञान' या नावाने तो १९६६ साली प्रसिद्ध झाला व त्याला 'ललित' मासिकाचे खास पारितोषिक मिळाले. साहित्य विषयाव्यतिरिक्त विविध विषयावरील त्यांच्या लेखांचा संग्रह १९६९ साली 'समाज चिंतन' या नावाने प्रसिद्ध झाला. या ग्रंथाशिवाय अनेक विषयांवरचे त्यांचे स्फुट लेख व मर्मग्राही पुस्तक परीक्षणे निरनिराळ्या मासिकातून प्रसिद्ध झाली आहेत.

प्रा. बेडेकरांची ही साहित्य संपदा पाहिल्यावर त्यांच्या विद्वत्तेची साक्ष पटते एवढेच नसून त्या विद्वत्तेचा कस कसा आहे हेही प्रत्ययास येते. ब्रिटिश सत्तेच्या काळात गेल्या शतकाच्या अखेरीस व या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात विद्वानांची एक दीर्घ परंपरा अस्तित्वात असलेली आपणास दिसून येते. याचे एक प्रमुख कारण असे असावे असे वाटते, की ज्या ब्रिटिश सत्तेशी आपण स्वातंत्र्य प्राप्तीसाठी झगडत होतो, त्या शासनातले बहुसंख्य अधिकारी हे बहुधा विद्वान् असत. असे गाढे विद्वान ज्या सत्तेच्या शासनात असत त्या सत्तेशी झगडणाऱ्या जनतेतील आपल्या बुद्धिवंतांना त्याच तोलामोलाची विद्वत्ता प्राप्त करून घेणे जरूरीचे होते आणि त्यामुळे आपल्या समाजात ज्ञानमार्गी विद्वानांची एक दीर्घ परंपरा निर्माण झालेली होती. या परंपरेतील फारच थोड्या व्यक्ती आपल्याला आजच्या महाराष्ट्रात आढळतात. प्रा. दि. के. बेडेकर हे त्यापैकी एक होते, असे मला वाटते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जीवनाच्या व ज्ञानाच्या निष्ठा अजिबात बदलून गेलेल्या असल्यामुळे आजच्या बुद्धिवंतांना तशाप्रकारच्या विद्वत्तेची गरज नाही असे वाटत आहे की काय नकळे. विद्वत्ता, कला, साहित्य व शास्त्र हे सामान्य लोकांच्या जीवनाशी व हित संबंधांशी सुसंगत असले पाहिजे याची जाण व भान बेडेकरांना पूर्णपणे होते असे त्यांच्या लिखाणावरून सहज समजून येते. याचे प्रमुख कारण, बेडेकरांचा राजकीय कार्य करीत असताना लोक जीवनाशी फार जवळचा संबंध आल्यामुळे त्यांच्या जवळ अनुभवाचे फार मोठे भांडवल जमलेले होते, हेच होय. या अनुभवामुळे जुन्यांचे ऋण मानूनदेखील त्यांच्या प्रज्ञेला मर्मभेदकता व विशालता प्राप्त झालेली होती व ती भिन्न भिन्न विषयांकडे मानवी दृष्टीकोनातून पहात होती असे आपणास आढळून येते. आपल्या समाजात आज विद्वान नाहीत असे नाही. परंतु वाचलेल्या ग्रथांतून मिळविलेल्या ज्ञानाचे एकसुरी टिपण करण्यापलिकडे या विद्वानांची गती जात नाही हे उघड दिसते. बेडेकरांचे तसे नव्हते. टिपलेल्या ज्ञानाला अनुभवाने बनलेल्या पिंडाच्या रसायनांतून बुचकळून काढून त्यांतून नवेच काही देण्याची कला त्यांच्या प्रज्ञेला साधली होती असे दिसते. यालाच आपण चिंतन असे म्हणतो. त्यांचे हे चिंतन एकांगी होते असेही नाही. आपल्या सामाजिक जीवनात प्रत्यही प्रत्ययाला यणाऱ्या कोणत्याही विषयाला त्यांचे चिंतन स्पर्श करीत असल्याचे आपणास आढळून येते. आणि असे असल्यामुळे त्यांचे चिंतन कधी दुर्मुखलेले किंवा नुसते गंभीर असल्याचे आपणास दिसत नाही. त्यांचे चिंतन खेळकर आणि अगदी मनापासून हसणारे व हसवणारे आहे. वादविवादाच्यावेळी कधी केव्हा ताण निर्माण होतो आहे असे वाटल्यास विनोद करून तो ताण नाहीसा करण्याचा ते सहजगत्या प्रयत्न करीत.

तत्वचिंतकाबरोबर त्यांचे मन अतिशय संवेदनाक्षम व कलाप्रेमी असे होते. त्यांचे साहित्यविषयक किंवा कलास्वरूप शास्त्रासंबंधीचे विवेचन यावरून त्यांच्या रसिकतेची साक्ष पटते. विद्वत्ता व रसिकता यांचा त्यांच्या ठिकाणी एक विलक्षण मिलाफ झालेला आपणास आढळून येतो. यामुळेच त्यांना एक सहृदय समीक्षक म्हणून मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळालेले होते. त्यांच्या 'विचित्रांच्या' नादाच्या मुळाशी त्यांची ही रसिक मर्मज्ञता होती, सृष्टीत सापडणारे दगडधोंडे, काटक्या काड्या किंवा झाडांच्या साली गोळा करून ते या वस्तूंच्या सहाय्याने मानवाच्या किंवा प्राण्यांच्या अशा काही चित्रविचित्र आकृती निर्माण करीत की पाहून आपले मन थक्क होऊन जाई. ज्यांनी ज्यांनी त्यांच्या घरी जाऊन हे प्रदर्शन पाहिले असेल त्यांना त्यांना मी काय म्हणतो हे लक्षात येईल. त्यांच्या निधनामुळे या विलक्षण विचित्रांच्या अनुभवसुखाला आपण मुकलो आहोत.

दुसऱ्याविषयी सहानुभूतीपर दृष्टिकोन हा बेडेकरांच्या स्वभावातला एक पैलू होता. चर्चेच्या वेळी आपल्यासमोर चर्चेला बसलेल्या माणसाचे म्हणणे संपूर्णपणे, शांत चित्ताने ऐकून घेण्याची सहनशीलता त्यांच्या अंगी असे. या त्यांच्या सहानुभूतीपर वागण्याने कोणत्याही चर्चेचा शेवट जरी मतभेदाने झाला तरी कोणत्याही प्रकारची कटुता निर्माण न होता चर्चा करणारा माणूस त्यांचा मित्र बनूनच जात असे.

साम्यवादी पक्षातून बेडेकर बाहेर पडले असले तरी समाजवादी विचारसरणीचे त्यांचे भान कधीच सुटले नव्हते. याचे कारण त्यांनी स्वीकारलेले तत्वज्ञान हे पुस्तकी नव्हते. ग्रंथांच्या दरवाजातून समाजवादाच्या मंदिरात शिरलेला माणूस सोयीप्रमाणे दुसऱ्या एकाद्या दारातून बाहेर पडतो, असे आपण पुष्कळवेळा पहातो. समाजवाद हे एक जीवनाचे तत्वज्ञान आहे, जीवनाकडे पहाण्याचा तो एक दृष्टिकोन आहे, आणि म्हणून त्या तत्वज्ञानाला स्वत:ची एक गती आहे अशी त्यांची धारणा होती. कोणतेही तत्वज्ञान एकदा पोथीत जाऊन बसले की त्यांची गति मानता नाहीशी होऊन त्याला जडपणा येतो. माणसाचा सृष्टीशी संबंध, माणसाचा माणसाशी संबंध व त्याचा स्वत:शी संबंध कोणता आहे आणि या साऱ्यांचा परस्परांशी संबंध कोणता आहे याचे चिंतन करणारे 'समाजवाद' हे तत्वज्ञान आहे आणि म्हणून ते जीवनाचे सर्वंकष चिंतन करू शकते अशी त्यांची मनोधारणा असल्यामुळे पक्षात नसतानासुद्धा त्यांचे ते भान हरपले नव्हते.

साऱ्या तत्व चिंतनाच्या, लिखाणाच्या कलेच्या बुडाशी 'माणूस' आहे. ही जाण ते कधीही विसरले नसल्यामुळे निराशेचा त्यांच्या मनाला कधीही स्पर्श झाला नाही. आज ना उद्या माणूस बदलेल या श्रद्धेमुळे त्यांची सदृश्यता यशात वा अपयशात जागी राहिली.

असा हा थोर सहृदय तत्वचिंतक रसिक, समीक्षक आपल्यातून अकाली निघून गेल्यामुळे आपली झालेली हानी मूर्तपणे दिसली नाही तरी ती कित्येक वर्षे आपल्याला जाणवत राहील असे मला वाटते.

● ● ●

# म्हैसाळ आघाडीचे पुढचे पाऊल

दि. वि. गोखले

म्हैसाळ हे नाव 'माणूस'च्या वाचकांच्या परिचयाचे आहे. १९६९ सालच्या प्रारंभी, म्हैसाळचेच एक कार्यकर्ते श्री. मधुकरराव देवल यांच्या पुढाकाराने तेथील हरिजन मंडळींनी एक सहकारी शेती संस्था स्थापन केली. हरिजनांच्या जमिनी ज्या भागात आहेत तेथे एक विठ्ठल मंदिर असल्यामुळे संस्थेला श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी असे नाव देण्यात आले. संस्थेने २७ एकर जमिनीपासून कार्याला सुरुवात केली. आज संस्थेपाशी सुमारे १०० एकर जमीन आहे. गावात हरिजनांचा उबरठा आहे सुमारे १५०. त्यापैकी ९० कुटुंबे संस्थेत सहभागी आहेत.

म्हैसाळ गाव कृष्णेकाठी वसले आहे. याचा फायदा संस्थेने घेतला असून सुमारे साठ एकर जमीन पाण्याखाली आणली आहे. उरलेली जमीनही पाण्याखाली आणण्याचा संस्थेचा मानस आहे. पण यंदाच्या भीषण दुष्काळामुळे हा विचार लांबणीवर टाकणे भाग पडले. मात्र दुष्काळ असूनही गतवर्षीपेक्षा संस्थेच्या उत्पन्नात वाढ झाली हे नमूद केले पाहिजे. शेतीतज्ज्ञांचे मार्गदर्शन व मदत हे या यशाचे महत्वाचे कारण. पण मोठे श्रेय द्यायला पाहिजे खुद्द संस्थेच्या सदस्यांना. व्यवस्थापन तंत्रात ही मंडळी हळूहळू निष्णात बनत आहेत. गतवर्षीपेक्षा संस्थेची ऊस, कपाशी, केळी आदी रोख पैसे देणारी पिके अधिक चांगली आली. द्राक्षांचे पीक मात्र अद्याप समाधानकारक येत नाही. पण तेही सुधारण्याचा निश्चय व्यवस्थापक मंडळींनी केला आहे. ७०–७१ साली संस्थेच्या शेतीमालाचे उत्पन्न सुमारे सव्वा दोन लक्ष रुपये झाले. ७१–७२ साली हा आकडा दोन लक्ष साठ हजारांपर्यंत गेला होता. ज्यांनी संस्थेत आपल्या जमिनी दिल्या आहेत त्यांना खंडरूपाने देण्यात आलेली रक्कम व मजुरी मिळून संस्थेने ७०–७१ साली ६२ ते ६५ हजार रु. वाटले. ७१–७२ साली ही रक्कम ८० हजारापर्यंत गेली. संस्थेच्या वाढत्या यशाचा हा बोलका पुरावा मानला पाहिजे.

शेती सहकारी संस्थेने म्हैसाळच्या हरिजन मंडळींच्या मनात आर्थिक स्थैर्याची आशा निर्माण केल्यामुळे त्या

सबंध समाजालाच टवटवी आली आहे. दलित युवकांनी एक मंडळ स्थापन केले असून, लोकांनी दारू पिऊ नये, विवाह समारंभात अधिक खर्च करू नये, शाळे-मध्ये मुलांनी नियमितपणे जावे असे प्रयत्न गेले वर्षभर चालविले आहेत. याच मडळाच्या पुढाकाराने यंदा आंबेडकर जयंतीचा २७ ते २९ एप्रिल असा तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तिन्ही दिवस सकाळी परिसंवाद व सायंकाळी जाहीर सभा असे कार्यक्रम होते. म्हैसाळ हे अवघ्या ७–८ हजार वस्तीचे गाव. हरिजन वस्ती सुमारे १५००. दिवस उन्हाळचाचे बहुंश प्रौढ माणसे दुष्काळी कामावर मजुरीसाठी जाणारी. तीन दिवस सकाळ-संध्याकाळ कार्यक्रमासाठी कोण येणार ? ५–२५ मंडळी असली तरी खूप झालं, अशा अपेक्षेने मी गेलो होतो. पण तिन्ही दिवस सकाळी १००–१५० व सायंकाळी २००–२५० मंडळी उप-स्थित असत. २५–३० महिलाही येत.

म्हैसाळचेच एक नागरिक श्री. आप्पासाहेब सणबे यांच्या हस्ते कार्य-क्रमाचे उद्‌घाटन झाले व कोल्हापूरचे सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते श्री. बापू-साहेब पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचा समारोप झाला. श्री. सणबे हे संस्थेच्या कामात सतत लक्ष घालतात. शेती संस्थेमुळे हरिजनांची आर्थिक स्थिती सुधारत आहे. याचबरोबर त्यांनी कटाक्षाने शालेय शिक्षण घेणे, व्यक्तिगत व सामुदायिक स्वच्छता राखणे, दारूचे व्यसन कमी करणे आदी गोष्टींकडे का लक्ष दिले पाहिजे, हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन समजावून दिले.

श्री. बापूसाहेब पाटील यांच्याखेरीज, सुप्रसिद्ध कथालेखक द. मा. मिरासदार, पत्रकार दि. वि. गोखले, सांगली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण खात्याचे सभापती श्री. बाजीराव गोंधळे व मिरज पंचायत समितीचे उपसभापती श्री मोहनराव शिंदे यांचीही भाषणे झाली. सरकारने हरिजनांना शिक्षणा-साठी, घरबांधणीसाठी, शेतीसाठी देऊ केलेल्या सवलती अपुऱ्या असल्या तरी त्या सवलतींचा आपण पुरेपूर फायदा घेतला पाहिजे, असे श्री. शिंदे यांनी सांगितले, तर एका बाजूला विधायक कार्य करीत असतानाच, महाराष्ट्रात दलित समाजावर जे अत्याचार होतात, त्यांच्याविरुद्ध संघटितपणे उभे राहिले पाहिजे, असे श्री. मिरासदारांचे आवा-हन होते. श्री. बापूसाहेब पाटील म्हणाले : प्रत्येक स्पृश्य हा आम्हाला शत्रू आहे असे मानू नका. त्यांच्या-मध्येही आपले अनेक मित्र आहेत. आपल्या लढ्यासाठी या सर्व मित्रांचे सहकार्य घेऊन पुढे चला. श्री. गोंधळे हे स्वत. हरिजन. बाबासाहेब आंबेडकर हयात असताना, दलित तरुणांत शिक्षणाची जी जिद्द होती ती आज दिसत नसल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. बाबासाहेब राष्ट्राला ललामभूत झाले याचे मोठे कारण त्यांची अखंड ज्ञानसाधना हे आहे, हे विशद करून तरुणांनी पडेल त्या हालअपेष्टा भोगूनही शिक्षण घेतले पाहिजे, अशी तळमळीची हाक त्यांनी दिली.

पण कार्यक्रमाचा डोळ्यात भरण्यासारखा भाग म्हणजे खुद्द हरिजन तरुणांची भाषणे. या कार्यक्रमासाठी आजूबाजूच्या ८-१० खेड्यांतले १५-२० तरुण आले होते. म्हैसाळच्या हरिजनांनी सुरू केलेल्या उपक्रमाची सांगोपांग माहिती घेण्याची त्यांची इच्छा होती. त्यांच्या आपापसात चर्चा झाल्या. परिसंवादात १५-१६ हरिजन युवकांची भाषणे केली. त्यात म्हैसाळबाहेरचे ५-६ तरुणही होते. ८-१० युवकांनी आपले विचार चांगल्या व स्पष्ट शब्दात व्यक्त केले. शिरटी गावचा कांबळे नावाचा तरुण मेडिकल कॉलेजात शिकतो. सरकार आम्हाला जी शिष्यवृत्ती देते, त्यात आमच्या शिक्षणाचा निम्मा खर्चही भागत नाही. अशा स्थितीत आम्ही शिक्षण कसे पुरे करायचे, असा त्याचा सवाल होता. म्हैसाळचा मारुती कांबळे पदवीधर आहे. गोदावरीबाई परुळेकरांच्या 'माणूस जेव्हा जागा होतो' या पुस्तकाची त्याने पारायणे केलेली दिसली. आपण केवळ स्वतःचीच सुधारणा करून थांबता कामा नये. अन्य दलितांच्या सुधारणेसाठीही आपण प्रयत्न केले पाहिजेत, असे विचार त्याने मांडले. हरिजन समाजातील अनिष्ट रूढींची खंतही अनेकांना लागून राहिली आहे हे त्यांच्या भाषणांवरून स्पष्ट झाले. महार समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. तरीही आपले लोक नवस-सायासांवर शेकडो रुपये खर्च का करतात, असा सवाल या वक्त्यांनी केला. देवदासी पद्धतीतील दांभिकता विशद करताना इचलकरंजीचे कांबळेगुरुजी यांनी विचारले : 'जेजुरीचा मल्हारी भोळा, ठेवी आमच्या मुलीवर डोळा,' ही वस्तुस्थिती अद्याप आपल्या कशी लक्षात येत नाही ?

या उत्सवापूर्वी युवक मंडळाने कबड्डीचे सामने भरविले होते. त्यासाठी आलेल्या संघांमध्ये अनेक स्पृश्य खेळाडूही होते.

श्री. मिरासदारांच्या उपस्थितीचा फायदा घेऊन एका सायंकाळी त्यांचा कथाकथनाचा कार्यक्रम झाला. 'घोयाचे पीक' ही स्वतःची व 'मीटिंग' ही शंकर पाटलांची अशा दोन कथा सांगून त्यांनी श्रोत्यांना खूष केले. पण त्यांच्या विनोदाला श्रोत्यांनी एवढा उत्तम प्रतिसाद दिला की स्वतः मिरासदारही खूष होऊन गेले.

बाबासाहेबांच्या प्रतिमेच्या जंगी मिरवणुकीने कार्यक्रमाची सांगता झाली. अनेक स्पृश्य नागरिक कार्यक्रमाला उपस्थित रहात व हरिजनांच्या मांडीला मांडी लावून एकाच बैठकीवर बसत. म्हैसाळात मी तीन दिवस होतो. बऱ्याच स्पृश्यांच्या घरी हरिजनांना बरोबरीने वागविण्यात येते, चहा-फराळ देण्यात येतो, असेही आढळून आले.

म्हैसाळला मी गेली तीन वर्षे मधून-मधून जातो आहे. तेथील सामाजिक परिवर्तन मला केवळ आशादायीच नव्हे तर स्फूर्तिप्रदही वाटते.

● ● ●

पुस्तके

मराठी कादंबरीचा एक टप्पा

# गोतावळा

निशिकांत मिरजकर

'गोतावळा' प्रकाशित झाल्याला तब्बल दोन वर्षे झाली. इतके दिवस ती माझ्या मनात रुतून बसली आहे. पहिल्याच वाचनात मी इतका प्रभावित झालो होतो की, या कादंबरीवर काहीतरी लिहिलेच पाहिजे असे मला वाटू लागले. पण जे लिहायचे ते 'काहीतरी'च लिहून चालणार नाही. हेही जाणवले. या लहानशा कादंबरीचा आवाका इतका मोठा होता, तिचे कलात्मक रूप इतके समृद्ध होते की तिला न्याय द्यायचा असेल तर जरा निवांतपणे लिहिणे जरूर होते. म्हणून मी 'गोतावळा' जरा बाजूला ठेवला. त्यानंतर ठिकठिकाणी 'गोतावळा'वर इतके लेखन यायला लागले की निवांतपणे लिहिण्याची आवश्यकता जास्त-जास्त पटत चालली. महाराष्ट्र शासनाचे हरी नारायण आपटे पारितोषकही या वर्षी या कादंबरीला मिळाले. कुणी या कादंबरीत अस्तित्ववाद शोधला, कुणी तिला वास्तववादाचे निकष लावले, कुणी त्यातून काही सामाजिक प्रश्न उभे केले. ती प्रादेशिक कादंबरी आहे की नाही; मुळात ती कादंबरीच आहे की नाही याचाही काथ्याकूट करण्यात आला.

खरे म्हणजे सगळ्या वादांच्या, चिकित्सांच्या आणि विश्लेषणांच्या पलीकडे कलाकृतीचे एक जिवंत एकसंध विलोभनीय रूप असते. वाद आणि विश्लेषणे म्हणजे केवळ या रूपाकडे पाहण्याची स्वतंत्र गवाक्षे असतात. विशिष्ट गवाक्षाचा आग्रह धरून या जिवंत एकसंध रूपाला गुदमरून टाकण्यात टीकेचा अट्टाहास दुराग्रही ठरतो. कलाकृतीला विशिष्ट वादांची, प्रवृत्तीची लेबले लावून टाकण्याची हौस हा या दुराग्रहाचाच एक भाग आणि केवळ समीक्षेमध्येच नव्हे, तर कलावंताच्या

जाणीवेतही हळूहळू त्याची सावली पसरते. त्यामुळे परिणामतः कलाकृतीला एकच एक रंग फासला जातो. तिच्या आकाराचे ठोकळे बनू लागतात. मराठी कादंबरीच्या वाटचालीत असे रंग आणि असे ठोकळे कितीतरी दिसून येतील. सामाजिक कादंबरी, एतिहासिक कादंबरी, अद्भुतरम्य कादंबरी, वास्तववादी कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, संज्ञाप्रवाही कादंबरी अशी परिभाषा त्यातून तयार झाली. रुळली. नामवत कादंबरीकारांनीही कधी प्रयोगासाठी, कधी यशस्वितेचे आडाखे म्हणून, कधी लोकप्रियतेचे साधन म्हणून यातला एकेक प्रांत कुंपणे घालून बंदिस्त करून घेतला आणि फुलविला.

'गोतावळा'चे वैशिष्टय या कुंपणांचे भान न ठेवता एक कलात्मक आकृतिबंध उभा करण्यात आहे. ही प्रादेशिक कादंबरी आहे, पण तिला प्रादेशिकतेच्या मर्यादा बंदिस्त करीत नाहीत. तिला कथानक आहे, पण त्याची आखीव कृत्रिम रचना नाही. त्यात अस्तित्ववादाचे सूत्र असेल, पण त्याचे अतिरेकी एकांतिक चित्रण नाही. संवेदनावाही निसर्गचित्रे आणि भावाकुल मनाची अनुभूती, व्यक्तिगत तीव्र जाणिवेचा विस्तारत जाणारा परिघ, माणूस–प्राणी–यंत्र यातील परस्परविच्छेद, संघर्ष आणि त्यातून उद्भवणारे नाट्य अशा अनेकविध नानारंगी सूक्ष्म पदरांनी या कादंबरीचे एकसंध पोत विणलेले आहे.

शेतात खपणाऱ्या, ढोरात ढोर होऊन राहिलेल्या नारबाचा हा 'गोतावळा' आहे. कोंबडा, कुत्री, ढोरे नि झाडेझुडे हे या गोतावळ्याचे घटक. त्यांनीच नारबाचे कुटुंब बनलेले आहे. नारबाच्या जीवनक्षत्रात त्यांना फार भरीव आकार प्राप्त झालेले आहेत. नारबाच्या जीवनाला व्यापून ठसठशीतपणे उरलेले आहेत. यातलाच एक होऊन जगणाऱ्या नारबाला जणू यापरते निराळे अस्तित्व नाहीच. जेव्हा ते तसे उरते तेव्हा नारबा अगतिक होतो. संपायला लागतो. आभाळाखाली पसरलेल्या उफाडमाळावर भिरकिटणाऱ्या म्हाताऱ्या मृतवत् घोड्यासारखा. त्याच्या सगळ्या भावजीवनाला उध्वस्त करून टाकणारा ट्रॅक्टर आणि अवघ्या बाह्यांतरविश्वात घमघमून मुरलेली स्त्री-सहवासाची अतृप्ती अशी या कादंबरीतली दोन उत्कट संघर्षरूपे.

आनंद यादवांच्या लेखनशैलीची अनेक लोभस वैशिष्टये या कादंबरीत इतस्ततः विखुरलेली आहेत. चार-दोन वाक्यात एखाद्या व्यक्तीचे, घटनेचे गतिमान रेखाचित्र उमटवणे ही एक त्यांची नेहमीची लकब. कादंबरीच्या सुरुवातीलाच 'त्येची सावली माळावर लांबपतोर गेलेली. अजून तसाच नाळरोगी. व्हटांवरच्या मिशा काढलेला. भुंडा. पायांत पट्टयापट्ट्यांचं कसलं तरी चप्पल. हातपाय बारक्या पोरागत बिनकामानं मऊमऊ दिसतेलं. चुन्यात बुडीवल्यागत पांढरीधोट कापडं... पांढऱ्या कापडांस्नी बघून जनावरं भुजली नि समदी दावणच्या दावण

कावरीबावरी होऊन हुबी ऱ्हायली.' असे कोल्हापूरच्या पाव्हण्याचे चित्र ते सहज रेखाटतात आणि त्याच्या रेषा न् रेषा कितीतरी अर्थांनी बोलू लागतात. त्या पाव्हण्याचे सुस्पष्ट चित्र तर त्यातून उभे रहातेच, पण नारबाच्या ढोरांत रमलेल्या सरळ भाबड्या जीवनातील भावी वादळाची सूचनाही त्यातून कलात्मकतेने मिळून जाते... 'मळ्यावर काळुख पसरत चाललं हुतं. पांदीपलीकडचा बुरूज मुंडकं तोडलेल्या धुडासारखा दिसत होता. काळुखं पडल तसा त्यो फुडंफुडंच सरकल्यागत वाटत हुता. येणार काळुखं अंगावर घेत ढोरं गपगार डोळं झाकून हुबो हुती. लिंबाच्यावर पैलं घुबाड घुमलं नि मी एकटाच दुपारी तुटलेल्या नाड्यांचं एटाक चिलबिलत बसलो.' हे असेच एक चार ओळींचे निसर्गचित्र. ट्रॅक्टरच्या नादात असलेला मालक रेड्यांना ओली वैरण घातल्याबद्दल नुकताच चिडून गेलेला असतो. अशा वेळी नारबा वरील दृश्य वर्णन करतो आहे. निसर्गाच्या गडद चित्राबरोबरच स्वतःच्या अंतरीची व्यथा सांगतो आहे. भावी घटनांची सूचक सूत्रे इथेही हळूच प्रतीयमान झाली आहेत. अशी वर्णनचित्रे जागोजागी विखुरलेली आहेत. विहिरीतल्या कासवाचे जीवन सांगता सांगता आपल्या स्वतःच्या एकटेपणाची दुःखछटा नारबा त्यावर नकळत उतरवून जातो. घुबडांच्या ओरडण्याचा विचार करता करता झोप लागल्यावर मळ्यासकट गुरांना व नारबाला हाकारणारी घुबडेच घुबडे नारबाला दिसतात आणि पुढल्या वाताह्रातीची साद घालून जातात. एवढेच काय, पण पब्याने सुतळीला बांधलेल्या मरणोन्मुख विंचवांचे चित्रदेखील नारबा अशा ओलाव्याने रेखाटतो की 'सगळं इच्चू गरीब गरीब दिसतेलं. कुठं जाऊन मरणार हुतं कुणाला दखल? पब्याच्या मर्जीखातर गावातल्या पोरांस्नी ते आपला जीव घाण ठेवून भ्या दावायला चाललं हुतं.' यासारखी वाक्ये थेट नारबाच्या अगतिकतेच्या अस्तित्वाशी सांधा जुळवत रहातात.

हा नारबा मोठा विलक्षण आहे. त्याच्या भावजीवनाची वेव्हलेंग्थ अनेक पातळ्यांतून मुरडत गेलेली आहे. एकीकडे जगाच्या दृष्टीने हा केवळ ढोरागुरांतला माणूस आहे. ढोरात ढोर होऊन राहिलेला. त्यांच्याच लायकीचा. नगण्य. पण दुसरीकडे त्याची संवेदनाशीलता अत्यंत गडद आहे. ढोरेगुरे, झाडेझुडपे, जमीनमाळ यांच्याशी त्याच्या आतड्याचे पीळ जमलेले आहेत. एकीकडे मालकाने लग्न करून दिले नाही, फसवले याबद्दल तो मालकावर रुष्ट आहे, वैतागलेला आहे. दुसरीकडे मालकाची त्याला जबरदस्त दहशत आहे. मन कितीही आक्रोश करीत असले तरी मालकाला तो शब्दाने अथवा कृतीने विरोध करूच शकत नाही. उलट पोराबाळांचा आपला संसार मालकाला कसा परवडेल, असे मालकाच्या विचारवृत्तीचे विश्लेषणही तो करू शकतो. मालकाला तसे त्याने

पुरे जोखलेले आहे. प्रसन्न निसर्गदर्शनाने नारबाच्या चित्तवृत्ती एकदम फुलारतात. आभाळाचे पिल्लू होऊन आभाळाच्या पंखाबुडी जावे असे त्याला वाटते. अंगभर रसरसलेल्या धरतीची साद त्याला जाणवते. चांदण्यात गाडी घुमवणारा नारबा पोरांसंगे मधाच्या पोळयाला दगडे मारून त्यांना चिकटलेला मध चाटण्यात रमून जातो. मोराचे दर्शन घडण्यासाठी तो व्याकुळ होतो नि त्यात यल्लाम्माचा दरबार पाहिल्याचे सुख मानतो. त्याच्याही अंगावर पिसारा फुलतो. साधे गवतदेखील त्याला 'रानावर हिरवी साय आल्यागत' जाणवते. मालकाने रेडयांचा सौदा पटवल्यावर 'पोटात खेकडा नांग्यांनी आतडी तोडाय लागलाय' असे त्याला वाटू लागते.

नारबाचे एक स्वतःपुरते तत्त्वज्ञानही आहे. टिटवीचा आक्रोश, घुबडाचे ओरडणे, देवाला फोडलेल्या नारळाचे तीन तुकडे होणे अशा गोष्टींतील अशुभाने तो व्याकुळ होतो. पण हे अशुभसंस्कार उत्कट भावनेतून जन्मलेले असतात. उलट भावनेच्या उत्कटतेला जिथे रोकडा बुद्धिवाद श्रेयस्कर वाटेल तिथे नारबा त्याचाही स्वीकार करतो. ओपेला आलेल्या पाडीला, चाण्या तिचा भाऊ म्हणून चालू शकत नाही हे त्याला त्यामुळे पटतच नाही. नारबाची अंधश्रद्धा आणि त्याचा बुद्धिवाद भावनेच्या उत्कटतेनुसार आकार घेतो. त्याच्या अगतिकतेलाही विचारशील व सोशीक तत्त्वज्ञानाचा पैलू आहे. '...बघत ऱ्हायचं. आणि भोग आला म्हंजे भोगत ऱ्हायाचं...' ही त्याची एकंदर जीवनाचीच वृत्ती आहे. कुठल्याही मन वेधून घेणाऱ्या गोष्टीतून नारबाच्या मनात विचारतरंग सुरू होतात आणि अगदी अलगदपणे ते तत्त्वज्ञानाच्या रेषेवर येऊन विरून जातात.

या सगळयाला सतत अधोरेखित करणारे नारबाचे नेहमीचे दुःख कायमच असते. एकटेपणाचे दुःख. स्त्रीसहवासाच्या अतृप्तीचे. '...मेल्यावर असाच कावळा हुईन...पिंड शिवायचाच न्हाई. बायकू ह्या तवा पिंड शिवीन...निदान कावळयाच्या जल्माला गेल्यावर तरी बायकू पाहिजे.' अशा टोकाला हे दुःख पोचलेले. ह्या अतृप्तीने मनात झालेली पोकळी भरून काढण्यासाठी नारबा आपोआपच गुराढोरांवर निसर्गावर भरपेट माया करू लागतो. त्यांच्या सुखाने हसतो, त्यांच्या दुःखाने गहिवरतो. निसर्गाच्या समृद्धीत स्त्रीत्वाच्या खुणा शोधतो.

आपल्या या आगळया गोतावळयाशी नारबाने जोडलेले भावबंध अगदी खरेखरे असतात. हृदयाच्या तळापासूनचे असतात. म्हणून करडे विकून 'मला न विचारताच मालकिनीनं पैसं मोजून हातात घेतलं.' याची त्याला खंत लागून राहते. 'भेंडया खुडून न्हेलेल्या झाडागत शेळीचा जीव झालेला' पाहून तो खिन्न होऊन जातो. 'धाबारा सालं कामं करून घेतलेल्या बैलांचा मालकाला कार वाटला' याचे त्याला आक्रीत

वाटत राहते. नारबाच्या ठिकाणची सहानुभूती इतकी उत्कट आहे की, खरोखरीच त्याचे मन गुरांच्या मनात उतरते. त्यांच्यातून विचार करू लागते. मोटेवर जाणाऱ्या बैलांचे मन तो वाचू शकतो तसेच बाजाराला नेल्या जाणाऱ्या बैलांची मूक व्यथाही पुरेपूर समजू शकतो. पांजरपोळात नेण्यासाठी गाईला सोडता सोडता त्याला खरोखरीच आपली दिवंगत आई आठवते. '...न्हाई गप. संपलं बाबा तुझं आता.' असे फडफडणाऱ्या कोंबडयाच्या धडाला तो मायेने कळवळून समजावू लागतो.

घडणाऱ्या घटनांच्या प्रतिक्रिया नारबाने शारीर संवेदनाच्या खरेपणाने आणि तीव्रतेने अनुभवलेल्या दिसतात. मारलेल्या कोंबडयांच्या पिसापंखांचा ढीग पाहताना 'पोटात कालीवल्यागत झालं नि कोंबडयानं पोटातल्या पोटात खच्चून भांग दिली.' असे त्याला वाटते. 'पिप्पळ वर निवांत. माळावरनं गावाकडं त्येची नजर. मळयाच्या सगळया रानभर, डोंगराकडं, खोपीकडं, हिरीकडं...सगळीकडं पानांचं डोळं चमकतेल.' असे माळावरच्या पिंपळाचे रूप तो पाहतो. खाली माना घालून वैरणीचा वाळला पाला तोंडात मुरगळून घालणारी ढोरे पाहून त्यालाही उगीचच वाटते, 'पाला खाता आला असता तर आपूणबी त्येंच्याबरोबर खाल्ला असता.'

एरवी अगतिकतेने आल्या भोगाला सादर होणाऱ्या, मायेने जपलेल्या जनावरांच्या वियोगाचे दुःख निमूटपणे सहन करणाऱ्या नारबाच्या जीवनातदेखील शेवटी संघर्षनाटय उद्भवते. आपल्या लाडक्या चाण्यावर काठया ओढणाऱ्या ड्रायव्हरच्या डोक्यात धोंडा घालावा असे त्याला वाटू लागते. त्याचा जीव तिरमिरतो. नारबाचे कायमचे एकाकीपण, त्याचे दुःख विसरण्यासाठी ढोरानिसर्गावर त्याचा जडलेला जीव, त्यातला एकेक धागा तुटत असताना मनात रिचवलेले भावनांचे कढ, ड्रायव्हरबद्दलचा धुमसणारा तिरस्कार या सगळया पार्श्वभूमीवर नारबाचे हे तिरमिरणे अपरिहार्य असते. स्वाभाविक ठरते. परिणामाचा कळस गाठते.

याच्या जोडीने विरोधलयीत उठून दिसणारा नारबाचा मालक. व्यवहारी, थंड डोक्याचा नि हिशेबी वृत्तीचा. 'तू न्हाई उद्या दुसरा कोण तरी पाजाय येईल. पर डायव्हर एकदा गेला की पुन्ना त्या शारगावातनं हितं कुणी पाय धुऊन पाणी प्यालो तरी येणार न्हाई... व्हायाचं असलं तर डायव्हर सांगल तसं व्हायाचं.' हा त्याच्या वृत्तीचा कळस. नारबा आणि त्याचा मालक हे काही कादंबरीचे नायक आणि खलनायक नाहीत. पण विरोधलयीतील त्यांच्या चित्रावर्तनाने नारबाचे दुःख गतिमानतेने परिणामकारक होत जाते आणि शेवटी विलक्षण अथांग कारुण्याच्या एककेंद्री आवर्तात विलय पावते. 'जिवाला बरं नसल्यागत मला दिसत हुता...सबंध माळावर कुठं झाड, डगरी, वारूळ काय बी दिसत नव्हतं...आता माळावर ढोरं कशाला येतील नि पोरं तरी कशाला येतील ?...चल ! रगड झालं आता.

आता नगंच व्हायाला...समदा गोतावळा घेऊन असंच माळानं माळ हुडकत जाऊ हित आता कोण हाय आपलं?' हा नारबाच्या मनाचा मूक आक्रोश नि तडफडाट मनाला खोलवर भिडणारा ठरतो, तो त्यामुळेच.

हे सगळे घडवताना आनंद यादवांची लेखणी अत्यंत सहजतेने विविध विभ्रमांचे सौंदर्य खुलवीत राहते. कधी ते सहजगत्या एखादी सूचक नाट्यमय घटना वर्णनात गुंफतात तर कधी निरागस भाबडेपणाचा आव आणून रोकड्या वास्तवाचे टाके घालत जातात. चुरमुऱ्यासारखे कुरकुरीत नि नाट्यमय संवाद, वर्णनांतून व्यक्त होणारे भाववृत्तींचे ध्वनिसौंदर्य, बोलाकृतींतून घडणारे अव्याज स्वभावदर्शन यामुळे यादवांच्या निवेदनाला दिमाख प्राप्त होतो. संवेदनांच्या उत्कट अनुभूतीचा प्रत्यय प्रत्येक भावक्षणी यादव पुरेपूर देतात. त्यातून अनेक प्रत्ययकारी प्रतिमा साकार होतात.

प्रारंभापासूनच ही कादंबरी मनात शिरते. सगळ्या अंगांनी, सगळ्या रंगांनी. पहिल्याच प्रकरणात कादंबरीच्या सर्व संविधानकाचे बीज जागा घेते आणि पुढे एकेका घटनेतून त्याचा एकेक अंकुर पालवीत राहतो. अतिशय समृद्ध असलेली यादवांची शब्दकळाही कादंबरीस सर्वांगांनी पोसवते. ज्या जीवनाचे चित्र त्यांनी इथे रेखले आहे त्याच्या मातीचा कस त्यांच्या शब्दाशब्दातून जाणवतो.

मराठीमध्ये प्रादेशिक कादंबरी म्हणजे केवळ काव्यमय आणि सुंदर निसर्गाच्या साथीसोबतीने रचलेल्या भावकथा होत्या. अलीकडे त्यांत जिवंत व्यक्तिमत्त्वांचा आणि अर्थपूर्ण प्रतीकात्मतेचा स्पर्श जाणवू लागला होता. पण निसर्ग आणि जनावरे यांना एक संपूर्ण भावकेंद्रित आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व देऊन आनंद यादवांनी मराठी प्रादेशिक कादंबरीत एक नवीन टप्पा निर्माण केलेला आहे. निसर्ग, मानव आणि यांत्रिक प्रगती यांच्या परस्परसंलग्न सहजीवनाचा सरसकट तिरका छेद त्यांनी घेतलेला आहे. उध्वस्त भावजीवनाचा हा संघर्ष दाखवताना वस्तुनिष्ठ वर्णनशैली आणि आत्मनिष्ठ भावनांचे आलेखन यांचा एक सुमेळ त्यांनी साधलेला आहे गतिमान कथानक आणि संथ रेंगाळणारी अनुभूतिचित्रे यांचे दुपेड या कादंबरीत विणलेले आहेत. मुख्य म्हणजे घडणाऱ्या घटना आणि उचंबळलेल्या भाववृत्ती यांचे परस्परांवरील सादपडसाद विलक्षण सहानुभवाने यादवांनी टिपलेले आहेत. कोणत्याही एकाच चाकोरीत कादंबरीला रुळवण्याऐवजी त्यांनी तिला सर्वांगांनी वाढू-फुलू दिले आहे. या कलाकृतीची टोकदार मुळे कलात्मकतेच्या सर्व थरांतून जीवनाचा शोध घेत गेलेली आहेत. मराठी कादंबरीत हे अपूर्व नसले, तरी इतक्या सामर्थ्याने एकवटलेले आजवर जाणवले नाही. म्हणून 'गोतावळा' हा मराठी कादंबरीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. तिला हरी नारायण आपटे पारितोषक मिळते हा तिचा यथार्थ गौरव आहे. ◻

('गोतावळा'—आनंद यादव—मौज प्रकाशन गृह, मुंबई, किंमत—सात रुपये पंचाहत्तर पैसे-पृष्ठे १४३).

रवींद्र पिंगे

शतपावली

# कै. अ. का. प्रियोळकर

घरातल्या भिंतीवरलं देवाच्या फोटोचं जुनं कॅलेंडर वर्षोन्‌वर्षं न जाणवता दिसत रहावं, तसं थकत चाललेल्या एकमार्गी प्रियोळकरांचं जागोजाग रफू केलेलं एकपल्ली आयुष्य माझ्या अगदी डोळ्यांसमोर आहे. पाटीवर टळक रेघ ओढावी तसा त्यांचा खाक्या होता. इकडे-तिकडे बघणंच नाही. मानां वेळ-वायला प्रलोभनं असावी लागतात; मनसुद्धा शिवरीच्या कापसासारखं हलकंफुलकं असावं लागतं. प्रियोळकरांचं चित्र म्हणजे विहिरीतल्या जलाशया-सारखं बंदिस्त पण आकाशदर्शन घेणारं होतं. विद्वानाला विद्याबाह्य प्रलोभन असू शकेल हे ऐकून असणाऱ्यांपैकीही अनंत काकबा नव्हते. सुखी संशोधकाचा सदरा देवाने त्यांना बहाल केलेला होता. जन्मभर तो त्यांच्या अंगाखांद्या-वर शोभला. मी त्यांना पहिल्यांदा पाहिलं तेव्हा तोच खमीस त्यांनी पेहेन-लेला होता. भगव्या रंगाची त्याच्यावर किंचितशी झूल होती. विशेष म्हणजे विद्वानांच्या ज्या घोळक्यात मी त्यांना पाहीलं त्या तो स्वच्छ धुपका अंगरखा फक्त त्यांच्याच तेवढा अंगावर होता. उरलेले सारे तुमच्याआमच्यासारखे सुटाबुटात होते–होते, किंवा, नव्हते–नव्हता. त्यांनी तेव्हा पन्नाशी ओलांडली होती. चढावावर ओझं वाहून नेणाऱ्या हेल्यासारखे ते थकलेले वाटल. व्याकुळ भासले. आपण घोटभर पाणी मागतो तसं त्यांनी श्रोत्यांकडून चित्ताचं अवधान मागितलं श्रोते तरी किती असावेत ? असतील आठ-दहा. फार–फार तर बारा. त्या बारातलेही पाच सहा पुन्हा त्यांचेच पीएच डी. चे शागीर्द. उर-लेल्यात एक त्यांच्या कार्यालयाचा शिपाई दत्तू; दुसरे दोन-तीन वेळेचं काय करावं हे कोडं न उलगडलेले रिकामे पेन्शनर्स; टपोऱ्या सफेद

भुवयांचे सुटाबुटातले रँग्लर गुंजीकर आणि बारावा गडी मी स्वतः ! तोकडं धोतर नेसलेले प्रियोळकर कुठल्यातरी जेसुईट पाद्र्याचं मराठी बाड, थंडगार सरबत घुटके घेत घेत प्यावं, तसे चवीने वाचीत होते. एक गुंजीकरकाका वगळता उरलेले आम्ही पलीकडच्या खिडकीतून दिसणाऱ्या संध्यासागराच्या लाटा मोजीत होतो समुद्र किनाऱ्यावरल्या मराठी संशोधन मंडळाच्या हपीसातल्या त्यांच्या प्रबंध वाचनाच्या क्रमिक सभा ह्या अशा समाजाकडून अस्पर्श लेखल्या गेलेल्या, अक्षुण्ण असत. पण प्रियोळकरांच्या खांद्यावर क्रूस होता. तो ते शांतचित्ताने वाहून नेत होते. एक चित्र काढा. त्यात निष्पर्ण वृक्ष दाखवा. त्याच्या फांद्यांवर दोन-तीन साळुंक्या बसलेल्या दाखवा. बस्स. कमी अधिक काहीही नको. मागे पार्श्वभूमीवर चंद्रोदय-बिंद्रोदय तर अजिबातच नको. फार फार तर झाडावर पडलेलं ऊन जरा तप्त दाखवा. ते जे चित्र तयार होईल, तेच अनंत काकबा प्रियोळकरांचं उग्रमंगल प्रतिक असेल.

मी सचिवालयात किंचित हपीसर होतो तेव्हाची गोष्ट. अनुदानाची वार्षिक गळ घालण्यासाठी ते त्या जुन्या किल्ल्याच्या एकशेछपन्न पायऱ्या चढून वर यायचे. आले की अत्यंत आदबीने टेबलासमोर उभे रहायचे. मग खळखळून हसत मोठ्याने विचारायचे, 'काय हो, कामाबिमात आहात काय?' नाही असं म्हटलं की स्वतःच खुर्ची ओढून घेऊन बसायचे. वास्तविक पहाता हा माणूस साहित्य संमेलनाचा माजी अध्यक्ष. शिवाय, विद्यापीठातल्या अनेक गोष्टींच्या नाड्या हाती ठेवून असलेला आणि मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री असलेल्या बाळासाहेब खेरांचा परसनल फ्रेंड. म्हणजे वास्तविक पहाता आम्ही चाकरमान्यांनी त्यांना टरकून असायला हवं होतं; उठून त्यांना जुलुमाचा रामराम करायलाच हवा होता. पण प्रियोळकरांच्या शब्दात एक कौटुंबिक जिव्हाळा होता. ते आल्या आल्या माझ्या आईवडिलांचे कुशल विचारीत. ते म्हणे म्युन्सीपाल्टीत किंचित हपीसर होते तेव्हा प्राथमिक शिक्षक असलेले माझे आईवडील त्यांच्याकडे पगारपत्रक घेऊन जायचे ! इतर कुशल विचारून झालं की मी लग्नाला उभा आहे की नाही ते माझ्या कानाजवळ झुकून खाजगीतल्या स्वरात विचारत. तो अध्याय संपला की थेट मुद्द्याला भिडत. ग्रँट वाढवा म्हणत. म्हणत, 'मी दरमहा तीनशे रुपयांवर खपतोय. पण तृप्त आहे. मला महागाई भत्ता नको, घरभाडं नको, प्रवास भत्ता नको. काही नको. पण एक असिस्टंट हवा. इतक्या प्रचंड प्रमाणावर मला जुनी बाडं मिळताहेत, की त्यांची शिस्तवार छाननी करणं माझ्या एकट्याच्याने शक्य होत नाही. बरं, मी काय आज आहे, उद्या नाही. जुन्या वाङ्मयाच्या संशोधनाचं काम मात्र पुढे चालूच रहाणार आहे. तेव्हा तुम्ही मला एक असिस्टंट द्या. मी त्याला व्यवस्थित ट्रेन करतो. पैसे फार नकोत. दीड-दोनशे दिलेत म्हणजे डोक्यावरून पाणी गेलं

बघा. वर्षाचे अडीच हजार वाढवून द्या.' मग बरोबर आणलेली ब्राडं दाखवीत. म्हणत, 'हे आपल्या मातृभाषेचं धन आहे पण त्याचं रक्षण करावं असं कुणालाच वाटत नाही. पोर्तुगीज राजवट नीच खरी. पण जुने कागदपत्र नीट जपून ठेवण्याचा त्यांचा अट्टाहास नि साक्षेप अगदी कित्ता घेण्यासारखा आहे. चारशे वर्षांपूर्वीचा कागद ते कॅटलॉग पाहून पाच मिनिटांत तुमच्या पुढ्यात टाकतील आणि आपल्या इकडे? कालच्या विष्णुशास्त्र्यांचं अक्षर माझ्यासमोर हजर कराल तर बक्षीस देईन!'

दुर्दैव असं की विद्याभिलाषी प्रियोळकर त्या चिरेबंदी किल्ल्याच्या पायऱ्या उतरून गेले रे गेले, की त्याच जिन्याने काही सोशलवर्कर्स वर यायचे नि माझे कान फुंकायचे, 'त्या प्रियोळकरांच्या नादी कसले लागता? काही वाढवून देऊ नका त्यांची ग्रँट. म्हणावं, तुला वाटतं ना जुनी पुस्तकं जपून ठेवावीत म्हणून, मग जा श्रीमंतांकडे नि उपट की त्यांच्याकडून देणग्या तुझ्या हौसेचा बोजा सरकारी तिजोरीवर काय म्हणून?' माझी बुद्धीही त्यावेळी विपरीत ग्रहदशेने ग्रासलेली होती. सोशलवर्कर्सचं म्हणणं मला पटे! निष्ठुरपणे मी प्रियोळकरांना विचारी, 'प्रियोळकर, तुम्ही धनिक मंडळींना गाठा बुवा. तुम्ही सरकारी पैसा उचलायचा, पुस्तक लिहायचं नि स्वतः नाव कमवायचं, हे काही खरं नव्हे. तुमच्या कामाचं सरकारला काहीच क्रेडिट मिळत नाही. अडीच हजार रुपये देऊन तुमची खासगी हौस भागवण्यापेक्षा तेच पैसे आम्ही एखाद्या रात्रशाळेला दिले तर चार पोरं तरी अन्नाला लागतील.' प्रियोळकर सावध असत. म्हणत, 'हे तुम्ही अंगचं बोलत नाहीत. तुम्हाला दुसऱ्यांनी फितवलेलं आहे. पण कधी तरी त्या तुमच्या सल्लागार सोशलवर्कर्सचे अकाऊंटस् तपासा, मग डोळे उघडतील. मी महिन्याचा पगार घेतो, त्याच्या तिप्पट ते सोशलवर्कर्स सरकारी ग्रँटमधला पैसा टॅक्सीभाड्यात उडवतात! पण आपल्याला त्याच्याशी कर्तव्य नाही. मला काही विद्येचं काम करायचं आहे. त्यासाठी मी चारी बाजूंनी शब्द पेरीत असतो. युनिव्हर्सिटीची ग्रँट मिळवतो. माडगावकर ट्रस्टची दहा हजाराची देणगी मी माझ्याच शब्दावर आणली. मोरोपंतांच्या वाङ्मयासाठीही जोश्यांकडचे पैसे मीच आणले आहेत. पण आजकाल श्रीमंत माणसांकडून पैसा निघत नाही हो. मोफतलालकडे शब्द टाकायचा आहे. पण बरोबर कोण तरी बडा माणूस हवा. मी हा असा. माझ्यासाठी सप्पाटून काम लागलेलं. मी माझं काम करू की पैसे गोळा करू? तशात, मी आज आहे – उद्या नाही. ही विद्येची कामं होणार कशी? नव्या पिढीवर विसंबलो तर संपलोच. कारण नव्या पिढीला पाठचिकित्सेमध्ये रस नाही. तेव्हा हे माझं काम मीच केलं पाहिजे. नि ते सुकर होण्यासाठी मला अनुदान हवंय. कळलं? लक्षात आलं ना मी काय

म्हणतोय ते ?'

प्रियोळकरांच्या म्हणण्यात न पटण्यासारखं काय होतं ? आम्ही हुरूपाने कामाला लागलो. नोटस् लिहिल्या. मंत्रीमहाशयांनी मराठी संशोधन मंडळाला लव्याजम्यासकट भेट दिली. चहापाणी झालं. आश्वासनं उधळली गेलां. प्रियोळकरांना सार्थक झाल्यासारखं वाटाव, इतकी त्यांची चहा झाली. पण कुठे तरी नमनालाच जो नाट लागला तो लागलाच. एकदा खान्देशी दुष्काळ आडवा आला. मग बिहारचा नेमेचि येणारा दुष्काळ उभा राहिला. तिसऱ्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचा लढा आडवा आला. चौथ्यावेळी चिन्यांच्या आक्रमणाचा कोलदांडा घातला गेला. पाचव्या वेळी पाकिस्तानी युद्ध मुळावर आलं सहाव्या वेळी मी आकाशवाणीशी पाट लावला आणि सातव्या वेळी खुद्द प्रियोळकरच वार्धक्यामुळे सेवानिवृत्त झाले !

मात्र त्या दहा वर्षांत प्रियोळकरांची नि माझी खूप दोस्ती झाली. खात्री झाली की ते वाटतात तसे कंक नाहीत. एककल्ली, एकमार्गी आहेत. घमेंडखोरही आहेत. मात्र ती घमेंड उपद्रवी नव्हती. त्यांची घमेंड म्हणजे ज्ञानी माणसाला वाटणाऱ्या आत्मप्रौढीचं निरुपद्रवी पण कंगोरेदार रूप होत. ते असावं निरुपद्रवी घमेंड व्यक्तिमत्त्वाला शोभा देते ते माझ्या घरी येवू लागले. नेमके सकाळी यायचे. आल्या आल्या म्हणायचे, 'अहो, चहा-कॉफी काहीही नको हं.' मी विचारलं, 'तुम्ही नेमके सकाळी साडेसातलाच कसे काय येता ?' म्हणाले, 'रोज सकाळी मी समुद्रावर जातो.' ते सारस्वत. मीही सारस्वत. म्हणून त्यांनो खास सारस्वती प्रश्न



विचारला, 'मासळीसाठी काय? छान मिळते मासळी?' तर उत्तरले, 'छे छे! मला मधुमेहाचा विकार आहे. रक्तदाबही आहे. त्यावर भरपूर चालणं हाच उपाय आहे. शिवाय सकाळी समुद्रकिनाऱ्यावर ओझोन वायू असतो. त्यामुळे आपली तब्बेत छान राहाते. नि मी मासळी न खाणारा गोंयकार सारस्वत आहे. पण मासळी खाणं चांगलं. तुम्ही भरपूर मासे खा. जोडीला पालेभाजीही खा.' योगायोग असा की प्रियोळकरांचं घरात पाऊल पडलं की पाच मिनीटात दारात कोळीण मासळीची टोपली घेऊन हजर व्हायची! घरात मासे येवून पडले की साहजिकच माझा मूड लागायचा. एकदा त्या मूडच्या भरात मी म्हणालो, 'बाकी काही म्हणा प्रियोळकर, मुंबई महाराष्ट्राला मिळो वा न मिळो, मुंबईत आपलं सारस्वतांचं निशाण डॉ. भाऊ दाजी लाडांनी भाऊचा धक्का बांधून कायमचं रोवलंय.' ते एकदम चमकून म्हणाले, 'छे हो, कुणी हे खूळ भरलय तुमच्या डोक्यात? डॉ. भाऊ दाजी लाडांचा नि भाऊच्या धक्क्याचा काहीही संबंध नाही. लक्ष्मण रामचंद्र अजिंक्य नावाच्या सी. के. पी. माणसाचा तो पराक्रम आहे. त्याला भाऊ म्हणत. हा भाऊ अजिंक्य रसेल नावाच्या इंग्रजाकडे नोकरीला होता. मालकाचं आडनाव त्याला चिकटलं नि लोक त्याला भाऊ अजिंक्य।ऐवजी 'भाऊ रसेल' म्हणायला लागले. पुढे रसेलचं रसूल झालं आणि जुन्या मुंबईच्या इतिहासात त्याची नोंद 'भाऊ रसूल' अशी आहे. ह्या भाऊ रसूलने, म्हणजेच लक्ष्मण रामचंद्र अजिंक्याने तो धक्का बांधला. म्हणून तो भाऊचा धक्का!'

हे ऐकून मी पार चक्रावून गेलो. तशी ते म्हणाले, 'डॉ. भाऊ दाजी लाड कुठे रहात होते माहीत आहे तुम्हाला?' मी म्हणालो 'नाही.' त्यावर ते कळवळून म्हणाले, 'अहो, तुम्ही ज्या ह्या आत्मारामाच्या बिल्डिंगात रहाता आहात ना, ह्याच बिल्डिंगात सध्या तळमजल्यावर जिथे रूपजी रहातात त्याच जागेत तळमजल्यावर डॉ. भाऊ दाजी रहात असत. त्या ओट्यावरच त्यांनी विष्णुदास भाव्यांच्या पहिल्या मराठी नाट्यप्रयोगाची तिकीटं विकली होती. आणि आपण लोक किती नतद्रष्ट आहोत सांगू? ह्या भाऊ दाजींची एक लाख पुस्तकांची खाजगी लायब्ररी होती म्हणतात. आज त्यातलं एकही पुस्तक कुठे उपलब्ध नाही. सांगा, कुठे गेले ते एक लक्ष ग्रंथ? न्यायमूर्ती तेलंगांची हजारो ग्रंथांची प्रचंड लायब्ररी होती. त्यातलं आज एक पुस्तक तरी कुठे दिसतंय? फक्त दादाभाई नौरोजींच्या खाजगी पुस्तक संग्रहाची तेवढी नीट व्यवस्था लागली. तो सर्व संग्रह जोगेश्वरीच्या इस्माईल कॉलेजात आहे. बाकी इतरांची पुस्तकं निव्वळ वाऱ्यावर उडाली. बरं, ते जाऊ दे, डॉ. भाऊ दाजींची अपूर्वाईची गोष्ट कुठली सांगा पाहू.'

माझा तो विषय नाही. मी काय सांगणार?' मी सांगितलं.

'मग ऐका तर. माझा तोच विषय आहे. डॉ. भाऊ दाजींकडे औषधोपचार करून घेण्यासाठी परदेशाहूनही रोगी यायचे असा तो अचाट धन्वंतरी होता. त्यांची वैद्यकातली कीर्ती अमेरिकेपासून ऑस्ट्रेलियापर्यंत पसरलेली होती. त्यात काही महारोगी तर न्यूझिलंडहूनही आले होते. डॉ. भाऊ दाजींनी त्या महारोग्यांना एका गावठी फळाचा लेप लावून व्याधिमुक्त करून दाखवलं. त्या फळाची नोंद त्यांना केलेली होती. त्या नोंदीवरून पायपीट करून मी ते महारोग निर्मूलन करणारं फळ मिळवलं आहे. मला ते गोव्यातल्याच झाडावर मिळालं. मी नमुना म्हणून ते माझ्या घरी आणलं आहे. आणल्यानंतर मी केंद्रीय आरोग्य मंत्रालयातल्या अधिकाऱ्यांना कळवलं की कुष्ठरोगावरली अमूक अमूक संजीवनी मिळाली आहे. तुम्ही तुमच्या संशोधकांना त्याचं पृथःकरण करायला सांगा. तर दिल्लीचं उत्तर आलं की जर तुम्हाला गरज असेल तर तुम्हीच ते फळ घेऊन दिल्लीला आम्हाला आणून द्या मग आम्ही त्यावर संशोधन करायचं की नाही त्याचा विचार! आता मी हा असा थकलेला. मी कुठे दिल्लीला जाऊ धडपडत? अशी उदासीनता आहे आपल्या देशात. कसा भाग्योदय होणार आपला? शेवटी एकदा मंत्रीमहाशयांची गाठ पडली. त्यांना त्या फळाची माहिती सांगितली. त्यांनी मग दिल्लीवाल्या ऑफिसरांना तंबी भरली, तेव्हा मग एकजण ते फळ पाहून गेला. बस्स. प्रकरण तेव्हापासून नुसतं पडून आहे. तुम्ही या घरी. मी दाखवतो ते फळ तुम्हाला'

दिल्लीवाले एक उदासीन तर आम्ही पडलो सात उदासीन. आज जाऊ उद्या जाऊ करीत करीत ते प्रकरण तेवढ्यावरच राहीलं. पुढे दुर्मिळ ग्रंथावर बोलायला मी त्यांना आकाशवाणीवर येण्याचं करारपत्र पाठवलं. ते सही न करताच त्यांनी परत पाठवलं. असं कसं झालं? प्रियोळकर सरकारी कागदाचा अनमान कधीच करीत नसत. तशात भारतीय ग्रंथ संरक्षण कायद्याच्या शताब्दी निमित्त खास कार्यक्रम आकाशवाणीने ध्वनिक्षेपीत करावा अशी खुद्द त्यांचीच सूचना होती. काही तरी घोटाळा आहे असं ताडून मी प्रियोळकरांच्या घरी गेलो. त्यांना विचारलं, 'करारपत्रावर सही का नाही केलीत?' तर म्हणाले; 'मला हल्ली सारखी चक्कर करते. त्यामुळे मी घराबाहेर पडतच नाही. आता यापुढे मी आकाशवाणीवर येऊ शकणारच नाही. तुम्ही दुसरा वक्ता शोधा.' मग ते म्हणाले, 'थांबा, तुम्हाला एक मजा दाखवतो.' आत गेले. कपाट उघडलं. आतून एक खडूच्या पेटीसारखी पेटी काढली नि ती उघडून माझ्यासमोर धरली. पेटीत वाळू होती आणि वाळूत ठेवलेलं एक गरगरीत पण सुकलेलं फळ होतं. ते दाखवून विचारलं, सांगा, हे काय आहे?' मी म्हणालो, हे बेलफळ आहे.' त्यावर हसून म्हणाले, 'चूक. साफ चूक. हेच ते डॉ. भाऊ दाजी लाडांनी कुष्ठरोगावरचं शोधून काढलेलं

औषधी फळ ! आमच्या गोव्यात ह्या फळांची हवी तेवढी झाडं आहेत. पण लोकांना ह्याचा औषधी उपयोगच माहीत नाही. नि आम्ही सांगितला तर जाणती मंडळी पूर्णपणे उदासीन ! अरे, इतकी जिकीर करून हे फळ मी हुडकून काढलं, तर त्याच्याकडे बघायलाही तज्ज्ञ मंडळी तयार नसावीत ? इंग्लंड–अमेरीकेत शास्त्रज्ञ ह्यावर तुटून पडले असते '

ही सांगितली ही भेट त्यांच्या ' साहित्य सहवास ' मधल्या नव्या घरी झाली होती. त्यापूर्वी ते ऑपेरा हाऊसला दलाल आर्ट स्टुडीओच्या समोर, केनेडी पूलावर रहात असत. तिथे तर मी त्यांच्याकडे शंभरदा जात असे. प्रत्येक वेळेस ते नव्याने हस्तगत केलेलं दुर्मिळ पुस्तक, नाहीतर अप्राप्य हस्ताक्षर दाखवायचे. तसा त्यांचा दुर्मिळ ग्रंथाबाबतचा हातगुण काही औरच होता. त्यांना हमखास जुनी दुर्मिळ पुस्तकं मिळायची. एकदा तर जुन्या पुस्तकांच्या विक्रेत्याकडे १६८० सालातलं, म्हणजे शिवेछत्रपतींच्या मृत्यूसमयी लिहिलेलं डच भाषतलं पुस्तक त्यांना मिळालं ! सबंध भारतात इतकं जुनं पुस्तक कुणाच्या संग्रहात असेलसं वाटत नाही. दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. टागोर जन्मशताब्दीचे नगारे देशभर वाजत होते. रवींद्रांचं एक छोटेखानी चोरटं प्रेमप्रकरण फारपूर्वी मुंबईत होतं. तेव्हा ते तरुण होते. गिरगावात उतरले होते. त्यांची आणि अन्नपूर्णा तर्खडकर उर्फ ॲना ह्यांची प्रेमाची देवाणघेवाण झाली. ह्या नाजूक प्रकरणावर बंगालीत आता ग्रंथरचनाच उपलब्ध आहे. कलकत्त्याच्या श्री. बा. जोशींनी ' मनोहर ' मासिकात ' टागोरांची मैत्रिण ' असा त्या प्रकरणाचं बालबोधीकरण करणारा फार मनोरम लेख लिहिला होता. त्या लेखासाठी ॲनाचे चित्र मिळेना. तेव्हा प्रियोळकरांनी तर्खडकर घराण्याचे सारे कागद धुंडाळून ॲनाचे दोन फोटोग्राफस् मिळवून दाखविले. अन्नपूर्णेचा नवरा इंग्रज होता. त्याचं नाव लिडलहेड. एक फोटो त्या दांपत्याचा आहे. आणि अन्नपूर्णा ज्या शाळेत शिकली त्या शाळेतल्या पार्शी मुलींच्या घोळक्याचा दुसरा फोटो प्रियोळकरांनी दिला आहे. ॲना नंतर विलायतेत गेली. ती ख्रिश्चन झालेली होती. ती तिथेच मेली. आता स्कॉटलंडमध्ये अन्नपूर्णेची कबर आहे. कुणी सांगावं, कदाचित त्या थडग्याचाही फोटो प्रियोळकरांपाशी होता असेल. टागोरांच्या एका जुन्या पत्रावर ' ८, पालव ' असा पत्ता लिहिलेला आहे. मी प्रियोळकरांना विचारलं, ' हे ठिकाण नेमकं कुठे आहे ?' ह्या प्रश्नाचं नक्की उत्तर त्यांच्यापाशी नव्हतं. म्हणाले, ' गिरगाव रस्त्याला प्राचीन मुंबईत पालव म्हणत. त्या अर्थी टागोर कुठे तरी गिरगावच्या नाक्यावर उतरले असणं शक्य आहे. माझा अटकळ अशी आहे की सध्याच्या बॉम्बे बुक डेपोच्या मागे जी जुनी भाटवडेकरवाडी आहे, तिथेच ते उतरले असले पाहिजेत; कारण प्रार्थनासमाजाचे संस्थापक मामा परमानंद तिथे रहायचे. परमानंदांचा

कलकत्त्याच्या ब्रह्मोसमाजाशी संबंध नि टागोर हे ब्रह्मोसमाजाच्या शाखेतलेच. तेव्हा ते तिथेच उतरले असणार. टागोरांची नि अन्नपूर्णा तर्खडकरांची ओळख तिथेच झालेली असणार.'

प्रियोळकरांची घरातली बैठक एकदम साधी असे. लिहिण्याचं टबल, मला वाटतं, नव्हतंच. कधीही गेलं तरी उघडेबंब प्रियोळकर नुसत्या जमिनीवर उपडी मांडी घालून, पाठांत वाकून पुस्ती गिरवावी तसे वाचीत वा लिहित बसलेले असत. अंगात सदरा तर कधीच नसे. कवितेच्या चरणाचा शुद्धपाठ पक्का करण्यासाठी बँकेच्या लेजरबकासारखे आडव्या उभ्या रेघांच्या चौकटी असलेले एक जाडजूड लेजर त्यांच्याशी असे. त्यातल्या एकेका चौकडीत ते कवितेच्या चरणाचे एक एक अक्षर लिहित. असे अनेक पाठ एका खालोखाल ओळीत भरत आणि शेवटी तळाच्या ओळीत शुद्ध पाठाची अक्षरे ठरवून भरत. असे पाठशुद्धीचे आखीव लेजर मी त्यांच्याकडेच पाहिले आणि त्यानंतर आजपावेतो कुणाकडेही तसली लट्ठंभारती वही पाहिलेली नाही. त्यांचं अक्षर मोठं टपोरं होतं. त्या टपोऱ्या, टवकारून पाहणाऱ्या, खानदानी अक्षरांनी ते पानंच्या पानं एक प्रकारच्या मस्तीत भरून टाकीत. हातात पुस्तक नाही अशा अवस्थेत माझ्या शंभर खेपात मी प्रियोळकरांना कधीच पाहिलं नाही.

घरी गेलं की हजार विषय निघत. माझ्या लग्नाचाही विषय हमेशा निघे. ते मला त्यांच्या नात्यातल्या मुली मोठ्या अगत्याने सांगून आणीत. वात्सल्याने सांगत, 'बालबोध बायको करा.' त्यांच्या घरात भिंतीवर एक फोटो होता. त्यात प्रियोळकर होडीत बसून कुठे तरी चालल्याचा देखावा होता। मी विचारलं, 'ह्या होडीतून तुम्ही कुठे हो निघाला होतात?' तर म्हणाले, 'अहो, तो कारवारच्या साहित्य संमेलनाचा फोटो आहे. मी काळी नदी ओलांडून पलीकडे कारवारला जातानाचा तो फोटो आहे. आणि तुम्हाला एक सांगू का, हे साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मला त्यावेळची काळाची गरज म्हणूनच दिलं गेलं. कारवार महाराष्ट्रात यावा म्हणून मी भक्कम पुरावा देत होतो. संयुक्त महाराष्ट्रवाल्यांना ते फायदेशीर होतं. म्हणून त्यांच्या स्वार्थासाठी त्यांनी मला मोठं स्थान दिलं. भाषिक राजकारणाचा प्रश्न नव्हता तर भटजीलोकांनी मला संमेलनाध्यक्ष कधीच केलं नसतं.'

प्रियोळकर सारस्वत. मीही सारस्वत. तशात आमच्या कुलदैवताची, म्हणजे श्रीमंगेशाची वसती त्यांच्या प्रियोळगावात. त्यामुळे प्रियोळकर एका परीने आमचे यजमानच. त्यामुळे जगाच्या पाठीवर कुठेही दोन सारस्वत भेटल्यावर ज्या उमाळ्याने ज्ञातीवैभवाबद्दल बोलतात, त्या उमाळ्यानेच ते सारस्वतांची थोरवी मला परत परत सांगत. 'अरे, ह्या मुंबईचा संसार थाटला कुणी? डॉ. भाऊ दाजी लाडांनी. हिंदु लॉ रचला कुणी? जस्टीस तेलंगांनी.

संस्कृत विद्येची उपासना रे कुणी केली ? सर रामकृष्णपंत भांडारकरांनी. पहिली मराठी ऐतिहासिक कादंबरी कुणी लिहिली ? गुंजीकरांनी. मराठीतली पहिली डिटेक्टीव्ह नॉव्हेल कुणी लिहिली ? सूर्याजी महात्म्यांनी. मराठीतलं पहिलं बालवाङमय कुणी लिहिलं ? डुकल्यांनी. ते सोडा. महात्मा गांधींचे आश्रमीय जीवनातले उजवे नि डावे हात कोण ? धर्मानंद कोसंबी आणि काका कालेलकर !

काकांचं कोकणी भाषेचं राजकारण म्हणजे शुद्ध चावटपणा आहे. तो भाग सोड. लाडांपासून अगदी रावांपर्यंत एक जात सगळे मोक्याच्या जागेचे बडे आय. सी. एस. ऑफीसर्स आपल्यापैकीच होते, आज आहेत नि यापुढेही रहाणार आहेत.' प्रियोळकरांना अधिक आनंद व्हावा म्हणून जुन्या रंगभूमीवरल्या कै. दत्तोपंत हल्याळकरांपासून नव्या रंगभूमीवरल्या रत्नाकर मतकरींपर्यंत मोजून शंभर सारस्वत कुलोत्पन्न मराठी नट-नाटककारांची नावं मी त्यांना परत परत सांगे. त्यांचा हर्ष वर्धमान होई ! मग ते चहाची ऑर्डर सोडत. चहाबरोबर खाणं मस्त येई. गोव्यातले काजूचे लाडू असत. चिवडा असे. ओल्या खोबऱ्याचे तुकडे असत. पोट भरे. हे दरवेळी घडे. एकदा मी विचारलं, "इतका खर्च तुम्हाला परवडतो कसा ?" ते म्हणाले, 'प्रियोळला आमची सुपारीची बाग आहे.'

नवा तरुण विद्यार्थीवर्ग संशोधनाकडे वळत नाही आणि संशोधकांची समाजाला फिकीर नाही, ही प्रियोळकरांची दोन कायमची दुखणी होती. त्यांच्या गप्पांची सम ठरलेलीच असे. पुन्हा पुन्हा विव्हळून ते म्हणत, 'अरे, माझ्याकडे इतकं मटेरीयल आहे—इतकं मटेरीयल आहे की मी वेळेला पंचवीस पी. एच. डी. तयार करीन. मदत करायला मी तयार आहे. पण विद्यार्थीच पुढे येत नाहीत ! हे सगळं भांडार माझ्याबरोबर नष्ट होणार.' प्रौढ कुमारीकेला संसार करायची तहान लागावी तशी प्रियोळकरांना विद्वान विद्यार्थी तयार करण्याची विलक्षण तहान लागली होती. सुकलेल्या गळ्यांनी ते हिंडत होते. पण विद्यार्थ्यांच्या चंचल पायाखालच्या पाऊलवाटा वेगळ्याच कुरणांकडे जात होत्या. एकदा सकाळी माझ्या घरी येऊन म्हणाले, 'अहो, तुम्ही पीएच. डी. का करीत नाही ? करता का माझ्या हाताखाली ? लागतील तितके विषय सुचवतो तुम्हाला.' मी टाळाटाळ केली. पण आपला मुद्दा ते सतत रेटीत राहिले. मग कंटाळून मी म्हटलं, 'शेक्सपियरची नाटकं मराठीत आल्याला आता शंभर वर्षं पुरी होताहेत. तर एका शतकातला शेक्सपियरचा मराठी अवतार हा विषय घेतो. ठीक ?' तर ते तीव्र नापसंती दाखवीत म्हणाले, 'हा काय विषय झाला ? तसं नको. जेसुईटांचा दोनशे वर्षांचा खाजगी पत्रव्यवहार माझ्याकडे आहे. त्यातल्या शब्दसंग्रहावर आणि बायबलच्या त्यातल्या शब्दसंग्रहावर संदर्भावर तुम्ही काम करा. ते सॉलीड वर्क होईल.'

एक वेळ काळा झगा चढवून मी साक्षात प्रवचन देईन, पण ह्या असला जेसुईटांचा मानमोडू विषय मी हाताळणार नाही, असे शब्द माझ्या ओठावर आले होते. पण प्रियोळकरांच्या व्याकुळ नजरेपुढे माझी वाचाशक्ती लुळी पडली. त्यानंतर पुढचे सहा महिने प्रियोळकरांनी उत्कट प्रेमाने मला हैराण केलं. नेहमी भेटले की हातवारे करीत पहिला प्रश्न करीत, 'मग ते आपल्या थेसिसचं काय झालं हो?' थेसिसचं थंड थडगं बांधून मोकळा झालेला मी त्यांना चाहूल न लागेल अशा बेताने केव्हाच आकाशवाणीत डेरेदाखल झालेला होतो.

तेही शुभवर्तमान त्यांना कळलं. मग भेटले. उभ्या उभ्याच म्हणाले, 'रेडीओचं प्रयोजन काय आहे? ह्या संस्थेचं कार्य काय?' त्यांची फिरकी घेण्याच्या दुष्ट हेतूने मी सांगितले, 'समाजात जे पहिल्या दर्जाचे कलावंत—साहित्यिक—कवी असतात त्यांना त्यांचं नांव व्हावं म्हणून रेडिओची काडी-इतकीही गरज नसते. उदाहरणार्थ रवीशंकर, अमीरखान, कुमार गंधर्व किंवा कुसुमाग्रज, श्री. ना. पेंडसे, दुर्गा भागवत वगैरे. पण ह्या पहिल्या दर्जाच्या क्षेत्रात उतरून पराभूत झालेली दुय्यम, तिय्यम दर्जाची खूप मंडळी आसपास असतात. पराभवामुळे हे लोक आतून कुठे तरी खचलेले असतात. पहिल्या दर्जाच्या क्षेत्रातून आपली हकालपट्टी झालेली त्यांना आतल्या आत नीट कळलेली असते. अशा दुखरू माणसांना थोडासा दिलासा देणं. 'अरे यार, तुम्हीही कुणी तरी आहात, तुमच्यापाशीही गुण आहे' असं त्यांना सांगत राहणं, हे समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने अगदी आवश्यक आहे. नाही तर दुखरू माणसं निराशेच्या भरात मानसिक अत्याचार करतील; एक अदृष्य असं हत्याकांड घडेल. ते टळावं आणि पराभूत माणसांचा अहंभाव त्यांच्यापरीने पोसला जावा, आणि श्रोत्यांनाही थोडीशी कळ सोसण्याची आस्ते आस्ते सवय व्हावी, हा आकाशवाणी चालवण्यामागचा हेतू असावा बापडा!' माझं रामायण ऐकून ते चक्रावून गेले. तावातावाने हातवारे करीत म्हणाले, 'छे-छे! तुमचा काही तरी घोटाळा झालाय. सामान्य माणसात विद्येची अभिरूची निर्माण व्हावी, त्याच्या कानावर दोन मंगल शब्द पडावेत, समाजाची उन्नती व्हावी, हे तुमच्या आकाशवाणीचं अवतारकृत्य आहे. पराभूत मंडळींचा अहंभाव पोसणं, वगैरे भानगड तुमच्या डोक्यात कुणी भरवली?' मग ते खळखळून हंसले नि म्हणाले, 'हल्ली मी एक पाहून ठेवलंय, तुम्ही नवी मंडळी मुद्दाम चित्र तिरकं टांगता नि लोकांची मजा बघता! पण काय हो, तुम्ही आकाशवाणीवर का गेलात?' ह्यावर दोन मिनिटं आकाशाकडे बघण्याचं नाटक करून मी म्हणालो, 'चंगळ करायला!' त्यावर प्रियोळकरांनी कपाळाला हात लावला. वर्ष ओलांडल्यावर मला मग पहिलाच प्रश्न केला. 'काय, कशी काय चाललीय तुमची चंगळ?' त्यावेळी

कपाळाला हात लावायची पाळी माझी होती !

बाकी, आकाशवाणीच्या अवतारकृत्याविषयी त्यांच्या डोक्यात काही तरी वेगळाच गॅस होता ह्यात शंकाच नाही. एकदा सकाळी घरी आले नि माझ्या हातात लांबोडके बाड देत म्हणाले, 'ही माझी नाटीका घ्या नि रेडीओवर करा.' मी अक्षरशः भेदरलो. प्रियोळकरांनी आकाशवाणीसाठी श्रुतिका लिहिणं आणि शंकराचार्यांनी लाडे लाडे भावगीत लिहिणं सारखंच ! मी ते बाड सोडलं. आत पिवळे पडत चाललेले जुनाट कागद होते. त्यावर पेन्सीलीने लिहिलेले, पुसट होत चाललेले संवाद होते. मी विचारलं, 'हा काय प्रकार आहे ?' ते म्हणाले, मी पूर्वी – म्हणजे फारच पूर्वी हा नाटिका लेखनाचा उद्योग केला होता. परवा जुन्या कागदपत्रात हे मिळालं. म्हटलं, अनायसे हाताला लागलेच आहेत कागद तर देवूया पिग्यांकडे.' मी पहिलं पान वाचलं. तद्दन भिकार होतं. त्यांचं बाड नीट बांधून परत करीत म्हटलं, 'आता लोकांची अभिरूची खूप बदललाय. विषयही बदलले आहेत. विषय मांडायची घाटणीही बदललाय.' बाड परत स्वीकारीत ते शांतपणे म्हणाले, 'मला वाटलं होतंच तसं. आमचं ललित–लेखन हा एक स्वतंत्रच विषय आहे ! आमचे बंधू गोव्यात 'स्वयंसेवक' नावाचं मासिक चालवीत असत. मी त्यात वाङ्मयाचे सगळे प्रकार हाताळले आहेत. कविता तर खूपच लिहिल्या होत्या. एक आपली मजा म्हणून सांगितलं.' बोलून आल्या मार्गाने प्रियोळकर शांतपणे निघून गेले. 'साभार परत' हा शब्दप्रयोग प्रियोळकरांना उभ्या आयुष्यात एकदा का होईना, पण भेटवायचाच, ह्यास्तव तर नियतीने माझी नेमणूक केली नव्हती ? आपलं साहित्य दुसऱ्याच्या दारात घेऊन जाणाऱ्यांपैकी प्रियोळकर नव्हतेच नव्हते.

पैसा, विशेषतः पैशांची हाव माणसाला मिंधं बनवते आणि मिंध्या माणसाला निस्पृह विद्वानाची पायरी गाठता येणं अशक्य होय हे सत्य प्रियोळकरांना एकशे एक टक्के पटलेलं होतं. त्यामुळे ते कुठल्याही कामाचे पैसे म्हणून कसे ते स्वीकारीत नसत. अनेक सरकारी कमिट्यांवर विनावशिला त्यांची नेमणूक व्हायची. कमिटीचे इतर सभासद भत्ते खात. प्रियोळकर पैला शिवत नसत. हक्काचे पैसेही घेत नसत. कमिटीच्या कामानिमित्त त्यांना प्रवास करावा लागे. तो ते स्वतःच्या खाजगी पैशांनी करीत. त्यामुळे इतर सभासदांची फार कुचंबणा होई. अनेकवेळा मी रदबदली केली, की तुम्ही गैर पायंडा पाडताहात. त्यांनी ढीम केलं नाही. सोपवलेलं काम तर ते विलक्षण काटेकोरपणे करीत. ठरलेल्या वेळेच्या आधी हजर होत. वैदिक पंडितांचा पहिला सरकारी सत्कार विजयालक्ष्मी पंडित मुंबईच्या राज्यपाल असताना त्यांच्या मलबार हिलवरल्या राजेशाही बंगल्यात झाला. मी त्या समारंभाचा मुकादम होतो.

दोन घंटे अगोदर गेले नि व्यवस्थेवरून नजर फिरवू लागलो तोच प्रियोळकर उगवले. त्यांना इतक्या लवकर आलेलं पाहून मला फार आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, 'गव्हर्नरकडचं बोलावणं आलं. म्हटलं आपल्याकडून उशीर नको.' मग ते एकटेच त्या सागरदर्शन दालनात राहिले. आजूबाजूला दोनशे रिकाम्या खुर्च्या नि मध्ये काळी टोपी घालून देवासारखे गप्प बसलेले राजनिष्ठ प्रियोळकर! असा तास-दीड तास गेला. आमंत्रितांपैकी एकही जण आला नाही. पण प्रियोळकरांनी ना केली चुळबूळ की ना पाहीलं आजूबाजूला. गव्हर्नरबाईंच्या रिकाम्या आसनाकडे एकटक दृष्टी लावून ते डोंगरकडयावर बसलेल्या घारीसारखे निश्चल बसून राहीले.

प्रियोळकर म्हातारे नेमके केव्हा झाले? जसे इतर लोक होतात तसेच झाले. मात्र ते लक्षात नेमकं केव्हा आलं ते सांगतो. प्रा. गिरीश भावे हा त्यांचा विद्यार्थी. तो चांगल्या रितीने उत्तीर्ण झाल्यावर पेढे द्यायला गुरुवर्यांकडे गेला. गुरुवर्यांनी त्याला ओळखलंच नाही. म्हातारपणाची छाया इथून सुरू झाली. म्हणाले, 'तुम्ही कोण?' इतिहास-भूगोल कळल्यावर म्हणाले, 'अच्छा! तर तुम्ही आमचे विद्यार्थी!' भावे म्हणाले, 'मी तुमच्यापाशी पीएच. डी. करायचं ठरवलं आहे.' वास्तविक पहाता हे वाक्य ऐकल्यावर ज्ञानाची पाणपोई घालून बसलेल्या प्रियोळकरांनीच पेढे वाटायला हवे होते. तसं झालं नाही. थंडपणे म्हणाले, 'नको. माझ्या छातीत कळ आलेली आहे. केव्हा संपेन नेम नाही. तुमचा थिसीस अर्धवट पडेल. तेव्हा दुसरा गुरू करा.' संध्याछाया प्रियोळकरांच्या अंगणात पडू लागल्याचा हा निश्चित पुरावा.

ज्या क्षणी प्रियोळकरांनी नवा विद्यार्थी स्वीकारणं बंद केलं, त्या क्षणी ते ते उरले नाहीत. वेगळाच अंगरखा पांघरून प्रियोळकरांनी मग स्थानांतर केलं. वांद्र्याला कोन्या वास्तुत आले. भौतिक सुबत्ता, दुर्मिळ ग्रंथांची दौलत, डोक्यात खच्चून भरलेलं ज्ञानभांडार, त्यांच्या विद्याशाखेला फार थोर मानमरातब, अजब ज्ञाननिष्ठा, आणि विकलांग होत चाललेला जराजर्जर देह घेऊन आले. गृहिणी, मुलगी, जावई, नातू, अशा गोकुळात वावरून धन्य होत गेले. त्याच इमारतीत आमचा डॉ. सुभाष भेंडे राहायला आला. दोघेही गोवेकर सारस्वत. त्यांचं 'किते पुता?' सुरू झालं. रक्तदाबामुळे घेरी येई. भेंडे त्यांच्याकडे बसून विरंगुळयाच्या गप्पा मारी. भेंडे गेला नाही, तर खुद्द प्रियोळकर जिने चढून भेंडयांकडे जात नि गप्पा मारीत. आजारी होतेच. गृहिणी त्यांच्यासाठी झिजे. एकदा कळवळून भेंडेला म्हणाले, 'मी लग्न न करता आजन्म ज्ञानार्जन करायचं ठरविलं होतं. पण मला स्वयंपाकपाणी जमेना. जबाबदारीही होती. शेवटी लग्न करण्याचा निर्णय घेतला. मात्र मुलगी विद्याव्यासंगी कुळातलीच करायची ठरवलं. त्याप्रमाणे माशेलच्या करंडेशास्त्री नामक गरीब पण शुचिर्भूत

विद्वानाची बाळबोध मुलगी मी स्वीकारली. माझा संसार तिने पूर्णपणे फळाफुलाला आणला आहे. मला दोन मुली. मुलगा नाही. पण जावई इतके सुवृत्त आहेत की मुलं करणार ते त्यांनी माझं केलं. मुलांची जागा त्यांनी उत्तमरितीने भरून काढली. आता माझ्या घरात न्यून काही एक नाही. पत्नी ही सखी, सचिव, सहचारिणी असते हे मला माहीत होतं. पण पत्नी ही नवऱ्याची मातासुद्धा असते हे मला अनुभवाने पटलं आहे.' अनसूयाबाईंना यजमानांकडून मिळालेल्या ह्या उमाळ्याच्या शिफारसपत्राइतकं निस्सीम मधुरतम आर्यस्त्रीच्या आयुष्यात दुसरं काही असू शकेल काय?

धन्य गृहस्थाश्रम केलेले प्रियोळकर सत्तरी ओलांडल्यानंतर वेगळ्याच वाटेला लागले. आपला अमोल ग्रंथसंग्रह गोवा विद्यापीठाला प्रदान करण्याचं स्वप्न त्यांनी मला एकदा बोलून दाखवलं होतं. गोवा त्यांच्या जीवाचा कलीजा होता. पण गोवा विद्यापीठाचं घोंगडं तसंच भिजत पडलं आणि पायाखालची वाळू तर सरकू लागली. तेव्हा त्यांनी काही संदर्भ ग्रंथ नागपूर विद्यापीठाला, काही मुंबई विद्यापीठाला, असे वाटून टाकले. ग्रंथांचं वाटप केल्यावर ते तसे निःसंग झाले. मुंबईत पदार्पण केलं तेव्हापर्यंतच्या भागाचं आत्मचरित्र त्यांनी बसल्याबसल्या लिहिलं. भेंडेने त्यांच्या फुटकळ लेखांची जमवाजमव करून, त्यातील मुंबई विषयक आणि गोव्याबद्दलचे असे दोन भाग करून ते गोवा हिंदु असोसिएशनकडे प्रसिद्धीला दिले. प्रियोळकर खूष झाले. प्रियोळकर गौरवग्रंथाचीही जुळवाजुळव झाली. हा सर्व सोहळा ते कौतुकाने पहात होते.

फिरायला तर नेहेमीच जात. एकदा संध्याकाळी फिरायला गेले तर पाऊस झिमझिमला. त्यांची तारांबळ उडाली. धावत धावत घराकडे परतले. वाटेत घसरून पडले. निमित्त झालं. पाय दुखावला. इस्पितळात दाखल झाले. तिथे अनेक प्रकार झाले. शरीरात नवं रक्त भरावं लागे. म्हणत, 'आता माझ्या शरीरात माझं स्वतःचं असं थेंबभरसुद्धा रक्त उरलेलं नाही वाटल्यातल्या रक्तावर मी जगतोय.' घरी आले. गोकुळात सामील झाले. मात्र त्यांचं त्राण संपलं होतं. चालणं बंद झालं होतं. जन्मभर चालत आलेला हा माणूस ठाणबंद झाल्याबरोबर पुन्हा प्रकृतीचं काही तरी खुसपट निघालं. परत डॉ खांडेपारकरांच्या इस्पितळात दाखल झाले. तिथे लघवीत रक्ताच्या पेशी आढळल्या. चिकित्सा सुरू झाली. प्रथम कॅन्सर नसावा असं वाटलं. पण तो दबा धरून बसला होता. स्वप्नातही कुणाचं अहित न चिंतिलेल्या ह्या निस्वार्थ विद्वानाच्या वाटेला कॅन्सरने का जावं? पण नियती तर्कसंगती नि न्याय जाणत नाही. ती फक्त फासे टाकते. प्रियोळकर कमालीचे अशक्त झाले. भेंडेने त्यांना त्यांची पुस्तकं छापली जात असल्याचं मुद्दाम इस्पितळात भेटून सांगितलं. ते त्यांनी ऐकलं. नजरेत समाधान तरारलं. पण जिभेवाटे शब्द उमटेनात. जन्मभर ज्याच्या जिभेवर सरस्वती नाचली, त्याला शब्द सोडून गेले. धर्मानंद कोसंबी, ज्ञानकोशकार केतकर, कोशकार दाते, पु. मं. लाड, डॉ. पिसुर्लेकर, सुनीतीकुमार चटर्जी अशांच्या पंगतीतला हा जबरा सरस्वतीभक्त. पण वेळ आली तेव्हा त्याला शब्द पेलवेनात. बघता बघता डोळे फिरवले. दोन दिवस गाफील होते. मग शांतपणे दिवा विझला. अंधार झाला.

● ● ●

# सरन्यायाधीश नेमणूक
# लोकशाही समाजवाद्यांची भूमिका कोणती ?

वसंत फळणीकर

दि. २६ एप्रिलच्या वृत्तपत्रातील सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधिशांच्या नेमणुकीच्या आकस्मिक बातमीने लोकशाही आणि विशेषत: 'लोकशाही समाजवाद' मानणाऱ्यांपुढे मूलभूत प्रश्न निर्माण केले आहेत. सत्तारूढ काँग्रेस पक्ष आपल्या विचारसरणीत कुठल्याही एका विशिष्ट तत्त्वप्रणालीला असिधाराव्रताचे स्थान देऊ इच्छित नसल्यामुळे त्या पक्षातील नेत्यांपुढे अगर कार्यकर्त्यासमोर कुठल्याही तात्त्विक समस्या कधी निर्माणच होत नाहीत. कम्युनिस्ट पक्षाला सर्वोच्च न्यायालयातील या घटनेचे स्वागत करण्यापलिकडे गत्यंतरच नाही. कारण आजच्या घटकेला तरी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर सोव्हिएट युनियन आणि भारत यांची प्यादी 'परस्परपूरक' पद्धतीने हालत असल्याने इंदिराजींनी उचललेली सर्व पाऊले प्रगतीच्या दिशेने आहेत असे मानणे उजव्या कम्युनिस्टांचे 'ऐतिहासिक कर्तव्य' ठरते. भारतीय जनसंघ-स्वतंत्रादी पक्ष आर्थिक, राजकीय आणि सामाजिक या तीनही क्षेत्रात निर्भेळ लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असल्याने या सरन्यायाधीश नेमणुक प्रकरणी फक्त ज्येष्ठताक्रमाचा आधार घेऊन आपले व्यक्तिस्वातंत्र्यवादी राजकारण पुढे नेण्याचा अगदी अपेक्षित प्रयत्न हे पक्ष करतील. डावे कम्युनिस्ट 'डावपेच' (Strategy) म्हणून सरकारला विरोध करतील. पण मार्क्सवादी अर्थव्यवस्था आणि पाश्चि-मात्य लोकशाही यांचा संगम अपेक्षित असलेल्या 'लोकशाही समाजवाद्यांना' शृंगापत्तीत सापडल्यासारखे वाटत असल्यास नवल नाही. हे सारे प्रकरण समाजवाद्यांच्या लोकशाही निष्ठेला आव्हान ठरणार आहे.

सर्वोच्च न्यायाधीशांची नेमणूक 'ज्येष्ठताक्रमाने' करावी की आणखी दुसऱ्या काही तत्त्वानुसार करावी याबाबत घटनेच्या १२४ व्या कलमात काहीही मार्गदर्शन नसल्याने ही नेमणूक कदाचित 'घटनाबाह्य' ठरणारही नाही. परंतु या नेमणुकीच्या समर्थनार्थ सत्ताधाऱ्यांनी लोकसभेत आणि त्या-

बाहेर केलेले जाहीर युक्तिवाद समाजवादी मान्य करू शकतील का, हा खरा प्रश्न आहे. उदाहरणार्थ कायदेमंत्री गोखले यांनी लोकसभेत या प्रश्नांवरील चर्चेला उत्तर देताना केलेल्या पुढील विधानांचा लोकशाही समाजवाद्यांना गंभीरपणे विचार करावा लागेल.

श्री. गोखले म्हणाले, 'आम्हालाही घटनेशी प्रामाणिक राहून निर्णय देणारे स्वतंत्र आणि समर्थ सर्वोच्च न्यायासन हवे आहे. परंतु सतत जनहितासाठी कायदे करून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्विकारलेल्या सरकारला वरचेवर आपले मत फिरवणारे सर्वोच्च न्यायालय कसे परवडेल? अखेर कायदे करण्याचा अधिकार कायदेमंडळांना अनिर्बंधपणे वापरू दिला पाहिजे. सामाजिक कायद्यांच्या निर्मितीत कोर्टांची लुडबुड चालू देता येणार नाही.'

आपल्या देशाला जनतेच्या सुदैवाने (आणि कायदेमंत्र्यांच्या दुर्दैवाने !) लिखित राज्य घटना आहे. प्रौढ मतदानपद्धतीने निवडून दिलेली विधिमंडळे, लोकसभा आहेत आणि या संस्था घटनेच्या चौकटीत राहून कायदे करतात की नाही हे पाहण्याचे कार्य करण्यासाठी स्वतंत्र न्यायसंस्था आहेत. या साऱ्या गोष्टींचा सत्ताधारी पक्षाला १९७१ च्या मुदतपूर्व निवडणुकीतील घवघवीत यशामुळे विसर पडला असणे शक्य आहे. पण समाजवाद्यांना हे विसरून चालणार नाही. आता यापुढे सारे कायदेकानुन जनहिताचेच असतील आणि ते काँग्रेस पक्षामार्फतच अंमलात येतील असे कायदेमंत्री गृहित धरून चालले आहेत. याबाबतीत त्यांनी कट्टर कम्युनिस्ट भाई डांगे यांनाही मागे टाकले आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात मुंबई हायकोर्टात भाई डांगे यांच्या अटकेसंबंधी चाललेल्या सुनावणीचा निकाल देताना त्यावेळच्या न्यायाधीशांनी डांगे यांना सांगितले 'तुमचे म्हणणे जरी योग्य असले तरी सध्या आमच्यासमोर असलेल्या कायद्यात तुम्हाला मुक्त करण्याची तरतुद नाही.' यावेळी न्यायमूर्तींना भाई डांगे यांनी दिलेले उत्तर खरे म्हणजे कम्युनिस्टाला न शोभणारेच वाटते.. डांगे म्हणाले, 'महाराज, आपली अडचण मी समजू शकतो. परंतु मुंबई विधिमंडळाचा एक सदस्य या नात्याने मी आपणाला आश्वासन देतो, की माझ्यासारख्या अन्यायाने अटकेत असलेल्यांची मुक्त करण्याची तरतूद असलेला कायदा मी विधिमंडळातून घडवून आणीन.' वास्तविक त्यावेळी डांगे ह्यांनी आज कायदेमंत्री वापरतात त्या भाषेत न्यायमूर्तींना 'मला अनुकूल असलेला कायद्याचा अर्थ तुम्हाला लावता येत नसेल तर तुमचा काय उपयोग ?' असेच विचारायला पाहिजे होते.

लोकशाहीमध्ये न्यायासनाला एकाद्या विशिष्ट विचारसरणीने बांधून ठेवण्याचा विचारच भयानक आहे. कुमारमंगलम् आपल्या 'पोलादी' पूर्वाश्रमीच्या निष्ठेने हे विचार लोकशाहीच्या चौकटीत बसविण्याची धडपड करीत आहेत यात आश्चर्य मुळीच नाही. परंतु परवापर्यंत समाजवादी

पक्षात असलेले परंतु आज इंदिराजींचे नेतृत्व मानणारे श्री. साठे यांच्यासारखे खासदार सामाजिक प्रगतीच्या रथाची विधिमंडळ व शासन ही दोन चाके आहेत असे विचार नव्याने मांडू लागले आहेत ही खरी आश्चर्याची गोष्ट आहे. कुणी म्हणाले 'वारा कुठल्या दिशेने वाहतो आहे याची न्यायमूर्तींनी दखल घेतली पाहिजे ' हे वाचल्यावर पेशवेकालीन रामशास्त्र्यांपुढे चाललेल्या नारायणराव खुनाच्या खटल्यात ज्युरीतील 'सभ्य गृहस्थांना' राघोबाच्या सचिवांनी दिलेल्या 'यांना पुण्यात राहायचे आहे की नाही !' या धमकीची आठवण होते.

समाजवाद्यांना अभिप्रेत असलेल्या समाजरचनेत काही लिखित राज्यघटना राहणार आहे का ? या घटनेचे अर्थ लावण्याचे कार्य करण्यासाठी स्वतंत्र व समर्थ न्यायासन राहणार आहे का ? न्यायमूर्तींना समाजवादी विचारांचेच असावे लागणार आहे का ? विचारस्वातंत्र्य (अगदी समाजवादी विचाराला विरोधी विचार मांडण्याचेही स्वातंत्र्य) रहाणार आहे का ? युगोस्लाव्हियातील मार्शल टिटोच्या तुरुंगात खितपत पडलेल्या मिलोवान जिलासबद्दल भारतीय समाजवाद्यांना वाटणाऱ्या सहानुभूतीमागील प्रेरणा कोणती ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे समाजवाद्यांना द्यावी लागतील.

सध्याच्या राज्यघटनेला 'समाजवादी' लेणी न चढविण्याचा स्पष्ट निर्णय त्यावेळच्या घटनासमितीने घेतला होता तो कदाचित त्यावेळच्या परिस्थितीला अनुसरून घेतला असेल. आज जर ती राज्यघटना 'समाजवादी' ध्येयांच्या मार्गात अडथळा ठरत असेल तर नवी घटनासमिती बोलावून नव्या आदर्शांना पूरक अशी घटना तयार करवून घेतली पाहिजे. उगीचच कालबाह्य ठरलेल्या राज्यघटनेतील शब्दार्थांची ओढाताण करून सर्वोच्च न्यायालयात आपल्या हव्या असलेल्या न्यायाधीशांच्या नेमणुका करून म्हशीला गाय करण्याच्या सत्ताधारी पक्षाच्या हुकमशाही प्रयत्नाला समाजवाद्यांनी धैर्याने विरोध केला पाहिजे. आजपर्यंत देशात कुठल्याही विचारसरणीला न बांधलेले स्वतंत्र सर्वोच्च न्यायालय होते म्हणूनच सुरक्षितता कायद्यातील घटनाविरोधी कलमांना रद्द ठरवून डाव्या उजव्या शेकडो कम्युनिस्टांची तुरुंगातून मुक्तता होऊ शकली हे सत्य आज उजवे कम्युनिस्ट आपल्या राजकीय डावपेचांसाठी जाणूनबुजून नजरेआड करीत आहेत. समाजवाद्यांना हे राजकारण परवडणार नाही. उद्या दलितजनतेच्या हक्कांसाठीमागण्यांसाठी संप, निदर्शने, लढे करावे लागतील. त्यावेळी स्वसंरक्षणार्थ शासक भयानक दडपशाहीचे मार्ग स्वीकारतील. अशावेळी झालेल्या अन्यायांची दाद स्वतंत्र न्यायालयातच मागता येईल. शासनाचे धोरण लक्षात घेऊन निर्णय देणाऱ्या न्यायमूर्तींकडून कसल्या न्यायाची अपेक्षा समाजवादी करणार आहेत ?

सर्वोच्च न्यायाधीशांच्या नेमणुकीच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या भूमिकेला लोकशाही समाजवाद्यांनी प्रखर विरोध तरी केला पाहिजे नाहीतर 'लोकशाही' या उपपदाचा धैर्याने आणि जाहीरपणे त्याग तरी केला पाहिजे. ● ● ●

# पुन्हा पुन्हा घाशीराम

अवधूत परळकर

अमर हिंद मंडळाचं प्रेक्षकांनी खच्चून भरलेलं पटांगण. स्टेजवर रमेश तेंडुलकर, ब. दि. कुळकर्णी, धों. वि. देशपांडे, माधव मनोहर हे फर्डे वक्ते बसले आहेत. परिसंवादाचा विषय ओळखा पाहू ?...अगदी बरोबर ! विषय होता घाशीराम कोतवाल.

रात्रीच्या जेवणातला मिलो पचवून रसिक मुंबईकर जमलेत वसंत व्याख्यान-मालेला. सुरुवातीला माधव मनोहर उठतात—'तेंडुलकरांच्या अलीकडील नाट्यकृतींचा विशेष आपल्या लक्षात आला असेल, की ती वादग्रस्त असतात (हा देखील नाटकाचा विशेष असू शकतो तर...) एक नामवंत संस्था या नाटकानं मोडकळीस आणली. तेंडुलकर म्हणतात, हे अनैतिहासिक नाटक आहे... तर ही ऐतिहासिक कलाकृती आहे का ? हा मूलभूत प्रश्न आहे. (माधव मनोहर घाशीराम कोतवालला तेंडुल-करांनी लिहिलेली प्रस्तावना वाचून दाखवतात.) 'खाडीलकरांच्या नाटका-विषयी असं सांगतात की ती प्रचलित परिस्थितीतली रूपं असतात. इतिहास शोधण्याचा त्यात प्रयत्न करू नये. सवाई माधवरावांचा मृत्यु या नाटकावर जी टीका झाली आणि आज तेंडुलकरांच्या नाटकावर जी टीका होते त्यात मला फारसा फरक दिसत नाही. त्या नाटका-तला नाना आणि या नाटकातला नाना यात फारसा फरक नाही. (लिंगवाद निर्मूलनवाल्यांत कुजबूज—'स. माधव-रावांचा मृत्यु'चे पुढील प्रयोग बंद पाडण्याचा ते कट करू लागतात) त्या काळातला ब्राह्मणवर्गही खवळून उठला होता. एकदा एखाद्या पात्राचं नाव योजलं की इतिहास शोधणं प्राप्त असतं. राम, सीता नाव योजलं की रामायणाचा संबंध कुठेतरी येतोच. इथं टीका चालली आहे ती नाना स्त्रीलंपट होता की नाही यावर. तो होता. नानांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवलेय. आपला कटिशूळ जबरदस्त होता हे त्यानं लिहिलंय. पण इतिहासाला ठाऊक असलेला नाना नुसता स्त्रीलंपट नव्हता. तो चतुर आहे, मुत्सद्दी आहे. या नाटकात कुठंतरी याचं दर्शन व्हायला हवं की नाही ? याचा विचार व्हायला

हवा. राक्षस दाखवायचा होता तर घाशीरामचं नाव घेतलंच कशाला ?' हे नाटक ऐतिहासिक आहे किंवा नाही या वादात आपल्याला रस नाही असं सांगून माधव मनोहर नाटकाच्या प्रयोगाकडे वळतात. 'एकदा हे नाटक पहायला बसलो की आपण काहीतरी नितांतसुंदर पहायला बसलो आहोत असं वाटतं हे खरं. नाना नाटकात पदन्यास करतो, याला नानाला नाच्या बनवलं असा काही आक्षेप घेतात. मला समजत नाही. श्रीकृष्ण नाचलेला चालतो, पण शिवाजी नाचलेला चालत नाही. मराठीत हे नवीन आहे हे मान्य करायला हवं. या नाटकाचा आकारबंध अगदी वेगळा आहे. ठेका, लय चांगली आहे. पण नाटकात ठोबळ चुकाही आहेत. (माधव मनोहर चुका सांगतात). अनेकांना हे नाटक 'ऑफेन्सिव्ह' वाटलं. नानांचं चरित्र सर्वांगीण उमटायला हवं होतं. त्यांच्या इतर उद्योगापैकी एखाद्याचा तरी उल्लेख असायला हवा होता. यामागे हेतू काय ? तर तो एकच असू शकेल. नानांना बदनाम करायचा. (हे असू शकेल. ते असेल. माधवराव धूर्तपणे असले शब्दप्रयोग करत आहेत. ठाम विधान करत नाहीत. प्रेसवाले त्यामुळं अस्वस्थ होतात )

'गेल्या वेळीच मला मनगटी प्रयोगाचं दर्शन झालं होतं. आज जरा वातावरण निवळलं आहे. मनगटी प्रयोगानं प्रयोग बंद पाडणं वाईट. याविरुद्ध आवाज उठवणं भाग आहे. (आपण आता पुरेसा आवाज उठवला आहे असं समजून माधव मनोहर खाली बसतात. काळा चष्मा लावल्यामुळं व्हिलनसारखे दिसणारे धों. वि. देशपांडे माईकजवळ येतात.)

'पुनरुक्ती होण्याचा संभव आहे' (तमाम टीकाकारांचा आवाज बंद) मी नाटकाच्या बहिरंग आणि अंतरंगाबद्दल बोलणार आहे. या नाटकावर विविध प्रकारचे वाद झाले. दशावतार हे नाटकात नव्हतं का ? यक्षगान नव्हतं का ? मग हे नाटक आहे हे मान्य करावं लागेल. मी नाटक पाहिलेलं नाही पण वाचलंय. समूह नृत्य आणि समूह संगीत यांचा मिलाफ आहे. संगीताला बंदिशी नाही, ठेका मात्र आहे. सर्व वाक्यं अन्त्यप्रासाची आहेत. नाटकानाटकांत प्रकार असतात. पूर्वीच्या नाटकात शब्द अभिनेत होत होते. इथं शब्द नाचले जातात. माझा तसा नाटकाचा संबंध नाही. नटाचं तोंड पाहिलं की आंघोळ करावीशी वाटते असा मी. (श्रोते आ वासून पहात रहातात.) धों. वि. ची खणखणीत वाणी पुढं चालू असते. एकेक शब्द सणसणीत. कुठेही गडबड नाही.)

गडकरी मोठे नाटककार होते पण त्यांचं नाटक नाचलं जाईल का ? (अरेच्चा, हे आपल्या कधी टाळक्यातच आलं नव्हतं बघा ! तर नाचलं जाणारं नाटक हा या नाटकाचा विशेष आहे. फॉर्मच्या दृष्टीनं हे नाटक रंगभूमीवरला लँडमार्क आहे. या माधवरावांच्या मताशी मी सहमत आहे. तुम्हीही व्हाल.

प्रस्तावनेतल्या दंतकथा शब्द महत्त्वाचा आहे. लेखकाला कलेच्या क्षेत्रात किती स्वातंत्र्य असतं हा विचार मला मांडायचाय्. एकदा व्यक्तीरेखा निर्माण केली की तिच्याशी विसंगत असं लेखकाला लिहिता येणार नाही. ज्याला स्वतंत्र व्हायचं असतं त्याला स्वतःचा दास व्हावं लागतं. स्वतःच केलेल्या तंत्राचा जो दास होतो तो स्वतंत्र असतो. इतिहासाचा प्रश्न आपण सोडू. पण दंतकथा निवडली तर—उदाहरणार्थ. मी बिरबल रंगभूमीवर आणायचा आणि तो अत्यंत रडका, मूर्ख दाखवायचा हे मला दाखवता येईल का? अनैतिहासिक दंतकथा आहे हे एकदा मान्य केल्यावर दंतकथेच्या तंत्राचा तेंडुलकरांना दास व्हावं लागेल. भीष्माचं पात्र काठी टेकत आलं तर ते चालणार नाही. तो योद्धा होता; ब्रह्मचारी होता. याचा भंग करणारं काही मला दाखवता येणार नाही. उद्या विजय तेंडुलकर हे नाव घेऊन त्यांच्याच जीवनातलं एक पात्र दाखवलं तर, नाटक रंगलं असं ते म्हणणार नाहीत. ते त्यांना झोंबेल. मला खात्री आहे. कोल्हा धूर्तच दाखवावा लागेल. हत्ती चपळ दाखवता येणार नाही. जो लेखक स्वयंबद्ध असतो तो स्वतंत्र असतो. हे नाटक एकांगी आहे. त्यामुळे नाटकाच्या कलाकृतीला तडा जातो. आजच्या सचिवालयातील नाना फडणवीस बावनखणीत जात नाहीत. ते बावनखणी दुसरीकडेच उभी करतात. मलबारहिल वगैरे ठिकाणी. तर नाना फडणवीस बावनखणीत कशाला जाईल. नाना फडणवीसला मुलगी हवी असेल तर तो उन्मत्तपणे मला ही मुलगी हवी असं सांगेल. घाशीरामजवळ लाचारी करणार नाही. नानांचा दरारा नाटकात दिसत नाही. नानाचे पात्र या ठिकाणी तयार झालेलं नाही. बिलासपूरचे छड्डूसिंग निर्माण झालेत. हीच या नाटकाची शोकांतिका! याठिकाणी तेंडुलकर फेल झालेत. (धों. वि. चं भाषण इथं खरं संपलेलं पण मनगटशाहीचा निषेध करायचा तेवढा बाकी असतो. ते पुढं बोलत रहातात) मनगटशाहीचा तीव्र निषेध माधवरावांप्रमाणे मी देखील करत आहे. सखाराम बाइंडरनं वन मॅन सेन्सॉर मान्य केलं. यासारखा मूर्खपणा दुसरा नाही (धो. विच्या आवाजाला धार चढते) कर्तारसिंगला खरोखरच जेलमध्ये बसवलं पाहिजे. नाट्यप्रयोगाला प्रोटेक्शन दिलं पाहिजे नाहीतर आज हे कलेच्या क्षेत्रात आहे ते उद्या राजकारणाच्या क्षेत्रात येईल. (धों. वि.च्या दूरदृष्टीचं कौतुक करावसं वाटतं) घाशीराम कोतवालच्या निमित्तानं एवढा जरी विचार झाली तरी चांगलं होईल. (धों. वि. देशपांडे खाली बसतात. आता रमेश तेंडुलकर माईकचा ताबा घेतात.)

ऐतिहासिक व्यक्ती घेतली की माणूस बांधला जातो याच्याशी काहीसा मी सहमत आहे. पण सबंध नाटकाचा फॉर्म लक्षात घेतला तर एरव्हीच्या कसोटचा लावून उपयोगाचं नाही. लेखकाचं पटतं. नाटक ऐतिहासिक

असूनही अनैतिहासिक आहे (ये क्या बात है ?) एका बाजूला काळाशी कुठेतरी जोडायचंय आणि नंतर काळाच्या बाहेर जायचंय असं मला या नाटकाबद्दल वाटते. नेहमीच्या सामाजिक पद्धतीनं लिहिलं असतं तर मला नाटकाबद्दलचे आक्षेप ठीक वाटले असते. पण भाषा वेगळी वापरली. तंत्र वेगळं म्हणून वातावरण निर्मिती वेगळ्या प्रकारची होते. म्हणून आपण काळाच्या बाहेर जातो.. दंतकथा लिहिणाऱ्याला स्वातंत्र्य असतं असं मला वाटतं...नाटकात भ्रष्टाचाराचं धूसर चित्रं उभं केलंय. त्याचं प्रतिक म्हणून पेशवाई घेतली. कालखंड निवडताना फक्त प्रवृत्ती घेतलीय. नाना फडणवीसच का निवडला ! तर नानांविषयी दंतकथा पसरल्या होत्या. मी नाटकाचा प्रयोग पाहू शकलो नाही (म्हणजे तुम्हीदेखील दंतकथाच...?) पण वाचलं आहे. हा माणूस (तेंडूलकर) सतत नवेनवे प्रयोग करतो. तो समाजाला शॉक देऊ पाहतो. (रमेश तेंडुलकर घाशीराम कर्त्यांची ओळख करून देतात काळाला बांधून घ्यायचं नव्हतं म्हणून हा नवा फॉर्म असं एक दोन वेळा घोळून सांगतात. नाटकाची थीम कल्पक आणि योजक असल्याचं सांगून ते भाषण संपवतात. अखेरचे वक्ते व दि कुळकर्णी उठतात

'ऐतिहासिक कादंबरीचे दोन प्रकार आहेत (अशी सुरुवात करून ते एक दोन मिनिटं वज्राघातविषयी बोलतात) मराठीचं दुर्दैवं असं की नाटककार किंवा कादंबरीकार केवळ कादंबरी किंवा कलाकृति लिहून गप्प बसत नाही. तो प्रस्तावना वगैरे लिहितो. (हंशा) प्रस्तावना बरी असते तेव्हा कादंबरी वाईट असते नि कादंबरी चांगली असते तेव्हा...(पुन्हा हशा-काही श्रोते खडबडून जागे झालेत) नाटककाराच्या हेतूतच गोंधळ आहे. मी इतिहासाचं भान ठेवायला तयार नाही पण वाङ्मयाचा स्वतःचा काही नियम असतो. पण इथं व्यक्ती सरळ रेषेत जात नाहीत. (कुळकर्णी पुढं नाटकाचा पहिला भाग चांगला असल्याचं सांगतात पण पुढं नाटक विस्कळीत होतंय असं सांगतात. कुळकर्णींच्या भाषणाचीही तशीच गत झाल्यासारखी श्रोत्यांना वाटते.) पहिल्यांदा वाचल तेव्हा मी हे नाटक तेंडुलकरांचं नाही असं बोललो. ते चट्कन समजलं म्हणून नाही. नाटकाचा उत्तरार्ध पाहिला की हे नाटच जिथं भीषण, होत जातं तिथं नृत्याचं माध्यम मला चुकीचं वाटतं, केवळ आकृतिबंधाचे यश हेच यश मानायचे का ? असा प्रश्न करून व. दि. कुळकर्णी भाषण संपवतात अर्थात त्यापूर्वी मनगटशाहीचा निषेध करायला विसरत नाहीत.

परिसंवाद आटोपलेला असतो. 'आकृतिबंध, अनैतिहासिक, स्वयंबद्ध लेखक, कालबद्ध तरीही कालबाह्य, नाचणारं नाटक' असल्या शब्दांनी डोकं चांगलच ठणकायला लागलेलं असतं. 'नाटक मनगटशाहींनी बंद पाडावीत की पाडू नयेत' यावर वाद घालत आमचं टोळकं वाट चालू लागतात. बराच वादग झाल्यावर शेवटी 'नाटकं मनगटशाहीनं बंद पाडणं वाईट परंतु नाटकावरले वाद आणि परिसंवाद मात्र मनगटशाहीनं बंद करायला हवेत यावर एकमत होते. ● ● ●

# पोर्ट ट्रस्ट स्पर्धेतल्या प्रेक्षणीय एकांकिका !

**बी.** पी. टी. स्पोर्ट क्लबतर्फे रवींद्र नाट्य मंदिरात २ मे ते ५ मे पर्यंत एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. हे स्पर्धेचे आठवे वर्ष ! एकूण बारा एकांकिका सादर करण्यात आल्या. एखाददुसरा अपवाद वगळता सर्वच एकांकिका प्रेक्षणीय वाटल्या.

व्यावसायिक नाटकात काम करणारे सर्वश्री सतीश रणदिवे, मधुकर नाईक यांच्यासारखे कसबी कलाकार पोर्ट ट्रस्ट-मध्ये आहेत. तसेच जास्तीत जास्त फुरसदीचा वेळ नाट्यक्षेत्रात आणि तंत्रात घालविणारे शशिकांत गवाणकर, विजय मोंडकर, राजा शिंदे, लीलाधर मयेकर, कुबल, खोपकर, व्यंकटेश विचारे, माधव जोगळेकर, चव्हाण यांच्यासारखे अभ्यासू लोकही आहेत.

यावर्षी वेगवेगळ्या तीन एकांकिका स्पर्धा पाहिल्या. त्यात पोर्ट ट्रस्टची स्पर्धा अधिक उजवी वाटली. एकांकि-कांची निवड चोखंदळ होती. पोर्ट ट्रस्टमधील कलाकारांची जिद्द आणि तळमळ वाखाणण्यासारखी होती.

परीक्षकांना आणि प्रेक्षकांना ज्या एकांकिका पसंत पडल्या त्याची दखल घेण्याचा हा प्रयत्न !

'भूक अमर आहे' ह्या इस्टेट डिपार्टमेंटने सादर केलेल्या विजय मोंडकर लिखित एकांकिकेला पहिले बक्षिस आणि ढाल मिळाली. भरल्या पोटी तत्वज्ञान सांगणारे–ऐषारामात जीवन जगणारे महाभाग–या जगात आहेत तसेच केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी हाडं झिजवणारे लोकही आहेत. ही सामाजिक विषमता मोंड-करना अभिप्रेत आहे. पोट जाळण्यासाठी धडपडणारे तीन मित्र एकत्र जीवन जगत आहेत त्यांची दुःखे एकांकिकेत सांगितली गेली आहेत.

एकांकिकेचे टीमवर्क उत्कृष्ट होते. खोपकरांनी उभा केलेला भूकेकंगाल मामू आणि मोंडकरांनी उभा केलेला सकृतदर्शनी बेदरकार पण तितकाच संवेदनाक्षम बरम्या हे एकांकिकेच्या यशाचे मोठे वाटेकरी ! शरद भाटे यांचा स्वामी 'आश्चर्य नंबर दहा' मधील मुंगीच्या तोडीस तोड वाटला.

'धि मास्क' ह्या स्टोअर्स डिपार्ट-मेंटने सादर केलेल्या एकांकिकेला दुसरे बक्षिस मिळाले. लिलाधर कांबळी यांनी अनुवाद निर्दोष केला होता. सुनिता सावंत यांचं काम पाहून वाटले की जर त्या व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करतील तर निश्चितच यशस्वी होतील. भूमिकेची समज, अर्थवाही शब्दफेक आणि बोलका अभिनय ही त्यांची काही वैशिष्ट्ये !

'कथा दिनूच्या मृत्यूपत्राची' ह्या रमेश पवारलिखित आणि इंजिनिअरींग

डिपार्टमेंटने सादर केलेल्या एकांकिकेला तिसरे बक्षिस मिळाले. कथाविषय अतर्क्य आणि पोरकट होता. तरीही सतीश रणदिवे यांनी ती दिमाखात सादर केली. त्यांच्या दिग्दर्शनाचे बारकावे जाणवत होते. त्यांनी डॉक्टर गायला दिलेली चाल हे त्याचेच गमक! जयवंत नाडकर्णी यांचा फर्सिकलफिट दिनू स्टेजवर अकृत्रिमपणे वावरत होता. गीता कुळकर्णी यांची सासू ए वन्! कजाग तितक्याच अर्धवट डोक्याची सासू त्यांनी उत्तमरीतीने उभी केली.


# शनवारवाड्यातील शमादान

## ब. मो. पुरंदरे

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**


मात्र अधूनमधून डोकावणारं स्मितहास्य त्यांनी टाळायला हवं.

उत्तेजनार्थ पारितोषिक अकाऊंट डिपार्टमेंटने सादर केलेल्या 'पंगू' एकांकिकेला मिळाले. व. पु. काळे यांच्या कथेवरून त्यांनीच केलेले हे नाट्य रूपांतर!

अत्यंत देखण्या मोहिनीला, ती पायाने पंगू आहे म्हणून रमेशचे वडील नापसंत करतात आणि रमेशच्या मनात ती भरली असूनही तो आपल्या वडिलांना तसे स्पष्ट सांगू शकत नाही. याउलट ती साठेशी लग्न करायला तयार होते. ज्याने आपल्या बायकोला फसवलं आहे. साठेशी मोहिनीचे लग्न होऊ नये असा सदिच्छारूपी इशारा द्यायला रमेश जातो तेव्हा मोहिनी आपण साठेशी लग्न करणार असं स्पष्ट सांगते. 'साठेनी मला सर्व सांगितलंय. मी पायाने पंगू आणि तुम्ही मनाने पंगू मग दोन पंगूंचा संसार कसा झाला असता?' असा स्पष्ट सवाल रमेशला ती करते आणि त्याला निरूत्तर करते.

शशिकांत गवाणकर यांनी एकांकिका मेहनतपूर्वक बसविली होती. परंतु त्यात मुळातच नाट्य कमी आहे. पद्मा वाघ यांची मोहिनी पटणारी होती. बागवे यांनी साठेचे काम बेअरिंग राखून केले. मात्र लेखकाला अभिप्रेत असलेला कलंदर वृत्तीचा साठे ते उभे करू शकले नाहीत. नारायण महाजन यांनी मोहिनीच्या वडिलांचं काम समाधानकारक केले.

याखेरीज लेबर डिपार्टमेंटने सादर

केलेली 'पोस्ट मार्टेम' ही दिलीप कोल्हटकरलिखित एकांकिका आणि 'सावित्री मी आलो' ही रत्नाकर मतकरी यांची चीफ मॅकॅनिकल डिपार्टमेंटने सादर केलेली एकांकिकाही प्रेक्षकांना पसंत पडल्या. रमेश होनावर यांनी पोस्ट मार्टेम फारच चांगली बसवली होती.

अकुशल आणि हौशी मंडळी नाटकात काम करण्याच्या दुर्दम्य इच्छेने येतात खरी परंतु प्रत्यक्षात नाटक उभे राहिपर्यंत त्यांची कशी दशा होते, प्रत्येकजण आपापल्या तंत्राने आणि सवडीने कसा वागतो आणि त्यात दिग्दर्शकाची कशी दैना होते हे कोल्हटकरांनी मांडले आहे. ही एकांकिका पाहात असताना पाऊणतास प्रेक्षक मनमुराद हसले. प्रभाकर भातखंडे यांचा दिग्दर्शक मनाला विलक्षण आनंद देऊन गेला.

'सावित्री मी आलो' ही एकांकिका मधुकर नाईक यांनी व्यवस्थित सादर केली. परंतु स्टेजवरील त्यांच्या हालचाली बोजड वाटतात. शिवाय मांत्रिकांनी केलेली आत्म्याची रदबदल म्हणजे कायापालट नव्हे ही गोष्ट नाईक विसरले. बुभुक्ष आणि अतृप्त मांत्रिक आत्मा तेवढाच तरुणाचा घेतो.

पार्श्वसंगीत वातावरणास पोषक होते नेपथ्यही आकर्षक होते.

परीक्षक म्हणून सर्वश्री राजा कारळे, विश्वास मेहेंदळे आणि सौ. नीलम् प्रभू यांनी काम पाहिलं.

—रमण माळवदे

## दंडवते–शहाणे लेखावरील प्रतिक्रिया

पृष्ठ १३ वरून

कऱ्याला मिळणाऱ्या किमतीचे संरक्षण करा...ही मागणी करणारे मोर्चे मुंबईत येऊन धडकले आहेत. शेतमजुराची सर्वांत जास्त पिळवणूक होते हे आपल्या लेखात मांडल्याबद्दल दंडवते शहाण्यांचे अभिनंदन. पण डाव्या पक्षांनी शेतमजूरांच्या पगारमानाबद्दल व शाश्वतीबद्दल वेळोवेळी केलेल्या चळवळींचीही शहाणे व दंडवते ह्यांनी आठवण ठेवावयास हवी होती.

पण सगळ्यात महत्वाचा मुद्दा हा की... शेती उत्पादनाचा... सामान्य शेतमजुराचा... सामान्य शेतकऱ्याला मिळणाऱ्या भावाचा प्रश्न हा आज जमिनदारी मोडण्याचा व जमिनवाटपाचा प्रश्न आहे. सगळ्या शेतकरी वर्गाला एकाच गठडीत कोंबून चालणार नाही. हरीत-क्रांतीची फळे श्रीमंत शेतकऱ्यांनी खाल्ली व गरीब सामान्य शेतकऱ्याला दुष्काळ दिला. आज ह्या श्रीमंत शेतकऱ्याचे कारखानदाराचे व धनीक व्यापारी वर्गाचे कसे साटेलोटे जमले आहे, हाही अभ्यासाचा प्रश्न आहे. गव्हाच्या व्यापाराचे जे राष्ट्रीयीकरण होत आहे...त्या संदर्भात हे स्पष्ट होत आहे.

तेव्हा 'जंगले मोडली म्हणून दुष्काळ पडला.' हे कारण देऊन आपण थांबलो तर ज्या प्रश्नांची आज तड लागायला हवी...ते प्रश्न बाजूलाच रहातील. जे

घडलंय ते एका विशिष्ट अर्थव्यवस्थेच्या अपरिहार्य विकासातून घडलं आहे. तुम्हाला नाव देणं आवडत नसेल पण त्याला नाव आहे...भांडवलदारी अर्थव्यवस्था.

कारखानदारीबाबत बोलताना शहाणे दंडवते लिहीतात की: बाटाच्या कारखान्यात होणारे जोडे आपण वापरतो. गावागावांतली गुरं मारली जातात. पुन्हा वहातुकीचा खर्च ३० ते ३५ टक्के असतो (...? मला हें पटत नाही) कमी किंमतीत उत्पादन व्हावं म्हणून वास्तवीक ही यंत्रं आहेत. तेव्हा जरूरीपेक्षा जास्त कामगारांना काम द्यायचा प्रश्नच नाही.

याच संदर्भात पुढे ते म्हणतात: बाटाच्या कारखान्यात किती कामगार वाढले, ह्याचे आकडे मिळतात पण खेड्यातल्या किती हजार चांभारांचे काम गेले. याचे आकडे मिळत नाहीत.

—म्हणे बाटाची कारखानदारी आली म्हणून चांभारांचे काम गेले, बेकारी आली हा सूर—

—ह्याचा अर्थ हा समजायचा का की यंत्रावर जोडे व्हायच्या अगोदर चांभार हा धंदाबिंदा करून व्यवस्थित होता. पहिली गोष्ट ही की जोडेबिडे वापरणारे आजच्या मानाने त्यावेळी चिक्कार कमी होते. (अगदी ब्राह्मणांच्या बायकाही दोन पिढ्यांपूर्वी जोडे वापरीत नव्हत्या!) गावागावांतली गरजही कमी होती. त्यापेक्षाही वाईट म्हणजे चांभार हा जोहार करून लाचारीने जगणारा होता. तेव्हांही तो बेकार...उपाशी होताच.

आज बाटाच्या किंवा करोना साहूच्या फॅक्टरीतला कामगार (यंत्रयुगाने 'चांभारी' मोडली... वर्णव्यवस्थेला पहिला धक्का दिला) ताठ मानेने काम करतो पगारवाढ, बोनस, महागाईभत्ता ह्याकरिता संप करतो आणि लढतो...त्याला काही महत्त्वाचा आणि मोलाचा अर्थ आहे की नाही? मी त्यात आता जात नाही, पण सगळ्यांनीच त्याचा विचार करावा. आणि अगदी विचारच करायचा तर समग्र जनतेची जोड्यांची गरज हे कारखाने भागवतात हे तरी खरं आहे काय?

पण दुसरा प्रश्न त्यापेक्षाही महत्त्वाचा आहे. 'कमी किंमतीत जोडा उत्पादन व्हावा म्हणून यंत्र आहे, तेव्हा गरजेच्यापेक्षा जास्त कामगार नोकरीवर ठेवण्याचा प्रश्न नाही' वगैरे विचार भलतेच गोंधळ माजवणारे आहेत.

समजा प्रत्येक चांभाराने संपूर्ण जोडा करायचा म्हटलं तर त्याचा जितका 'श्रमवेळ' त्यात खर्च होईल, त्यामानाने 'श्रमविभागणी' होऊन यंत्रावर होणारा जो जोडा असेल त्यामागे कितीतरी कमी श्रमवेळ खर्च होतो. म्हणून यंत्रावर होणाऱ्या जोड्याची किंमत कितीतरी कमी असायला हवी. पण 'रहस्य' हे आहे की हे यंत्र आज बाटाच्या मालकीचे आहे. म्हणून 'बाटा' किंमत ठरवताना कोणते परिणाम व निकष वापरतो? जरा खोलात जाऊन आपण

एक उदाहरण घेऊ: समजा एका जोड्याची उत्पादन किंमत ५ रु. असली आणि हा जोडा जर ३५ रुपयाला विकला तर समजा १ लाख जोडे विकले जातील. आणि फायदा होईल. ३० × १ लाख= ३० लाख रुपये. आता ह्या जोड्याची किंमत जर १० रु. ठेवली तर साहजिकच जास्त जोडे विकले जातील व आपण समजू की त्या किंमतीला ५ लाख जोडे विकले जातील व फायदा मात्र होईल केवळ २५ लाख रुपये.

तेव्हा बाटा लेकाचा ५ लाख जोडे उत्पादन करण्याऐवजी १ लाख जोडेच निर्माण करेल. म्हणजेच जोडे महाग करेल. कमी कामगार नोकरीला ठेवेल. (म्हणजेच अनेक लोक बेकार रहातील. अर्थात् हे केवळ एका कारखान्याला लागू नाही तर 'फायद्या'करिता चालणाऱ्या सर्व अर्थव्यवस्थेला लागू आहे.)

अर्थात् मी हे जे मांडलंय ते ओव्हर-सिंप्लीफिकेशन आहे हे मान्य. पण हिशेब कितीही उलटे सुलटे केले, तरी मूळ हिशेब तोच...विस्तार भयास्तव जास्त उदाहरणे देत नाही...एकच देतो. सर्वसामान्य जनतेला परवडेल असं कापड उत्पादन करण्याची सक्ती सरकारने गिरण्यांवर केली. बाजारपेठ भलतीच मोठी. भावही ठरवला; पण मुंबईतल्या बहुतेक गिरण्या असं जनतेला परवडणारं कापड उत्पादन करण्याऐवजी ते न करण्याबद्दल पडलेला दंड देणे पत्करतात व आपली उत्पादन-शक्ती काही मर्यादित लोकांना परवडेल अशा उंची कापडाच्याच उत्पादनाकरिता वापरतात. ह्यातलं रहस्य काय?

तर दंडवते शहाणे ह्यांनी ह्या गोष्टी लक्षात घेतलेल्या नाहीत. त्यामुळे यंत्र व कारखानदारी ठेवून...पण भांडवल-दाराला घालवून बेकारी नष्ट करण्याची शक्यता त्यांना दिसत नाही.

दंडवते-शहाणे ह्यांनी शहरे आणि खेडी ह्यांच्या विकासातली विषमता व विरोध चित्रासारखा मांडलाय. त्यांनी दिलेली उदाहरणे बोलकी आहेत. त्यांच्या 'अॅक्यूट ऑब्झवशन'चे ते लक्षण आहे. 'शहरातील गरीब माणसं ...खेड्यातली गरीब माणसं' असेही उल्लेख आहेत. पण तरीही सबंध लेख वाचल्यावर जाणवतो तो 'शहरे आणि खेडी' ह्यांच्यातला झगडा (एम्फसिस) जोर...मदार हा झगडा खडा करण्या-वर आहे. हा झगडा का...कसा उभा राहिला. त्याची कारणमिमांसा काय? ह्याबाबत काही लिहिलेलं नाही. अर्थात ते सगळं त्यांनी लिहायला पाहिजे होतं असा आग्रह नाही; पण प्रश्न अशा रीतीने उभा केल्यास ह्या झगड्याला भलतंच वळण लावण्याचे जे अधिकृत व अनधिकृत प्रयत्न चालले आहेत, त्याला बळकटी यायची अशी भिती वाटते.

वास्तविक शहरे आणि खेडी निर्माण होणं.. त्यांना विषम वागणूक मिळणं, हा ही भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या विकासाचाच एक अपरिहार्य भाग. पण आता शहरांतल्या श्रमजीवींना आणि

खेड्यांतल्या श्रमजीवींना अलग करण्याचा ... एकमेकाविरुद्ध लढवण्याचा डाव खेळला जात आहे.

कारखान्याला लागणारा कच्चा माल...शहराच्या बाहेरून येतो. त्याची कमीत कमी किंमत देणं हाही फायदेबाजीचाच एक भाग.

आपले कारखाने, व्यापार-उदीम करमणूक मोटारी नीट चालाव्यात ह्या करिता भांडवलदार व शासन शहरांत अनेक सुखसोयी आणतं. उदा. रस्ते, पाणी, प्रकाश, वहातुकीची साधनं इ. इ. त्याचा फायदा काही प्रमाणांत सगळ्यांनाच मिळतो. पण शहरातल्या सामान्य माणसांना मोडून काढूनही अनेक सुखसोयी श्रीमंत वर्गाला पुरवल्या जातात. उदा. जमिनींच्या किमती वाढवून सामान्य माणसाला परवडणारी घरयोजना अशक्य करणं...झोपड्या व चाळी मोडून त्या ठिकाणी आलिशान इमारती उभारणं...पिण्याच्या पाण्याची वाटणी लोकसंख्येच्या विषमप्रमाणांत करणं वगैरे वगैरे.

त्याशिवाय दुसरी एक बाजू आहे. शहरातला हा कामगार, मध्यमवर्ग अधिक संख्येने एकत्र असतो. तो लवकर संघटीत होत असतो. उत्पादनयंत्रणेतील आपल्या मोक्याच्या जागेची त्याला लवकर जाणीव होते. जुन्या संस्कारांच्या साच्यातून परिस्थितीमुळे तो तारतम्याने अधिक बाहेर आलेला असतो. आणि सर्वात महत्त्वाचे हे की ह्या कामगार वर्गाची व भांडवलशाहीची टक्कर अधिक 'समोरासमोर' असते.

त्यामुळे शहरातला कामगार लढतो, संप करतो, यंत्रामागील स्वार्थी शक्तीला काही प्रमाणांत नमवतो. त्यामुळे भांडवलदार व शासन खेड्यातल्या जनतेपेक्षा त्याची अधिक दखल घेतात.

श्रमजिवी वर्गांच्या वेगवेगळ्या समूहांच्या पिळवणूकीतील तीव्रतेंत फरक पडत असतो.

त्याशिवाय शिक्षण, साहित्य संस्कार हे आहेतच. लई, वंगाळ हे शब्द अडाण्याचे(?) तो आपल्याहून वेगळा... अशा भावनाही कळत...नकळत रुजवल्या जातात. वेगळेपणाची दरी वाढवली जात असते.

अर्थातच् मूलभूत झगडा काही शहरे व खेडी ह्याच्यांतील श्रमजिवी वर्गात नाही; पण तसा आहे असा आभास तयार करण्याचा प्रयत्न चालू आहे.

उदाहरणार्थ—मागच्या सरकारी संपाच्या वेळी वसंतरावदादा पाटलांनी तक्रार केली की जर ह्या शहरी लोकांनाच सर्व काही दिलं, तर खेड्यातल्या जनतेकरिता काय शिल्लक रहाणार. खेड्यांतल्या जनतेकडे पहा, आणि आपल्या मागण्या आवरा असा सल्ला त्यांनी दिला होता.

तेव्हा ह्या सगळ्यांवर मात करून समस्त श्रमजीवी वर्गांची एकजूट बांधण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. वास्तविक कामगार चळवळीची ती जबाबदारी आहे. शहरांतल्या जनतेचे व खेड्यातले जनतेचे दुरावलेले संबंध साधण्याचा एकच मार्ग म्हणजे समान शत्रू — भांडवलशाही—ह्यांच्याविरुद्ध एकत्र येणे.

एक दुसरा मुद्दा जाता जाता घेतो. यंत्रावर घेण्यात येणारा घसारा... त्याला शास्त्रीय कारण सापडत नाही, ही दंडवते शहाणे ह्यांची तक्रार. भांडवलदारी हिशेबपद्धती हे एक स्वतंत्र प्रकरण आहे, की ज्याचा सगळ्यांना समजेल असा थांगपत्ता लागणे मुष्कील. तेव्हा तक्रार बरोबर. पण तशाच पुष्कळ गोष्टी आहेत. उदा० डिव्हिडंड देण्याऐवजी 'बोनस शेअर्स देणे (म्हणजे कंपनीच्या फायद्यातून वा गंगाजळीतून भागधारकांच्या नावाने भागभांडवल जमा करणे) व त्यावर पुन्हा वर्षानुवर्षे डिव्हिडंड देणे. कंपनीला लागणाऱ्या एकंदर भांडवलापैकी ७०/७५ टक्के भांडवल सरकारी-निमसरकारी संस्थांकडून म्हणजे पब्लिककडून घेऊन पुन्हा कारखाना खाजगीतच ठेवणे वगैरे. ह्या सर्व 'मनोरंजक' गोष्टी दंडवते-शहाणे ह्यांनी व इतर साहित्यिक विचारवंतांनी जरूर समजून घ्याव्यात...मी असे म्हणतो कारण, समजून घेण्याचा व समजावून सांगण्याचा त्यांचा वकूब फार मोठा आहे.

शेवटी एक : दंडवते-शहाणे शेवटी शेवटी म्हणतात : आपण गरीब माणसं! श्रीमंत मालकाकडून मिळालेला पगार, गरीब माणसाकडून वस्तू विकत घेण्यात खर्च करण्याऐवजी श्रीमंत माणसांच्या भाईबंदाकडूनच घेण्यात खर्च करतो. पुन्हा आपला श्रीमंत मालकच गब्बर होतो. खेड्यातल्या माणसांचं काम जातं. तो बेकार होऊन मुंबईला येतो...एका आलिशान इमारतीच्या बाजूला एक झोपडं उभं रहातं.'

मग ह्यावर इलाज काय? व्यापारी वर्ग हा मालकवर्गाचा भाईबंद आहे... हे मान्य करूनही काय करावं. शेतकरी काही मुंबईला येऊन धान्य विकत नाही. थेट हातमागाचे कापड विकत घ्यायचे तेही व्यापाऱ्याकडूनच विकत घ्यावे लागणार, कोष्टी काही मुंबईला कापड विकण्यासाठी येत नाही...किंवा व्यापार करण्याची वरपासून खालपर्यंत जी संघटना आहे, ती काही त्यांच्या हातात नाही.

मग काय करावे?

सरकारने औद्योगिक मालांच्या उत्पादनाचे व गरजेच्या वस्तूंच्या

---


# पुरंदरच्या बुरुजावरून

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : चार रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०.**

उत्पादनाचे राष्ट्रीयीकरण करावे काय? त्याला खाजगी कारखानदार विरोध करतात. (गव्हाच्या व्यापाराच्या राष्ट्रीयीकरणाला इंडियन मॅन्युफॅक्चरींग असोसिएशन...म्हणजे औद्योगिक भांडवलदारांनी का बरे विरोध केला ? म्हणजे तीसुद्धा 'साटंलोटं 'ची भानगड काय ?) जोडीस जोड शासनसंस्थेतील अनेक अधिकारी अशा योजनेचा जाणून बुजून बट्ट्याबोळ करतात. नोकरशाही यंत्रणा तर योजनेचा मूळ जनकल्याणाचा हेतूच उधळून लावण्याचा प्रयत्न करतात. काही लोक म्हणतात : जर सरकारच भांडवलदारांचे तर फरक काय पडणार ? तेव्हा क्रांती होईपर्यंत हे सगळे असेच चालू राहू द्या ! म्हणजेच पर्यायाने हतबलतेने श्रीमंत कारखानदार व व्यापारी ह्यांचीच बाजू घेतात.

काही लोक म्हणतात : राष्ट्रीयीकरण होऊ द्या. मग 'शेतकऱ्याला योग्य भाव...व ग्राहकालाही योग्य भाव' ही लढाई पुढे चालवू. निदान तशी लढाई चालवण्याचा अधिकार तरी आपल्याला प्राप्त होईल. कारण व्यापाऱ्याने काय 'भाव' ठरवावे हे बोलण्याचाही अधिकार नाही...पण सरकारने काय भाव ठरवावे...हे सांगण्याचा अधिकार तरी जनतेला असेल. अर्थात तशी जागृती करणं ही एक वेगळी जबाबदारी...तर हे असे अनेक प्रश्नही आता तयार झाले आहेत. तेथून पुढे जायला पाहिजे.

तेव्हा कारखानदारी व भांडवलशाही विषमवाढीचा मूळ प्रश्न व खेडी आणि शहरे अशी भेसळ करून चालणार नाही. 'पाप...पाप ते हेच' असा बोर्ड लावून उपयोग नाही.

शहाणे–दंडवते म्हणतात : हे असंच चाललं तर पुन्हा चार-पाच वर्षांनी दुष्काळ पडणार' अगदी खरं आहे. पण हे असंच चालू नये असं वाटत असेल, तर अर्थव्यवस्थेवरील भांडवलदारी कब्जा मोडणे हाच एक मार्ग आहे. हा कब्जा कसा मोडावा...ह्यात मतभेद नाहीत असं नाही. पण 'हा कब्जा मोडण्याखेरीज दुसरा इलाज नाही.' 'दु:ख वाटोनी, स्वस्थ काय म्हणोनी बसावे ?' केवळ त्रागा केल्याने वा माणुसकीच्या उमाळ्याने काय बरे साधणार आहे. ● ● ●

---


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

## परभणी वार्तापत्रे

पृष्ठ ५ वरून

काही फायदे मिळणार असतील तर असे अधिकारी पचवून घेतले जातात. ह्या उलट पुढाऱ्यांनी मनावर घेतले तर पोलिसांना वाटेल ते करायला भाग पाडले जाते. नाहीतर त्याची बदली होते चौकशी होते. महाराष्ट्रात सर्वच खेड्यापाड्यात असेच घडत असते.

४ खून होऊन गेले तरीही काही पत्ता लागत नाही. खून करणारे मोकळेच राहतात. ह्याचा व्यावहारिक अर्थ सत्तेला हे प्रकार मान्य तरी आहेत किंवा मान्य नसल्यास राजकीय वा अन्य दबावामुळे अशा प्रकारांकडे जाणूनबुजून कानाडोळा केला जात आहे. नाहीतर १४ नोव्हेंबरला सुरू झालेल्या ह्या प्रकाराला ६ महिने होऊनही वाचा फुटत नाही ह्या गोष्टीचा अर्थच समजू शकत नाही.

४ जणींचा बळी गेला. उरलेल्या ३ कोण ? बळी गेलेल्या सर्व मुली गरीब होत्या, मोलमजूरी करणाऱ्या होत्या, मुसलमान व कनिष्ठ जातीच्या होत्या. पोलीस, शासन आणि गुन्ह्यात सहभागी होणाऱ्यांना आणखी ३ निष्पाप मुलींना ह्या इहलोकाच्या कचाट्यातून सोडवण्याचे भाग्य लाभणार आहे; त्या मुलींना मोक्षाकडे पोचवल्याचे श्रेय मिळणार आहे. आंबेगाव रस्ता हे ठिकाणही ठरले आहे. फक्त केव्हा हाच प्रश्न राहिला आहे.

आपण आपले सर्व अधिकार, सत्ता, पैसा, सर्व काही सरकारच्या हाती सोपवत असतो. ५ वर्षांनी एकदा, लोकशाहीला प्रमाण ठेवून ! त्या सत्तेचा उपयोग शासन व त्यातले भागीदार मानवतला 'योग्यपणे' करतीलच. पुढल्या 'खुनाच्या' बातमीची वाट पहाण्यापलिकडे आपल्या हातात दुसरे काय आहे ? ●

## २ : कृषी विद्यापीठ

परभणीच्या कृषी विद्यापीठात चाललेले प्रकार पहायला शिवाजी महाराज जिवंत असायला हवे होते. त्यांनी आपली जातच बदलून टाकली असती. आपल्याच जातीच्या नावावर चालणारा जातीयवाद आणि गुंडगिरी व गलथानपणा त्यांना पहायला मिळाला असता तर किती लोकांचे 'चौरंग' झाले असते, कितींना पोत्यात घालून बडवण्यात आले असते ह्याची कल्पनाच करवत नाही

महाराष्ट्रात सध्या गमतीची परिस्थिती झाली आहे. मराठ्याने ब्राह्मणावर टीका केली की ब्राह्मण खवळतात. मुसलमानाने हिंदूवर टीका केली की हिंदू खवळतात. ब्राह्मणाने मराठ्यांच्या वर्तनावर बोट ठेवलेले मराठ्यांना खपत नाही. आणि हे सर्व प्रकार करणारे स्वत: मात्र ह्या देशातून जातीयवाद नष्ट झाला पाहिजे अशा गर्जना करत असतात. मार्क्सशिवाय ज्यांच्या

भाषणाचे कोणतेच वाक्य पूर्ण होत नाही असे डावे लोकही जातीचे नाव घेतल्यावर चिडतात. सगळेच अजब आहे. नाना फडणीसावर काही लिहिले की ब्राह्मण खवळतात, शाहू महाराजांवर बोलले की तमाम मराठे चिडतात. त्यामुळे काही बोलायचीच सोय उरलेली नाही. (हाच लेख खंदारे, देशमुख, काळदाते, पाटील आदि कोणाच्या नावावर जर दिला तर फारसा गदारोळ उठणार नाही!) चुकेला चूक म्हणणे हीच चूक ठरते. गुन्ह्याला गुन्हा म्हणता येत नाही, कोणत्याच घटनेचे विश्लेषण धडपणे करू न देणारी कोंडी महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.

परभणीच्या कृषी विद्यापीठात घडलेल्या गेल्या वर्षभरातल्या घटनाही एकतर दाबून टाकल्या जातात. किंवा जातीय प्रचार आहे अशा नावाखाली विकृत स्वरुपात त्या मांडण्यात येतात.

काय घडते आहे परभणीच्या कृषी विद्यापीठात? एरवी शांत असणाऱ्या ह्या विद्यापीठात, विद्यापीठाला नाव देण्याच्या प्रश्नावरून वादंगाला सुरवात झाली. स्वामी रामानंद तीर्थांचे नाव पुढे आले. हैद्राबाद संस्थानात असलेल्या मराठवाड्यात स्वामीजींना न ओळखणारा माणूस मिळणार नाही. पण तीर्थांच्या नावाखाली आपले जातीय घोडे पुढे दामटवण्याचा प्रयत्न ब्राह्मण मंडळींनी केला असा आरोप बहुजन समाजातली मंडळी करतात. बहुजन समाजात अर्थात काही युवक निश्चितपणे असे होते, की ज्यांना जातीयवाद मान्य नव्हता, त्याविरुद्ध ते लढत होते व रामानंद तीर्थांचे नाव त्यांनी आपणहून स्वीकारले होते.

पण इथूनच जातीयवादी थैमानाला सुरवात झाली अशी मीमांसा परभणीतले लोक करतात. कारणे कोणतीही असोत; पण जातीयवादाने परभणी शहारातही थैमान घातले हे मात्र कोणीच नाकबूल करू शकणार नाही.

एक वर्षापूर्वी विद्यापीठाच्या वसतीगृहातले सर्व दिवे मालवण्यात आले. एक पोरांचे टोळके हातात विजेऱ्या घेऊन खोल्या खोल्यातून हिंडले आणि ब्राह्मण दिसला की त्याला मारायचे असा सपाटा चालवला. त्या रात्रीच्या प्रकारात ब्राह्मणच विद्यार्थ्यांनी मार खाल्ला हे सर्वजण कबूल करतात.

ह्या प्रकाराची कोणतीही चौकशी विद्यापीठाने केली नाही, माहित असलेल्या गुन्हेगार विद्यार्थ्यांना कोणतेही शासन करण्यात आले नाही.

ज्या नेमणुका विद्यापीठात विविध जागांवर करण्यात आल्या. त्यांच्यातही पक्षपात आढळून येतो. अॅग्रिकल्चरल ऑफिसरच्या नेमणुका करताना एम्. एस्. सी. पहिल्या वर्गात पास झालेल्यांना न घेता बी. एस्सी. तिसऱ्या वर्गात पास झालेल्याला घेण्यात आले. अॅसिस्टंट प्रोफेसरच्या जागांबाबतही हीच कथा. २५ पहिल्या वर्गात पास झालेल्यांना डावलण्यात आले आले आहे. ज्यांना नाकारले ते सर्व कुलकर्णी, जोशी, भारस्वाडकर असे असतात आणि ज्यांना घेण्यात आले, चांगल्या गुणांनी पास झालेले

नसतानाही, ते सर्व देशमुख, पाटील असतात—ह्या गोष्टीला योगायोग असे कसे म्हणता येईल? डॉक्टरेटसाठी डेप्यूटेशन देताना किंवा वरच्या जागांवर बढती देतानाही असेच प्रकार सर्रास घडून आलेले आहेत. ह्या नेमणुका व गैरप्रकारांना अर्थात आमदारांचा आशिर्वाद असतोच.

हे कोणी डाख नावाचे असिस्टंट प्रोफेसर. अनेक हुशार माणसांना डावलून ह्यांना नेमण्यात आले. ह्यांची गुणवत्ता म्हणजे लातूरचे आमदार शिवराज पाटील चाकूरकर यांनी ह्या गृहस्थांची केलेली शिफारस!

प्रा. ए. ए. देशमुख गडबडी करण्याला चिथावणी देतात असा आरोप पोलिसांच्या फायलीत आहे. त्यांना पकडण्यातही आले होते. वस्तुत: अशांना महाविद्यालयातून ताबडतोब बडतर्फ केले जाते; पण ह्या प्राध्यापकांना बडतर्फ केले गेले नाही. परभणी शहरात स्थापन झालेल्या शांतता समितीने कलेक्टर व पोलीस-अधिकाऱ्यांना गुंड मुलांना पकडण्याची विनंती केली होती. ती विनंतीही मान्य करण्यात आली नाही. सर्वच मारामारी प्रकरणात गुंतलेल्या मुलांबाबत हा प्रकार घडून आलेला पहायला मिळतो. आज घडीलाही हे तणाव शिल्लक आहेत, कोणत्याक्षणी मारहाण होईल ह्याची शाश्वती देता येणार नाही.

जातीय वादाबरोबरच गुंडगिरीही फार मोठ्या प्रमाणावर चालते. पोलीस, विद्यापीठाचे प्राध्यापक, अधिकारी त्याला संरक्षण देताना आढळून येतात.

बी. एस. पाटील, ९ व्या ट्रायमेस्टरचा विद्यार्थी. ह्याचे पास होण्याचे मार्ग काय आहेत हे सर्व विद्यापीठ जाणते. बालाजी मंदिरात एका मुलीची वेणी ओढल्याबद्दल पोलिसांनी ह्याला पकडले होते. मारामाऱ्यात नेहमी आघाडीवर. वेणी ओढण्याचे प्रकरण गाजले. माऱ्यामाऱ्या झाल्या. ज्याच्यावर पोलिसांनी सप्रमाण आरोप ठेवले आहेत अशा ह्या विध्यार्थ्याला युनिव्हर्सिटीच्या जीपमधून रातोरात त्याच्या गावी पोचवण्यात आले. त्याला पोलिसांनी पकडू नये म्हणून. तो परीक्षेलाही बसला आहे (आणि पासही होईल!) हे चिरंजीव तुळजापूरचे आमदार श्री. पाटील ह्यांचे बंधू आहेत!

कॉपी करण्याचे प्रकार सर्रास चालतात. प्राध्यापकांना कॉपी पकडायची हिंमत होत नाही. कारण विद्यार्थी कोणा आमदाराचा नातेवाईक असतो. त्यामुळे वरिष्ठ प्राध्यापक सजा न करता त्या विध्यार्थ्यांची सन्मानपूर्वक बोळवण करत असतात.

मस्के नावाचा एक विद्यार्थी. बी. एस्. सी. च्या शेवटच्या वर्षाला आहे. त्याने कॉपी केली. पर्यवेक्षकाने पकडले व प्राचार्यांकडे पाठवून दिले. प्राचार्यांनी त्याला सोडून दिले. ह्या विद्यार्थ्याने त्या पर्यवेक्षकाला 'शहरात रस्त्यावर भेटा म्हणजे सांगतो' अशी उघड धमकी दिली, पेपर घेतला आणि घरी निघून गेला! पास होऊनच दाखवीन ह्या

त्याचा आत्मविश्वास! तो पास होईलही!

अशी ही गुंडगिरी आता हळूहळू विद्यापीठातून शहरात यायला लागली आहे.

जातीय अट्टाहासामुळे चांगली माणसे डावलली गेली. त्याचा परिणाम संशोधन केंद्रावरही झाला आहे. जवार संशोधन केंद्रात पूर्वी जेव्हढे संशोधनाचे काम होऊन गेले आहे तेव्हढेच. नंतर संशोधन जवळ जवळ ठप्पच झाले आहे.

कॉंग्रेसी आमदार शिवराज पाटील चाकूरकर, रावसाहेब जामकर आणि शंकरराव चव्हाण ह्यांना आपली माणसे नेमण्यापलिकडे विद्यापीठाच्या इतर बाबीत रस वाटत नाही. डीन व व्हाईस चान्सेलरना आपली पदे सांभाळणे, आपली आर्थिक उन्नती कशी होत राहील ह्याचीच सतत काळजी घ्यावी लागते! त्यामुळे विद्यापीठातील एकंदर गैरप्रकार व जातीयवाद बिनदिक्कत चालत राहतो. त्याचा अंतिमत: विद्यापीठ निकस बनत जाण्यात परिणाम होतो.

जातीयवाद, भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार-सर्वांची अनेक उदाहरणे देता येतील; पण शितावरून केलेली परीक्षाच पुरेशी आहे.

जातीयवाद, मग तो कोणीही केला तरी गर्हणीय आहे. जन्मावरून माणसाचे मूल्यमापन केले जाऊ नये ह्या सिद्धांतानेच हरिजन-दलितांना उत्थापन देण्याच्या चळवळी ह्या देशात उभ्या राहिल्या, पण तोच तर्क इतरांनाही लागू आहे जन्माने ब्राह्मण असला की तो अन्यायी असतोच हेही समीकरण चुकीचे ठरते. माणसाचे मूल्यमापन त्याच्या वागण्यावरून, त्याच्या गुणावरून झाले पाहिजे. त्याच कसोटीवर समाजातल्या प्रत्येक संस्थेची उभारणी व्हायला पाहिजे. एका विशिष्ट जातीत जन्मला ह्यावरूनच केवळ कुणी अव्हेरले जाणे आणि प्रत्यक्षात जास्त गुणवत्ता असतानाही अव्हेरले जाणे अशा दोन गंभीर चुका घडल्या आहेत, त्या योग्य नाहीत.

उद्या जागृत झालेल्या, पुरेशा ताकदवान झालेल्या व मागास न राहिलेल्या अशा मागासवर्गीयांनी सर्व बहुजन समाजवाल्यांना ह्याच जातीयवादी तत्त्वावर अव्हेरले तर त्यावेळी ही मंडळी काय म्हणतील? तोही दिवस आता जवळ यायला लागला आहे.

सर्व समाजानेच ह्या गोष्टींचा गंभीरपणे विचार केला पाहिजे.

● ●

# बर्वे-पायगुडे न्यायसंपादन सहाय्य समिती, पुणे

' माणूस 'मधून व इतरत्र प्रसिद्ध झालेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून खालील व्यक्तींनी व संस्थांनी बर्वे-पायगुडे न्यायसंपादन कार्यासाठी आर्थिक साहाय्य पाठविले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार. समितीकडे जमा झालेला निधी येणेप्रमाणे-

| | |
|---|---|
| माणूस प्रतिष्ठान | रु. २००/- |
| श्री. भाऊ फाटक, पुणे | रु. १००/- |
| ,, वि. वा. लिमये, पुणे | रु १००/- |
| ,, व्ही. बी. साबणे व इतर, पुणे | रु. १००/- |
| सौ. कमल बर्वे | रु. १००/- |
| श्री. संपादक ब्लिटस्, | रु. १००/- |
| ,, सुधीर बेडेकर, पुणे | रु. १००/- |
| ,, बालमोहन लिमये, मुंबई | रु. १००/- |
| ,, मंगेश रेगे, मुंबई | रु. १००/- |
| ,, कोल्हटकर व्ही. वाय. | रु. १००/- |
| ट्रेड युनियन सेंटर, पुणे | रु. ५१/- |
| श्री. सी. डी. देशमुख, ठाणे | रु. ५०/- |
| ,, डॉ. सुलभा ब्रह्मे, पुणे | रु. ५०/- |
| ,, छाया दातार, मुंबई | रु. २०/- |
| ,, डॉ. गुहा, पुणे | रु. २०/- |
| , बी. जे. केरकर, पुणे | रु. २५/- |
| ,, एन्. एस्. गळवणकर वसई रोड | रु. २०/- |
| ,, जोशी | रु. २०/- |
| ,, रतनलाल भंडारी, दाभोळ | रु. ११/- |
| ,, डॉ. आर. जी. कश्वीवर खामगाव | रु. १०/- |

| | |
|---|---|
| सौ. पोरे, पुणे | रु. १०/- |
| श्री. प्रो. काळे, पुणे | रु. १०/- |
| मिस् राईरकर, पुणे | रु. १०/- |
| ,, प्रो. कुलकर्णी, पुणे | रु. १०/- |
| ,, पी. बी. दाते, नातेपुते | रु. १०/- |
| ,, मोहन मुळे, नागठाणे | रु. १०/- |
| ,, अनिल अवचट, पुणे | रु. १०/- |
| ,, रा. प. नेने, पुणे | रु. १०/- |
| ,, जगदीश गोडबोले, पुणे | रु १०/- |
| ,, प्रा. कामत, पुणे | रु. १०/- |
| ,, प्रो. बोकिल, पुणे | रु. ५/- |
| ,, डॉ. चौधरी, पुणे | रु. ५/- |
| मिस् पित्रे, पुणे | रु. ५/- |
| सौ. मुळे, पुणे | रु. ५/- |
| सौ. दांडेकर, पुणे | रु. ५/- |
| श्री. डॉ. मिश्रा, पुणे | रु. ५/- |
| ,, सुरेंद्र फणसे-उल्हासनगर | रु. ५/- |
| ,, रा. वि. चंद्रात्रे, नगर | रु. ५/- |
| ,, अ. सो. बोकिल किर्लोस्करवाडी | रु. ५/- |
| ,, रमेश वाणी, मुंबई | रु. ५/- |
| ,, बाबुराव चंदावार, पुणे | रु. ५/- |
| एकूण | १५३२/- |

पाच रुपयांपेक्षा प्रत्येकी कमी याप्रमाणे
किरकोळ जमा—
पा. क्र. अ. २,१९, २०.। १, २, ३, ५,
६, ८, ९, १०, १२, १३, १४, १५,
१६, १७, १९, २०, २१, २२—

—एकूण रु. ६३/—

+ मागील पानावरील बेरीज १५३२/—

एकूण रु. १५९५/—

# जमाखर्च

| रुपये जमा | रुपये खर्च |
|---|---|
| १५९५/— | १००/— श्री. प्रधान वकील, मुंबई. हायकोर्ट खर्च. |
| | ७०.५४ श्री. इनामदार बंधू, सभेची जाहिरात (३१।१।७२) |
| | १०/— सभेसाठी हॉल भाडे. |
| | १४०/— श्री. अनिल बर्वे— हेबियस कॉर्पस अर्जाच्या कामासाठी वेळोवेळी दिले. |
| | १२७४.४६ श्री. परांजपे वकील, पुणे यांना वेळोवेळी दिले. |
| रु. १५९५/— | रु. १५९५/— |

वरील जमाखर्चासंबंधी कुणास काही खुलासा वगैरे हवा असल्यास त्यांनी माणूस कार्यालयात कृपया समक्ष यावे. पत्रव्यवहार टाळावा. महिनाभर यासंबंधीची पावतीपुस्तके, पावत्या वगैरे जपून ठेवले जातील. त्यानंतर मात्र हा सर्व विषय संपला असे गृहीत धरून कागदपत्र निकालात काढले जातील.

**१४ मे १९७३** संपादक, माणूस

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-64


## छोटे शेतकरी व ग्रामीण विकास या मधील महत्वाचा दुवा म्हणजे

# महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने

★ ८७% शेतकरी-मालक ३ एकर ऊसाचे आतील.

★ ८३% ऊस विहिरीच्या व १७% ऊस फक्त पाटाच्या पाण्यावर घेतला जातो त्यामुळे अधिक विहिरी खोदून जादा जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी सहकारी साखर कारखान्याकडून छोटया शेतकऱ्यांना सक्रीय मदत. या कारणामुळे देशात ४०% साखरेचे उत्पादन कमी झाले तरी सहकारी क्षेत्रांत वाढ.

★ लोकशाही पद्धतीने दर ३ वर्षांनी निवडणुका प्रत्येक सहकारी साखर कारखान्यात घेतल्या जातात.

★ प्रत्येक संचालकाची मुदत ६ वर्षे मात्र.

★ ७५% संचालक ३ एकराहून कमी शेतात ऊस पिकविणारे व छोटया शेतकऱ्यांचे प्रतिनिधी.

★ ३ एकराच्या ऊसाच्या शेतीचा सर्व साधारण नफा रु. ५०००/- ५ जणांच्या कुटुंबासाठी. ऊसाचे भाव एक्स-फील्ड सरकारने मंजूर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना दिले जातात.

★ १९६० साली प्रत्येक कारखान्याच्या उभारणीसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची किंमत सुमारे ८० लाख रु. एवढी होती. ती आज मितीस २ कोटी रुपये इतकी झाली आहे. तरीही सहकारी क्षेत्रात नवीन २० साखर कारखाने उभारण्याचे कार्य जोरात चालू आहे.

★ १९५० साली सहकारी साखर कारखान्याची क्षमता प्रतिदिनी सुमारे ३५० मेट्रीक टन होती ती १९७२ साली प्रतिदिनी ५५००० मेट्रीक टन एवढी झाली.

★ रस्ते, शाळा, हॉस्पिटल्स, रुरल डिबेंचर्स, राष्ट्रीय संरक्षण, कोयना भूकंप, टंचाई निवारण, आरोग्य इत्यादिसाठी सहकारी साखर कारखान्यांनी अजूनपर्यंत १२ कोटी ३९ लक्ष १३ हजार रुपये खर्च केले आहेत.

## महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.,

बॅलार्ड हाऊस, मंगलोर स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४००००१.
द्वारा प्रकाशित.

माणूस शनिवार । २६ मे १९७३ । पन्नास पैसे

पुण्यातील जातीय दंगल ही काँग्रेसवाले आणि लीगवाले यांच्यातील अंतर्गत मारामारी आहे. एका अर्थी नवराबायकोंचे हे भांडण. विरोधी पक्षांनी यात लुडबुड करूच नये.

आपले धारिया तर सारखे म्हणत आहेत, मीमांसा नको. चिकित्सा नको. प्रथम शांतता.

बरोबर आहे. चिकित्सा झाली तर लपलेले हे गुपित बाहेर येईल आणि इतरांना सवयीने बदनाम करण्याची संधी हातची जाईल.

अगोदर झोडपायचे, नंतर कुशीत घ्यायचे असा सारा घरेलु मामला आहे हा दंगलीचा.

आता मदतीचा ओघ सुरू होईल. जाळलेली घरे पुन्हा बांधून दिली जातील. धंद्यासाठी कर्जे आहेतच. राज्यगृहमंत्र्यांनी गजर केलाच आहे. —'आता पुनर्वसन !'

निर्वसन आणि पुनर्वसन ! दोन्ही खेळ एकाच कंपनीचे.

उत्तर प्रदेश, बिहारमध्ये गेल्या वर्षी ज्या जातीय दंगली उसळल्या त्यात काँग्रेसवाले + पोलीस ही युती होती. पुण्यातही हीच अशुभ युती. खापर मात्र सगळीकडे विरोधी पक्षांवर. काहीच नाही सापडले तर आहेच सी. आय. ए. किंवा तो दुष्ट निक्सन !

राज्य गृहमंत्री सांगतात, दोन महिने तणाव असलेल्या भागात पोलीस बंदोबस्त 'चोख' होता. फक्त १६ मेला 'पुणे बंद'ला तोंड देण्यासाठी हा बंदोबस्त इतरत्र (फक्त चार तास !) हलवावा लागला. त्यामुळे दंगल उसळली.

तणाव असलेल्या भागात दोन महिने 'चोख' बंदोबस्त !

आणि तरीही मशिदीत शस्त्रास्त्रे जमवली जात आहेत, गुंडांना, घरातल्या लहानथोरांना, स्त्रियांनाही दंगलीसाठी 'तयार' केले जात आहे याचा पत्ता नाही !

मग हा पोलीस बंदोबस्त होता, की एखादा पानसुपारीसमारंभ ?

आता शस्त्रास्त्रे इ. हुडकून काढण्यासाठी मशिदींवर छापे घालण्याची घोषणा झाली आहे. हा आणखी एक गलथान आणि विनोदी मामला.

बलात्कार करून गुंड बाहेर आल्यावर हे तरुण तुर्क त्याला दरडावणार—'थांब. तुझा लंगोटच जप्त करतो.'

छापे अगोदरच का नाही घातलेत ? दोन महिने 'चोख' बंदोबस्त या भागात होता ना ?

बरं. त्यावेळी नाही सुचलं. आता तरी ज्या मशिदीत शस्त्रास्त्रे, दगडविटा सापडल्या त्यांचे काय करणार आहात ?

कठोरपणे अशा दंगली मोडून काढायच्या आहेत ना ? मग अशा हिंसक कामांसाठी वापरल्या गेलेल्या मशिदी ताबडतोब सुरुंग लावून जमिनदोस्त करून टाका. थोडी तरी दहशत बसेल. मग बसा सावकाश छापे घालत.

पण हे होणे नाही. कारण भांडण झाले तरी 'मंडळींनी' घराबाहेर जाताही कामा नये.

भिवंडीचा अनुभव ताजाच आहे. कठोर, अतिकठोरपणे जातीय दंगली मोडून काढण्याच्या घोषणा झाल्या. वर्षभरात पकडून ठेवलेले सगळे लोक सुटले. त्या चौकशी समितीचे पुढे काय झाले कुणास ठाऊक ? सगळे खटलेच मागे घेतले गेल्यावर उरले काय म्हणा ! निवडणुकाही जवळ आल्या होत्या !

गरीब लोकांचे मात्र हाल. कारण पुढाऱ्यांचा हा खेळ चालूच राहणार आहे.

—संपादक

वर्ष तेरावे : नववर्षाची नवी रुपया भेट

# माणूस

## चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी

प्रसिद्धी : महिन्यातून दोनदा

आकार : मासिकाचा

किंमत : शंभर पैसे, अंकास

वर्षभरातली किमान दहा निवडक पुस्तकांची ही त्रयोदशवर्षीय भेट न चुकविण्यासारखी.

---

सुरुवात ?

---

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणें ३०